


# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, मंगळवार २४ जून २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ १०+४

## दोन्ही डावात पंतचे 2 ऐतिहासिक शतक

**लंडन/वृत्तसंस्था :** अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफीतील पहिल्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी भारताच्या उपकर्णधार ऋषभ पंतने इतिहास रचला. सोमवार दि. २३ जून रोजी त्याने इंग्लंडमध्ये कसोटी सामन्याच्या दोन्ही डावात शतक झळकावणारा पहिला भारतीय फलंदाज ठरण्याचा मान पटकावला. ९३ वर्षांच्या भारतीय कसोटी क्रिकेट इतिहासात हे अभूतपूर्व यश आहे.पंतने लीड्स कसोटीच्या पहिल्या डावात १३४ धावांची झुंजार खेळी खेळली, तर दुस-या डावातही त्याने जबरदस्त शतक ठोकले. इंग्लंडमधील हे त्याचे एकूण चौथे कसोटी शतक ठरले आहे. विशेष म्हणजे या कसोटीत भारताकडून एकूण पाच शतके झळकली आहेत. यशस्वी जैस्वाल, शुभमन गिल (पहिला डाव), केएल राहुल (दुसरा डाव) आणि पंतने दोन्ही डावात.



**ऋषभ पंत सातवा भारतीय फलंदाज-** कसोटी सामन्याच्या दोन्ही डावात शतक झळकावणारा ऋषभ पंत सातवा भारतीय फलंदाज बनला आहे. याआधी सुनील गावसकर(३ वेळा), राहुल द्रविड(२ वेळा), विजय हजारे, विराट कोहली, अजिंक्य रहाणे आणि रोहित शर्मा यांनीही हे यश मिळवले आहे. पंतचा हा पराक्रम भारतीय संघासाठी प्रेरणादायक ठरला असून लीड्सच्या मैदानावर भारतीय फलंदाजांची वर्चस्व गाजवणारी कामगिरी पाहायला मिळत आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका ४ टप्प्यांमध्ये

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात मागील काही वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. मागील तीन वर्षापासून महापालिका आणि जिल्हा परिषदांचा कारभार प्रशासकांच्या हाती आहे. दरम्यान, आता या वर्षातच महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका होणार आहेत. याबाबत सर्व पक्षांनी तयारी सुरू केली आहे. राज्यात ऑक्टोंबरपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. महानगरपालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका वेगवेगळ्या होणार आहेत. याबाबत निवडणूक आयोगाकडून लवकरच वेळापत्रक येउ शकते.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार टप्प्यांमध्ये होणार आहेत. ऑक्टोंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासूनच मतदानाला सुरु वात होणार असल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत आता निवडणूक आयोग तयारी करत आहे. राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती, आदींच्या निवडणुका कधी कोरोनाच्या संसर्गाचे कारण देत, तर कधी ओबीसी आरक्षणाचा मुद्दा



समोर आणून घेतल्या गेल्या नाहीत. ओबीसी आरक्षण द्यायचे की नाही यावरसुद्धा बराच गदारोळ झाला. कोरोनाचा संसर्ग कमी झाल्यानंतर २०२० पासून राज्यात कुठे एकदा तर कुठे दोनदा, तीनदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी करण्यात आली होती. पण, या निवडणुका घेण्यात आलेल्या नाहीत. दरम्यान, जिल्हा परिषद, महानगरपालिकेसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सुप्रीम कोर्टाने ६ मे रोजी निर्णय दिला. ओबीसींना २०२२ पूर्वी असलेले आरक्षण कायम ठेवून सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाला चार महिन्यांच्या आत निवडणुका घेण्याचे निर्देश दिले. चार आठवड्यांच्या आता निवडणुकांसदर्भातील अधिसूचना काढण्यासही सुप्रीम कोर्टाने सांगितले होते. २०२२ मध्ये बांठिया आयोगाचा अहवाल सादर होण्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या ओबीसी आरक्षणाला महाराष्ट्र राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५ वर्षांपर्यंत निवडणुका झाल्या नसल्याचे कोर्टाने नमूद केले. त्यामुळे सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाला ४ आठवड्यांच्या आत निवडणुकीची अधिसूचना काढण्याचे निर्देश दिले आहेत.

## विधान भवनात सगळे षंढ बसलेत

**मुंबई/प्रतिनिधी :** संसदेच्या अंदाज समितीला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त महाराष्ट्राच्या विधान भवनात लोकसभेने २३ जून रोजी एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचा फलक मराठी भाषेत नसल्याचे पाहून मनसे नेते संदीप देशपांडे यांनी तीव्र संताप व्यक्त केला. हे या महाराष्ट्राचं दुर्दैव आहे. विधान भवनात सगळे षंढ बसले आहेत. हे पाहून मराठी माणसाने काय करायचे, अशी बोचरी टीका मनसे नेते संदीप देशपांडे यांनी केली.



मनसे नेते संदीप देशपांड

दरम्यान, संदीप देशपांडे यांनी वापरलेल्या षंढ या शब्दावरून आता राजकारण सुरू झाले आहे. भाषा समजण्यासाठी तुम्हाला निवडून यावं लागेल, अशी खोचक टीका नीलम गों-हे यांनी केली. तर षंढ या शब्दावरून हक्क भंग आणू, असा इशारा मंत्री गुलाबराव पाटील यांनी मनसेला दिला आहे. यावर आपण व्यक्ती बद्दल नाही तर प्रवृत्ती बद्दल बोललो होता, असा खुलासा संदीप देशपांडे यांनी केला आहे. तसेच माझा शब्द चुकला असेल; पण तुम्ही विचार करा. मी मराठी भाषेसाठी कोणत्याही कारवाईला (पान २ वर)

## श्राद्धाच्या 11 दिवसांनंतर मृत महिला घरी परतली

■ चितेवर कोणाला जाळले? ■ कुटुंबीय बुचकळयात

***छपरा/वृत्तसंस्था :*** बिहारच्या छपरा जिल्ह्यातून एक विचित्र आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे पंचक्रोशीत खळबळ उडाली आहे. गावातील एका महिलेच्या मृत्यूनंतर तिच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले, श्राद्धाच्या विधीही पूर्ण झाल्या, मात्र त्यानंतर ती महिला अचानक तिच्या घरी परतली. या घटनेने केवळ गावक-यांनाच नाही, तर स्थानिक प्रशासनालाही आश्चर्यचकित केले आहे. ही घटना



रविलगंजच्या मोहब्बत परसा पंचायतीतील भाडपा नया बस्तीची आहे. राम स्वरुप राय यांची पत्नी रमा देवी(४५) १७ मे रोजी अचानक घरातून बेपत्ता झाल्या. कुटुंबीयांनी त्यांचा सर्वत्र शोध घेतला, परंतु कोणताही सुगावा लागला नाही. दरम्यान, २६ मे रोजी सरयू नदीच्या घाटाच्या पूर्वेकडील (पान २ वर)

पोटनिवडणुकींचे निकाल जाहीर

## पंजाब, गुजरातमध्ये 'आप' तर कालीगंजमध्ये तृणमूल विजयी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** २०२६ साली होणा-या पश्चिम बंगाल आणि केरळ विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महत्वाच्या ठरलेल्या पाच विधानसभा पोटनिवडणुकांमध्ये आम आदमी पक्ष, काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसने मोठी बाजी मारली आहे. भाजपने सर्वच जागांवर उमेदवार उभे केले असतानाही त्यांना केवळ गुजरातमधील कडी या सुरक्षित जागेवर विजय मिळवता आला.



पंजाबमधील लुधियाना वेस्ट विधानसभा मतदारसंघात आपचे संजीव अरोरा यांनी १०००० हून अधिक मताधिक्याने विजय मिळवला. ही जागा आपचे आमदार गुरप्रीत गोगी यांच्या आत्महत्येमुळे रिकामी झाली होती. अरोरा यांच्या प्रचारासाठी अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया आणि आतिशी यांनी विशेष प्रयत्न केले. काँग्रेसचे भारत भूषण आशू दुस-या स्थानी तर भाजपचे जीवन गुप्ता तिस-या क्रमांकावर होते.गुजरातमधील विसावदरमध्ये आपचे माजी राज्याध्यक्ष आणि पाटीदार आंदोलनातील चर्चित नेता गोपाल इटालिया यांनी भाजपच्या किरीट पटेल यांचा १७००० पेक्षा अधिक मतांनी पराभव केला. ही जागा याआधी आपकडे होती, मात्र भूपेंद्र भायाणी यांच्या भाजप प्रवेशामुळे रिकामी झाली होती. या विजयामुळे गुजरातमध्ये भाजपच्या एकाधिकाराविरुद्ध आपने पुन्हा एकदा अस्तित्व दाखवले आहे. गुजरातमधील (पान २ वर)

## बापानेच संपवले पोटच्या पोराला

**जळगाव :**जळगावमधील जामनेरमध्ये बापानेच पोटच्या पोराचा खून केल्याची हृदयद्रावक आणि धक्कादायक घटना घडली आहे. जामनेर तालुक्यातील कसबा पिंप्री गावातील २५ वर्षीय शुभम धनराज सुरळकर याची हत्या करण्यात आली. शुभमला त्याच्या जन्मदात्या पित्यानेच निघृणपणे संपवलं. काका आणि भावाने शुभमला संपवायला मदत केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी फत्तेपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, मयताचे वडील धनराज सुपडू सुरळकर, भाउ गौरव सुरळकर आणि काका हरिलाल सुरळकर या तिघांना पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुभम याला दारूचे व्यसन होते. मद्याच्या नशेत तो किरकोळ कारणांवरून घरात सातत्याने भांडणे करायचा.

परीक्षेत कमी गुण मिळाले, जाब विचारताच उलट बोलली

## शिक्षक वडिलांकडून मुलीला मारहाण, तडफडून मृत्यू

**सांगली/प्रतिनिधी :** नीटच्या चाचणी परीक्षेत कमी गुण मिळाल्याने आणि कमी गुण मिळाल्याबाबत कारण विचारल्यावर उलट उत्तर दिल्याने संतापलेल्या वडिलांनी केलेल्या बेदम मारहाणीत जखमी होउन या मुलीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यात घडली आहे. धक्कादायक बाब म्हणजे मृत मुलीचे वडील हे स्वतः एका शाळेत शिक्षक आहेत. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी वडिलांना अटक केली आहे. साधना धोंडीराम भोसले असं मृत मुलीचं नाव असून, ती बारावीमध्ये शिकत होती.याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार मृत साधना ही सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील नेलकरंजी गावातील रहिवासी होती. डॉक्टर होण्याचं स्वप्न पाहणा-या साधना हिला दहावीमध्ये तब्बल ९२.६० टक्के गुण मिळाले होते. दरम्यान, नुकत्याच झालेल्या नीटच्या चाचणी परीक्षेत तिला कमी गुण मिळाले होते. त्यामुळे माध्यमिक शाळेत मुख्याध्यापक असलेले साधनाचे वडील धोंडीराम भोसले यांचा राग अनावर झाला. नीटच्या सराव परीक्षेत एवढे कमी गुण कसे काय मिळाले, अशाने तू डॉक्टर कशी होणार? अशी विचारणा त्यांनी केली. तेव्हा साधनाने तुम्हालाही कमी गुण मिळायचे, तुम्हीतरी शिकून कुठे कलेक्टर झालात?, असं उलट उत्तर वडिलांना दिलं.



साधनाने उलट उत्तर दिल्याने वडील धोंडीराम भोसले यांचा राग अनावर झाला. संतप्त झालेल्या धोंडीराम यांनी जात्याच्या लाकडी खुंट्याने साधना हिला बेदम मारहाण केली. तेव्हा त्यांच्या पत्नीने मध्ये पडून त्यांना थांबवले. मात्र काही वेळाने त्यांनी साधना हिला पुन्हा मारहाण केली. एवढंच नाही तर शुक्रवारी रात्रभर ते तिला मारहाण करत होते. त्यानंतर दुस-या दिवशी ते उठून शाळेत योग दिनाच्या कार्यक्रमाला गेले होते. घरी परतल्यावर साधना ही त्यांना बेशुद्धावस्थेत दिसून आली. त्यानंतर घाबरलेल्या धोंडीराम भोसले यांनी साधना हिला सांगली येथील दवाखान्यात उपचारांसाठी नेले. साधना ही बाथरूममध्ये पाय घसरून पडल्याचे सांगत त्यांनी तिला उपचारांसाठी दाखल करण्याचा प्रयत्न केला. मात्र तिथे उपचार घेण्यापूर्वीच साधना हिचा मृत्यू झाला. त्यानंतर साधना हिचं शवविच्छेदन केल्यावर तिच्या संपूर्ण शरीरावर मारहाणीच्या खुणा आढळून आल्या. त्यानंतर पोलिसांकडून करण्यात आलेली चौकशी आणि आईने दिलेल्या तक्रारीनंतर शिक्षक असलेले वडील धोंडीराम भोसले यांना पोलिसांनी अटक केली आहे.

## मोदीजी हे विश्वगुरू

### इस्त्रायल-इराण युद्ध थांबवण्यासाठी प्रयत्न करावेत, इराण आपला जुना मित्र


**बंगळुरू/वृत्तसंस्था :**काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, आमचे पंतप्रधान विश्व गुरू होण्याचा नारा देतात. दुसरीकडे इराण आणि इस्त्रायलमध्ये युद्ध सुरू आहे. आपण हे थांबवण्याचा प्रयत्न करायला हवा होता. तुम्ही (मोदीजी) विश्वगुरू असाल किंवा घरचे गुरू व्हा. लोकांना पेट्रोल, डिझेल, अन्न, कपडे आणि डोक्यावर छप्पर हवे आहे. आम्हाला त्यांनी या गोष्टींसाठी प्रयत्न करावे अशी इच्छा होती. खरगे यांनी पंतप्रधानांना आठवण करून दिली की, इराणने नेहमीच भारताला पाठिंबा दिला आहे. कारण देश आपल्या इंधनाच्या गरजेच्या ५० टक्के गरजा इराणमधून आयात करतो.



सोमवारी कर्नाटकातील रायचूर येथे एका जाहीर सभेला संबोधित करताना खरगे म्हणाले- पंतप्रधान मोदी नेहमीच विरोधकांना कमी लेखतात. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकांमध्ये पंतप्रधान अनुपस्थित होते. यावरून स्पष्ट होते की त्यांना विरोधकांबद्दल अजिबात आदर नाही. खरगे म्हणाले, पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी २६ जणांना ठार मारले. प्रत्युत्तरादाखल भारतीय सैन्याने पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर हल्ला केला आणि दहशतवाद्यांचा खात्मा केला. त्यावेळी संपूर्ण देश सैन्यासोबत उभा होता पण अशा वेळीही काही लोक वैयक्तिक श्रेय घेण्याचा प्रयत्न करत होते. खरगे पुढे म्हणाले की, जर त्यांनी (मोदींनी) सैन्यात कॅप्टन, कर्नल किंवा लेफ्टनंट कर्नल म्हणून सेवा दिली असती, तर आम्ही त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल आणि देशासाठी लढल्याबद्दल त्यांचे कौतुक केले असते. पण तसे नाही. त्याऐवजी, ते बिहार निवडणुकीच्या प्रचारात व्यस्त होते. याचा अर्थ काय? जेव्हा देश आणि सैनिक (पान २ वर)

# अमेरिकेच्या सैन्य तळांवर हल्ला

### कतारमधील सर्वात मोठ्या एअरबेसवर डागली 6 क्षेपणास्त्रे



**तेहरान / वृत्तसंस्था -**अमेरिकेने इराणच्या अणुकेंद्रांवर हल्ला केल्यानंतर, आता इराणनेही इस्लामिक देश कतारवर हल्ला करत, अमेरिकेला 'इट का जवाब पत्थर से' दिले आहे. कारण, येथेच अमेरिकन लष्कराचा सर्वात मोठा एअरबेस आहे. इराणने कतारमधील अमेरिकेच्या ठिकाणांच्या दिशेने ६ क्षेपणास्त्रे डागल्याचे वृत्त आहे. कतारची राजधानी दोहा या मोठ-मोठ्या स्फोटांनी दणाणून गेली आहे. यापूर्वी, अमेरिकेने इराणच्या अणुकेंद्रांवर केलेल्या हल्ल्यांनंतर, तेहराननेे बदला घेण्याची धमकी दिली होती. इराणने अमेरिकेला प्रत्युत्तर देण्याची धमकी दिल्यानंतर, कतारने सोमवारी आपले हवाई क्षेत्र बंद केले होते. देशाच्या परराष्ट्र मंत्रालयाकडून यासंदर्भात घोषणा करण्यात आली होती. कतारमध्ये अल उदीद एअर बेस आहे. जे अमेरिकन लष्कराचा एक महत्वाचे ठिकाण आहे. कतारने हा निर्णय तात्पुरता असल्याचे म्हटले होते.

इराण-इस्त्रायल युद्धात अमेरिकेने उडी घेतली आणि इराणमधील ३ अण्वस्त्र तळांवर एअर स्ट्राईक केला. जमिनीखाली असलेले तळ उद्ध्वस्त करण्याच्या हेतूने बी-२ बॉम्बर विमानांनी बंकर बस्टर बॉम्ब टाकले. जमिनीखाली असलेले तळ उद्ध्वस्त करण्यासाठी त्यांचा वापर होतो. यानंतर आता अमेरिकेच्या सैन्य तळावर मोठा हल्ला झाला. सीरियातील अमेरिकेचे तळ लक्ष्य करण्यात आले आहेत. इराणमधील अमेरिकेच्या हल्ल्याला ३६ तास उलटल्यानंतर अमेरिकन तळावर हल्ला झाला आहे.

अमेरिकेच्या तळावरील हल्ला इराणने केला असल्याची शक्यता आहे. गेल्या आठवड्याभरापासून इराण-इस्त्रायल यांच्यात संघर्ष सुरू आहे. दोन्ही देश एकमेकांवर हवाई हल्ले चढवत आहेत. या युद्धात अमेरिका इस्त्रायलच्या बाजूने उतरला आहे. अमेरिकेने २२ जूनला इराणच्या ३ आण्विक प्रकल्पांवर एअर स्ट्राईक केला. ऑपरेशन मिडनाईट हॅमरच्या अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. त्यानंतर आता सीरियाच्या पश्चिम हसाका प्रांतात असलेल्या अमेरिकेच्या लष्करी तळावर हल्ला झालेला आहे. अद्याप तरी या हल्ल्याची जबाबदारी कोणीही घेतलेली नाही. अमेरिकेने युद्धात उडी (पान २ वर)

इराण-इस्त्रायल युद्धाचा फटका

## देशात फक्त 16 दिवसांचा एलपीजी साठा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पश्चिम आशियातील वाढत्या सैन्य संघर्षामुळे भारताची चिंता वाढली आहे. भारत आपल्या एलपीजी पुरवठ्यासाठी या क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. भारतात वापरल्या जाणा-या प्रत्येक तीन घरगुती एलपीजी सिलेंडरपैकी दोन पश्चिम आशियातून येतात. आता इराणने होर्मुझची समुद्रमार्ग बंद करण्याचा प्रस्ताव मंजुर केल्याने जो कच्चे तेल आणि एलपीजी पुरवठ्याचा प्रमुख मार्ग आहे. इकॉनॉमिक टाइम्सच्या एका अहवालानुसार, भारताकडे सध्या फक्त १६ दिवसांचा एलपीजी साठा आहे. दरम्यान, अमेरिकेच्या इराणवरील हल्ल्यानंतर जर पश्चिम आशियातील तणाव आणखी वाढला आणि पुरवठा साखळी प्रभावित झाली, तर याचा सर्वात पहिला परिणाम सामान्य लोकांच्या स्वयंपाकघरावर होईल.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, भारत इच्छा असूनही मोठ्या प्रमाणात एलपीजी साठवणूक करू शकत



नाही. याचे कारण साठवणुकीच्या मर्यादित सुविधा आहेत. भारत केवळ १६ दिवसांसाठी आवश्यक असलेला एलपीजी साठा करू शकतो. त्यामुळे एलपीजी पुरवठ्यात कोणत्याही प्रकारचा अडथळा आल्यास देशात मोठे संकट निर्माण होउ शकते. सध्या तरी जास्त धोका (पान २ वर)

## मुंबईला पावसाचा ऑरेंज अलर्ट

### कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भातही धो-धो बरसणार

**मुंबई/प्रतिनिधी :** दक्षिण कोकण-गोवा जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी, उत्तर कोकण जिल्ह्यांमध्ये आणि मध्य महाराष्ट्रातील घाट भागात काही



ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाउस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मराठवाड्यात काही ठिकाणी विजांसह वादळी वारे ताशी ३०-४० किमी वेगाने वाहतील आणि हलका ते मध्यम पाउस पडण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. यामुळे कोकणातील उत्तर कोकणातील ठाणे, पालघर, उत्तर रत्नागिरी व रायगड जिल्ह्यातील प्रशासनही अलर्ट मोडवर आहे. दक्षिण कोकणात दक्षिण रत्नागिरी, सिंधुदुर्ग व गोवा प्रशासनही अलर्ट मोडवर आहे. यंदा झालेल्या मुसळधार पावसाने कोकणातील पश्चिम महाराष्ट्र जोडणारे घाट रस्तेही अडचणीत सापडले आहेत.२४ जून रोजी कोकण, गोवा, मुंबई परिसरात किनारपट्टी या भागातही ऑरेंज रेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भातही मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.त्याचबरोबर केरळ, छत्तीसगडमध्येही अति मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, बिहार ,पश्चिम बंगाल नागालँड, अरुणाचल प्रदेश या राज्यांनाही मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कोकण व पश्चिम महाराष्ट्र जोडणारा महत्त्वाचा मार्ग असलेल्या चिपळूण कराड मार्गावरील अवजड वाहतूक बंद करावी लागली आहे. तर, कोकण व महाबळेश्वर जोडणारा आंबेनळी घाट हा रात्रीच्या वेळेस वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे. इतकंच नाही तर रायगड व पुणे जिल्हा जोडणारा वरंधा घाटातही वाहतूक बंद ठेवावी लागली आहे. (पान २ वर)

## जम्मूला निघालेले विमान पुन्हा दिल्लीला परतले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**गेल्या काही दिवसांपासून अनेक कंपन्यांच्या विमानांमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याच्या कारणास्तव विमानांच्या



उड्डाणांमध्ये व्यत्यय आल्याच्या घटना समोर आल्या आहेत. यानंतर आता एअर इंडिया एक्सप्रेसच्या एका विमानाचंही इमर्जन्सी लँडिंग करण्यात आलं आहे. दिल्लीहून जम्मूच्या दिशेने हे एअर इंडिया एक्सप्रेसचं विमान निघालं होतं. मात्र, मध्येच तांत्रिक बिघाड झाल्यामुळे हे विमान पुन्हा दिल्लीला परतलं आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, एअर इंडिया एक्सप्रेसच्या आयएक्स २५६४ या विमानाला (पान २ वर)

## वारीबाबत वादग्रस्त विधान

### *अबू आझमींना नोटीस बजावणार*

**मुंबई/प्रतिनिधी :** समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी पुन्हा एकदा वादग्रस्त वक्तव्य केले आहे. सध्या आषाढी वारीसाठी पालख्या पंढरीच्या दिशेने निघाल्या आहेत. याच मुद्द्यावरुन अबू आझमी यांनी, पुण्यातून येताना मला लोकांनी सांगितले की, लवकर जाउ अन्यथा पालख्यामुळे रस्ता जाम होईल. रस्ता जाम होतो, पण आम्ही कधी तक्रार केली नाही. नमाजसाठी तक्रार होते, अशा आशयाचे विधान केले आहे. या विधानानंतर अनेकांकडून त्यांच्यावर टीका केली जात आहे. याशिवाय महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी अबू आझमींना सेक्शन १० प्रमाणे नोटीस बजावत कारवाईचा इशारा दिला आहे.अबू आझमी यांचे वारी संदर्भातील वक्तव्य दोन समाजामध्ये तेढ निर्माण करणारे आहे. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग त्यांच्या या वक्तव्याचा निषेध करत असून आयोग अबू आझमी



यांच्या वक्तव्यासंदर्भात त्यांना सेक्शन १० प्रमाणे नोटीस ही बजावणार आहे. गरज भासली तर त्यांना आयोगासमक्ष उपस्थित राहून उत्तर देण्यासही सांगण्यात येईल, असे अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी सांगितले. समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी वारीसंदर्भात वादग्रस्त वक्तव्य करत म्हंटले होते की, आजपर्यंत कोणत्याही मुस्लिम व्यक्तीने रस्त्यावर (पान २ वर)



# भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांना तात्काळ अटक करा

## ख्रिश्चन समाजाची मागणी



**अमरावती/प्रतिनिधीः-**
आमदार गोपीचंद पडळकर यांनी ख्रिश्चन समाजाच्या धर्मगुरूंसंदर्भात आक्षेपार्ह विधान केले. या विधानाचा निषेध करून त्यांना तत्काळ अटक करावी अशी मागणी ख्रिश्चन समाजाने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आज सोमवारी २३ जून रोजी दिलेल्या निवेदनात केली.

निवेदनात म्हटले आहे की, सांगलीमध्ये आमदार गोपीचंद पडळकर यांनी सभेमध्ये बोलताना ख्रिश्चन समाजाच्या धर्मगुरूंनी जर धर्मांतरांचा प्रयत्न केला तर त्यांना सर्वांनी बडदून काढावे, ठोकावे, मारावे आणि जो हे कार्य करेल त्याला ११ लाख रुपयाचे बक्षीस जाहीर केले.याचा अर्थ ख्रिश्चन धर्मगुरुला ठार मारले तर ही रक्कम मिळेल. या विधानाने महाराष्ट्र व संपूर्ण देशातील ख्रिस्ती धर्मगुरूंच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे अनेक ख्रिस्ती धर्मगुरूंची हत्या होऊ शकते. भारत धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. भारताला एक सर्वव्यापी व शक्तिशाली संविधान आहे. भारतीय संविधान हे कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे संरक्षण नाकारणार नाही.

पडळकर यांनी सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता ,आरोग्य याला ठेस पोहचवली आहे. त्यांना संविधानाचा विसर पडलेला आहे. त्यांच्या या विधानामुळे ख्रिस्ती बांधवांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेले आहे. त्यांचे हे विधान संविधान विरोधी असून समाजात द्वेष निर्माण करणारे आहे. ख्रिस्ती समाज हा शांतता प्रिय असून संपूर्ण जगाला शांतीचा संदेश देतो, अशा वक्तव्यामुळे ख्रिश्चन लोकांच्या प्रार्थनास्थळावर हल्ले होऊ शकतात. ख्रिस्ती धर्मगुरूंच्या जीवनाला धोका निर्माण होऊ शकतो. अशी कोणतीही घटना घडल्यास आमदार पडळकर जबाबदार राहतील. त्यांच्या मुळे समाजात धार्मिक तेढ निर्माण होईल. त्यामुळे संविधान विरोधी वक्तव्य करणाऱ्यांविरुद्ध एफआयआर दाखल करून त्यांना अटक करावी आणि त्याची आमदारकी बरखास्त करावी ,अशी मागणी समस्त ख्रिश्चन समाजाच्या वतीने करण्यात आली.

निवेदन देतेवेळी राजेंद्र गावंडे, भीमराव इंगळे, अरविंद जवंजाळ, प्रेम खंडारे, सुनील गायगोले, सुखानंद निकाळजे , डॉ.शशांक रायबोले, अस्मिता दिवे, नंददास निकाळजे, भूषण अंभोरे ,छाया अंभोरे, स्वप्निल वावरे, विनोद नितनवरे, संजोग, संजय दिवे, सुनील साळवे, संध्या साळवे, शोभा इंगळे ,ललिता इंगळे, किशोर आत्राम आदी उपस्थित होते.

# ब्रिटिशकालीन ११८ पूल धोक्यात

### - अचलपूरसह मेळघाटात मोठ्या अपघातांचा धोका निर्माण

## ३२ महत्त्वाच्या पुलांसाठी ७० कोटींचा प्रस्ताव

**अचलपूर/प्रतिनिधीः-**
मेळघाटातील अचलपूर, धारणी आणि चिखलदरा तालुक्यांमध्ये असलेले ब्रिटिशकालीन ११८ पूल आता धोक्याच्या टप्प्यावर पोहोचले आहेत. हे पूल १०० वर्षांहून अधिक जुने असून सध्या पूर्णपणे जीर्णावस्थेत आहेत. नागरिकांसाठी या पुलांवरून प्रवास करणे म्हणजे जीव मुठीत घेऊन चालण्यासारखे झाले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने या पूलांच्या दुरुस्ती आणि पुनर्बांधणीसाठी हालचाली सुरू केल्या असून सध्या ३२ प्रमुख पुलांसाठी सुमारे ७० कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला आहे. हा प्रस्ताव सन २०२७ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्याची शिफारस करण्यात आली आहे.या पुलांच्या दुरुस्तीसाठी टायगर प्रोजेक्ट (व्याघ्र प्रकल्प) च्या नियमांमुळे अडथळे निर्माण होत आहेत. विविध विभागांमधील फाईली फिरत राहतात. मात्र कामांना मंजुरी मिळत नाही. परिणामी या पूलांचे अस्तित्व संपुष्टात येत आहे आणि मेळघाटातील नागरिक गंभीर धोका पत्करत प्रवास करत आहेत.या पुलांवर आतापर्यंत एसटी बस, मध्यप्रदेशकडून येणारे मालवाहू ट्रक आणि खासगी बस अपघातग्रस्त झाल्या आहेत. या अपघातांमध्ये अनेकांचा बळी गेला आहे. त्यामुळे या पुलांच्या दोन्ही बाजूंना मजबूत कठडे व चेतावणी फलक बसवणे अत्यावश्यक आहे.



'मेळघाटातील जुन्या पुलांची दुरुस्ती आणि पुनर्बांधणी करणे अत्यंत आवश्यक आहे. यासंदर्भात टायगर प्रोजेक्टला पत्र पाठवले असून ३२ पुलांसाठी अंदाजे ७० कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाला पाठवलेला आहे.'
**नीलेश चौधरी,उपविभागीय अभियंता**

### वाहतूक व आरोग्य सुविधांवर परिणाम

बामणी, चंद्रपूर, यवतमाळ, अचलपूर, अमरावती, बडनेरा, धारणी आणि बुऱ्हाणपूर यांना जोडणारा आंतरराज्य महामार्ग-१४ हा आदिवासी भागातून जातो. त्यामुळे केवळ दळणवळणच अडथळ्यात येत नाही, तर आपत्कालीन आरोग्य सुविधा देखील वेळेवर पोहोचत नाहीत.

### मूलभूत सुविधा दुर्लक्षित

शासन दरवर्षी आरोग्य व आदिवासी विकासाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा निधी जाहीर करते, मात्र रस्ते आणि पूल या मूलभूत सुविधांची अवस्था पाहता विकासाच्या दाव्यांना फाटा दिला जात आहे. जर लवकरच या ११८ पुलांची तातडीने दुरुस्ती आणि पुनर्बांधणी केली गेली नाही, तर मेळघाटसारख्या दुर्गम भागात भीषण दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. शासन आणि वनविभाग यांच्यात समन्वय साधून या विकासकामांना तातडीने मंजुरी देणे काळाची गरज आहे, जेणेकरून मेळघाटातील जनतेचा जीव सुरक्षित राहील.

# आपले सरकार सेवा केंद्राच्या जाहिरातीत दुरुस्ती करा

## सेतु समितीची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



**अमरावती/प्रतिनिधीः-**
जिल्हा प्रशासनाच्यावतीने आपले सरकार सेवा केंद्राबाबत १९ जून रोजी जी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे, त्यामध्ये दुरुस्ती करावी अशी मागणी जिल्हा सेतू समितीने जिल्हाधिकाऱ्यांना सोमवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

समितीच्या म्हणण्यानुसार, जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्ह्यात रिक्त असलेल्या ठिकाणी आपले सरकार सेवा केंद्र सुरू करण्याबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. या जाहिराती मध्ये महाराष्ट्र सरकार द्वारा २७ मार्च रोजी जो निर्णय घेतला त्याचा विचारच केला गेला नाही.सरकारने प्रत्येक ग्राम पंचायत क्षेत्रात दोन आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. त्याच प्रमाणे ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीत किमान चार केंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. शहरी भागासाठी वेगळे निकष लागू करण्यात आले होते.अमरावती जिल्हा शासकीय सेवा नागरिकांपर्यंत पुरवण्यात मागे राहू नये यासाठी आपले सेवा केंद्र जिल्ह्यामध्ये वाढवण्याची अत्यंत गरज आहे.त्यामुळे ही जाहिरात रद्द करण्यात यावी. जिल्ह्यात अचलपूर तालुक्यामध्ये सध्या ५१९, अमरावती १०५६, अंजनगाव सुर्जी २७५, भातकुली १९५, चांदूर रेल्वे १७८, चांदूरबाजार ३४५ ,चिखलदरा २०५, दर्यापूर ३८६ ,धामणगाव २११, धारणी २५१, मोर्शी ३०१, नांदगाव खंडेश्वर २६६, तिवसा २३३ ,वरूड ३५१ असे एकूण ४७७२ आपले सेवा केंद्र कार्यरत आहे. तरी देखील ही संख्या खूप कमी आहे.उच्चशिक्षित तरुणांना शासकीय सेवा प्रदान करण्याची संधी मिळावी. त्यामुळे बेरोजगारी दूर होईल असे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

यावेळी उमेश गावंडे ,महेश बोरकर, गौरव इंगळे, श्याम घोटे,राजन वाठ, शरद तिवारी, उमेश बर्डे, आयुष भुसारी, श्रीकांत वानखडे, रुपेश निमकर, राकेश गडपाले,पूजा काळे, सुषमा पारिसे,क्रांती वरहाटे, अजिंक्य काटे, आशिष ढोकणे, अक्षय कावरे, अभिजीत मानकर, सुरज येवतीकर, दिनेश सेलूकर ,अजय जावडकर, देवानंद सावरकर ,नरेंद्र कासदेकर, अभिजीत मानकर, आकाश कडू ,गजानन जाधव व अनेक उच्च शिक्षक युवक उपस्थित होते.

## १ व १० वरिल उर्वरित

### एसटी बसला आग, ७० प्रवासी

थोडक्यात बचावले. या घटनेमुळे प्रवाशांमध्ये खळबळ उडाली होती. माहितीनुसार एस टी महामंडळची बस क्रमांक एमएच ४० वाय ५६९४ सोमवारीं दुपारी चांदुर बाजार वरून अमरावतीसाठी निघाली होती. या बस मध्ये ७० प्रवासी बसले होते. दुपारी १.५० च्या सुमारास ही बस कठोरा मार्गावरील रंगोली लॉन समोर आली. त्यावेळी अचानक बस मधून धूर निघत होता. बॅटरीच्या वायरिंग मध्ये शॉर्टसर्किट झाल्याने बसमध्ये आग लागली होती. हे लक्षात येताच चालक दिनेश खोब्रागडे आणि वाहक यांनी सतर्कता दाखवून बस रस्त्याच्या बाजुला उभी केली आणि प्रवाशांना खाली उतरविले. त्यांनी तत्काळ घटनेची माहिती अग्निशमन विभागाला दिली. माहिती मिळताच वॉलकट कंपाउंड येथील मुख्य केंद्र व ट्रान्सपोर्ट नगर उपकेंद्रातील अग्निशमन वाहने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. यामुळे मोठा अनर्थ टळला. आगीत बसचे ३५ हजाराचे नुकसान झाले. घटनास्थळावर नागरिकांची बरीच गर्दी जमा झाली होती. सुरक्षेच्या दृष्टीने गाडगे नगर पोलिसांना पण बोलविण्यात आले होते. उपकेंद्र प्रमुख सय्यद अनवर, प्रेमानंद सोनकांबळे, कर्मचारी मोहसीन इकबाल, हर्षद दहातोंडे, निखिल वाठे, हाजी खान, ऋषिकेश जाधव, नावेद खान, शोएब खान, खडसे चव्हाण आदींनी आग विजवण्यासाठी अथक प्रयत्न केले.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या नावे बनावट

करण्यात आले नसून नागरिकांनी बनावट खात्याशी कोणताही आर्थिक व्यवहार करू नये किंवा संपर्क साधू नये. यात नागरिकांची फसवूणक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्यासह जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावे फसवणूकीचे संदेश आल्यास स्विकारू नये किंवा ब्लॉक करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

### मोझरी पॉइंटवर झाडाला लटकलेला

पटवणे कठीण बनले आहे. या युवकाचे वय सुमारे ३८ ते ४० वर्षांदरम्यान असावे, असा पोलिसांचा अंदाज आहे. डॉक्टरांच्या उपस्थितीत पंचनामा करून शवविच्छेदनानंतर अंत्यसंस्कार करण्यात आले. सदर घटना आत्महत्येची असण्याची शक्यता वर्तवली जात असली तरी पोलिसांनी घातपाताच्या शक्यतेलाही डावललेले नाही. त्यामुळे सर्व बाजूंनी तपास सुरू करण्यात आला आहे. या घटनेबाबत माहिती देताना पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, जर आपल्या ओळखीतील सुमारे ४० वर्षे वयोगटातील पुरुष हरवला असेल, तर चिखलदरा पोलीस ठाण्याशी तातडीने संपर्क साधावा. सध्या या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, मृत व्यक्तीची ओळख पटविणे हे पोलिसांसमोरील प्रमुख आव्हान आहे.

### नांदगावचे ग्रामीण रुग्णालय

खाजगी वाहनाने घेऊन जातात तसेच रुग्णालयाची इमारत सुद्धा शोभेची वास्तू ठरली असून रुग्णालयाच्या तीन इमारती उभ्या असतांना परिपूर्ण सोई सुविधा उपलब्द नाही. संपूर्ण तज्ञ डॉक्टर, नर्स इत्यादी पदे रिक्त आहे तसेच त्या ठिकाणी नव्याने सुरु झालेला उपचार रुग्णांना सध्या तरी माहिती नाही. विजेचे होल्टेज पूर्णपणे संपूर्ण रुग्णालयांत मिळत नाही. त्यामुळे रुग्णाच्या उपचाराकरिता शास्त्रक्रिये करिता असलेले यंत्र मशिनरी निकामी ठरत आहे. परिपूर्ण पाण्याची सोय नाही. त्यामुळे रुग्णालयांत साफ सफाई नियमित होत नाही. अश्या अनेक समस्यांनी ग्रामीण रुग्णालयाची इमारत ग्रासली आहे. नांदगाव हे तालुक्याचे ठिकाण आहे. या तालुक्यातून समृद्धी महामार्ग, वर्धा-संभाजीनगर महामार्ग, अमरावती-यवतमाळ राज्य मार्ग हे अत्यंत महत्वाचे मार्ग आहेत. मार्गावर दररोज अपघात आणि इतर रुग्णांची गर्दी असते. प्रसंगी मंगरूळ चवाळा, लोणी टाकळी, तळेगाव येथील रुग्णवाहिका बोलवावी लागते. तेही यायला एक तास वेळ लागतो. त्यामुळे रुग्ण दगावण्याची शक्यता अधिक असते. खाजगी वाहनाने रुग्णांना जिल्हास्तरीय उपचारासाठी न्यावे लागते. तेव्हा ग्रामीण रुग्णालयाला मोठ्या नवीन रुग्णवाहिका अतिरिक्त देण्यात याव्या तसेच तातडीने रिक्त जागा भरून येथील सोई सुविधा पूर्ण कराव्या अन्यथा शिवसेना तीव्र आंदोलन छेडेल असा इशारा शिवसेना विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर यांनी जिल्हा शल्य चिकिस्तक यांना निवेदन सादर करून दिला.

### लोतवाडा येथील सरपंच व उपसरपंचासह

पात्र ठराविल्याचा आदेश काढला. याउलट चांदुर बाजार तालुक्यातील एका ग्रामपंचायत सदस्याने शासकीय जागेत अतिक्रमण केल्यामुळे त्याला अपात्र ठरविले. लोतवाडा येथील चारजणांना पात्र का ठराविले, याबाबत अप्पर जिल्हाधिकारी गोविंदा पाणेज यांच्या कार्यपद्धतीवर शंका व्यक्त केल्या जात आहे.

### चारही जणांना पात्र ठरविलेच कसे?

सचिवाच्या अहवालावरुन चांदुर बाजार तालुक्यातील कुरळ पूर्णा येथील ग्रामपंचायत सदस्य मंदा पोहणे यांनी शासकीय जागेत अतिक्रमण केल्याबद्दल अप्पर जिल्हाधिकारी गोविंदा पाणेज यांनी त्यांना अपात्र ठराविले. मात्र दर्यापूर तालुक्यातील लोतवाडा येथील सरपंच, उपसरपंच व अन्य दोन सदस्यांनी शासकीय जागेत अतिक्रमण केले व तसा अहवाल सचिव यांनी दिल्यावरही अप्पर जिल्हाधिकारी यांनी चारही जणांना पात्र ठरविलेच कसे?

**-भिमराव कुऱ्हाडे, तक्रारकर्ते**

### अमरावतीत २६ जून रोजी उद्योजक

व्यवसायासाठी एक महत्त्वाचा दस्तऐवज ठरेल.

अमरावती जिल्ह्यातील जास्तीत जास्त उद्योजकांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे. उपस्थिती नोंदवण्यासाठी https://forms.gle/vnbzshL8h7varWqU6 या लिंकवर जाऊन नोंदणी करावी. कोणत्याही अडचणीसाठी ९७३०८६२८७० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### शाळेच्या पहिल्या दिवशी जिल्हाधिकाऱ्यांकडून

जावेद अहमद, विस्तार अधिकारी अजित पाटील, अंगणवाडी पर्यवेक्षिका अर्चना ठाकरे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले, महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाची दारे सर्वांना खुली केली. त्यांनी मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिल्यामुळे आज शाळेमध्ये विद्यार्थिनींची संख्या तुलनेत जास्त आहे. आज मुली सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहेत, याचा आनंद आहे. कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी मेहनत आवश्यक आहे. शासकीय शाळा खाजगी शाळांपेक्षा कुठेही कमी नाहीत. मी ही शासकीय शाळेचा विद्यार्थी आहे. विद्यार्थ्यांनी वेळेचे महत्त्व जाणून अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. बलस्थानावर लक्ष देऊन यश मिळवावे, असे सांगितले. पालकांनीही मुलांना मोबाईलपासून दूर ठेवावे. शैक्षणिक कार्यासाठीच मोबाईलचा उपयोग व्हावा. विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनाचे वय आहे. विद्यार्थ्यांची प्रगतीची जबाबदारी ही शिक्षकांसह पालकांचीही आहे. भविष्यातील सुज्ञ नागरिक तयार करण्याची जबाबदारी शिक्षक आणि पालक या दोघांची असल्याचे जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले.जिल्हाधिकारी येरेकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्य संचाचे वाटप करुन त्यांना नवीन शैक्षणिक सत्रासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी देखील आम्ही चांगला अभ्यास करून प्रगती करू, असा मनोनिर्धार यावेळी व्यक्त केला. यावेळी विद्यार्थी, शिक्षक गण, पालक, ग्रामस्थ उपस्थित होते.

### भारताचे माजी सरन्यायाधीश

यांच्या सत्कारानिमीत्य वकील बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. माजी सरन्यायाधीश एन. व्ही. रमना यांच्या सह अनेक गणमान्यांची उपस्थिती सदर सोहळ्याला राहणार आहे.

वकील बांधवांनी व मान्यवरांनी वेळेच्या किमान १५ मिनीटे अगोदर सभागृहात स्थानापन्न व्हावे अशी विनंती अमरावती वकील संघातर्फे करण्यात आली आहे.

### सामान्य रुग्णांची ओपीडीच्या

उपजिल्हा रुग्णालयात प्रसूती ,शस्त्रक्रिया ,विविध तपासणी ,उपचारासाठी तालुक्यातून नव्हे तर मेळघाट सह विविध भागातून गोरगरीब रुग्ण येतात. पण याचाच फायदा घेत काही कर्मचारी या रुग्णांच्या नातेवाईकांकडून आर्थिक लूट करीत असल्याच्या अनेक तक्रारी आ.प्रवीण तायडे यांच्या कडे नागरिकांनी मांडल्या. ओपीडी साठी कोणतीही शुल्क नसताना गंभीर अवस्थेत येणाऱ्या रुग्णाच्या नातेवाईकांकडून उपचाराच्या नावावर ओपीडी साठी काही कर्मचारी आर्थिक लूट करीत असल्याच्या तक्रारी आ.प्रवीण तायडे यांच्या कडे नागरिकांनी केल्या होत्या.यामुळे आज आ.प्रवीण तायडे यांनी अचलपूर उपजिल्हा रुग्णालयातील अपघात कक्षाच्या समोरील कर्मचाऱ्यांना या संदर्भात जाब विचारला.यावेळी कर्मचारी अनुत्तरीत असल्याचे पाहायला मिळाले.यामुळे अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात गोरगरीब रुग्णाची होणारी आर्थिक लुट या प्रकाराकडे अचलपूर उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.विजय सिरसमकर लक्ष देणार का ? हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

### अवैध व्यवसायांवर तत्काळ

ऑनलाईन लॉटरी सुरू आहे.स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्या व्यवसाय चालत आहे. जिल्ह्यात गोवंशांची अवैध वाहतुक, कत्तलखाने व तस्करी खुलेआम सुरू आहे. एमडी ड्रग्स व गांजा सारख्या पदार्थांची विक्री सुरू असल्याने यावर आळा घालण्यासाठी स्पेशल टीम बनवण्यात यावी. सर्व फेरीवाले, भंगार विक्रेते, भाजीवाले यांना प्रशासनाच्या वतीने ओळखपत्र देण्यात यावे जेणेकरून कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही. शहरात गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी प्रशासनाने जितके अल्पवयीन आहेत अश्या गुन्हेगारांचा सर्वे करून हत्या, चोरी आणि विविध गुन्ह्यात सहभागी अल्पवयीनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक समिती स्थापित करून त्यांच्यावर नजर ठेवावी. निवेदन देताना पूजा जोशी, प्रिया इंगोले,सविता भागवत, कल्याणी मुदलियार, डॉ.सुनील जासूदकर ,तुळजा जासूदकर, जुगल ओझा, अनुप बचे,सुधीर शेळके, डॉ. कवलजीत पांडे, सोनू शाहू, रंजना पांडे आदि उपस्थित होते.

### अचलपूर शहरातील बस स्थानकाच्या

परतवाडा येथील बस स्थानकातून अमरावती ,अकोला आणि अनेक ठिकाणी बाहेरगावी जाणाऱ्या प्रवाशी वर्गासाठी बस फेऱ्या उपलब्ध आहे.यामुळे अचलपूर शहरातील बंद बस स्थानक इतिहास जमा होण्याच्या मार्गावर वाटचाल करीत आहे. नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करून अचलपूर शहरातून ऑटो,दुचाकी ,चारचाकी वाहनांने परतवाडा बस आगारात जावे लागते . अचलपूर शहरातील बंद बस स्थानकाला नवसंजीवनी देण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने साडे चार कोटीचा निधी त्या बस स्थानकाच्या पुनर्बांधणीसाठी गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात मंजूर ही झाला.तत्कालीन आमदार यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अमरावती विभागीय नियंत्रक आणि परतवाडा बस आगार प्रमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत भूमिपूजन सोहळा संपन्न झाला होता. पण संबधित अधिकाऱ्यांच्या उदासीन धोरणामुळे त्या बस स्थानकाच्या पुनर्बांधणीचे काम थंडबस्त्यात आहे .अचलपूर शहरातील बंद बस स्थानकाच्या परिसरात शासनाच्या कोट्यवधी रुपयांचा निधीतून निर्माण केलेले सिमेंट चे प्लॅट फॉर्म शोभेची वस्तू बनली आहे. यामुळे साडे चार कोटीचा निधीतून लवकर अचलपूर शहरातील बंद बस स्थानकाच्या परिसरात पुनर्बांधणीसाठी नवीन ईमारत,सुरक्षा भिंत ,प्रवाशी वर्गाच्या सुविधेसाठी बस फेऱ्या ची संख्या वाढवून अचलपूर शहरातील नागरिकांना सर्व सुविधा उपलब्ध करण्यासाठी संबधित अधिकाऱ्यांनी ठोस पावले उचलण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### विधान भवनात सगळे

सामोरे जाईन, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

**षंढ शब्दावरून हक्क भंग आणू** : गुलाबराव पाटील

संदीप देशपांडे यांनी राज्य सरकारवर केलेल-या बोर्च-या टीकेवर मंत्री गुलाबराव पाटील यांनी मनसेला इशारा दिला आहे. संदीप देशपांडे यांनी महाराष्ट्र विधीमंडळाचा अवमान केला आहे. षंढ या शब्दावरून हक्क भंग आणू , असे त्यांनी म्हटले आहे. तर भाषा समजण्यासाठी तुम्हाला निवडून यावं लागेल, अशी खोचक टीका शिवसेना नेत्या नीलम गो-हे यांनी केली आहे.

### श्राद्धाच्या ११ दिवसांनंतर

तीरावर एका महिलेचा मृतदेह आढळला. मृतदेह कुजलेला होता, परंतु मृतदेहाची उंची रमा देवीशी जुळत होती. कुटुंबीयांनी पोलिसांना माहिती दिली आणि हा मृतदेह रमा देवींचा असल्याचा संशय व्यक्त केला.

### पंजाब, गुजरातमध्ये 'आप'

**केवळ कडी मतदारसंघ भाजपकडे-** कडी मतदारसंघात भाजपचे राजेंद्र चावडा यांनी ३९००० हून अधिक मताधिक्याने विजय मिळवला. ही सुरक्षित जागा फेब्रु वारीत आमदार कर्सन सोलंकी यांच्या निधनामुळे रिकामी झाली होती. काँग्रेसकडून रमेश चावडा आणि अअढकडून जगदीश चावडा हे उमेदवार होते.

**केरळात काँग्रेस आघाडीचा निर्णायक विजय-** निलांबूरमध्ये काँग्रेस आघाडीने आपला मजबूत गड राखला. आर्याडन शोकत यांनी डाव्या आघाडीचे एम. स्वराज यांचा ११००० मतांनी पराभव केला. शोकत हे माजी मंत्री आर्याडन मोहम्मद यांचे पुत्र असून त्यांचा मोठा जनाधार आहे. ही जागा प्रियंका गांधी यांच्या वायनाड लोकसभा मतदारसंघात येते, त्यामुळे काँग्रेससाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची झाली होती.

### मोदीजी हे विश्वगुरू

एका बाजूला लढत होते, तेव्हा पंतप्रधानांनी आम्हाला सर्वपक्षीय बैठकीचे आमंत्रण देउन दुस-या बाजूला प्रचार करण्याचा निर्णय घेतला. हे अन्याय्य आहे. यापूर्वी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्रातील मोदी सरकारच्या ११ वर्षांच्या कारकिर्दीवर प्रश्न उपस्थित केले होते. ९ जून रोजी त्यांनी म्हटले होते की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या ११ वर्षात ३३ चुका केल्या आहेत.

### अमेरिकेच्या सैन्य तळांवर

घेतल्यास मध्य पूर्व आशियातील त्यांच्या सैनिकी तळांवर हल्ले करू, अशी थेट धमकी इराणने आधीच दिली होती. त्यामुळे हा हल्ला इराणनेच केलेला असण्याची शक्यता आहे. सूत्रांच्या माहितीनुसार पश्चिमी हसाका प्रांतातील एका भागात असलेल्या अमेरिकेच्या लष्करी तळाला लक्ष्य करण्यात आले. या हल्ल्यानंतर तळाच्या मुख्य प्रवेशद्वारावरील सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. संयुक्त राष्ट्रात इराणचे राजदूत आमिर सईद इरावानी यांनी ३ ठिकाणांवर प्रत्युत्तरादाखल हल्ल्याचे संकेत दिले होते.

### देशात फक्त 16 दिवसांचा

नाही, फक्त सतर्क राहण्याची गरज आहे असल्याचे सुत्रानुसार कळाले.

गेल्या दशकात भारतातील एलपीजीचा वापर दुप्पट झाला आहे. सरकारी योजनांमुळे आता ३३ कोटी घरांपर्यंत एलपीजी सिलेंडर पोहोचले आहेत. यामुळे भारताची आयातीवरील अवलंबिता देखील खूप वाढली आहे. आपण आपल्या ६६ऽ एलपीजी गरजा आयातीतून पूर्ण करतो आणि त्यापैकी सुमारे ९५ऽ हिस्सा सौदी अरब, यूएई आणि कतार यांसारख्या पश्चिम आशियाई देशांतून येतो.

### मुंबईला पावसाचा ऑरेंज

एकंदरीतच लवकर आलेला अवेळी पाउस व घाट रस्त्यांमधील सुरू असलेली काम वेळेवर योग्य पद्धतीने नियोजन करून पूर्ण न झाल्याने याचा फटका बसला आहे. यामुळे अवजड वाहतूक व अनेक प्रवासी वाहनांना पश्चिम पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर, पुणे, सांगली, सातारा तसेच यामार्गे मार्गे मराठवाडा विदर्भ जाण्यासाठीही लांबच्या मार्गांचा वापर करावा लागत आहे.

### जम्मूला निघालेले विमान पुन्हा

सोमवारी उड्डाणानंतर काही वेळातच तांत्रिक बिघाड झाल्याचं आढळून आलं. त्यामुळे विमानाला पुन्हा दिल्लीला परतावं लागलं आहे. एअरबस ए ३२० द्वारे चालवले जाणारे फ लाइट आयएक्स २५६४ या विमानाने सकाळी ११:०४ वाजता दिल्लीहून उड्डाण केलं होतं. हे विमान दुपारी १२:०५ वाजता जम्मूमध्ये उतरणार होतं. मात्र, जम्मूमध्ये उतरण्याऐवजी हे विमान पुन्हा दिल्लीला परतलं. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.

या घटनेची पुष्टी करताना एअर इंडिया एक्सप्रेसच्या प्रवक्त्याने सांगितलं की, जीपीएसमध्ये अडथळा निर्माण झाल्याच्या संशयानंतर खबरदारीचा उपाय म्हणून दिल्लीवरून जम्मूला जाणारं विमान पुन्हा दिल्लीला परतलं आहे. मात्र, त्यानंतर जम्मूला जाण्यासाठी त्या विमानातील प्रवाशांना पर्यायी विमानाची व्यवस्था करण्यात आली आहे. पण तरीही झालेल्या गैरसोयीबद्दल आम्हाला खेद आहे, असं प्रवक्त्याने म्हटलं आहे.

### वारीबाबत वादग्रस्त विधान

उत्सव का साजरे होतात याची तक्रार केली नाही. पण ज्यावेळी मशीद पूर्ण भरते तेव्हा काही मशिदीतील लोकं ५ ते १० मिनिटे रस्त्यावर नमाज पठण करतात, त्यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणतात रस्त्यावर नमाज पठण केले तर पासपोर्ट रद्द करु . मी पुण्यातून येताना मला लोकांनी सांगितलं लवकर जावा, नाही तर पालख्यामुळे रस्ता जाम होईल.

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ मंगळवार, २४ जून २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com

mail : jmakola.thakur@gmail.com


## जलसंवर्धनासाठी जलताराची आजची कृती, उद्याचं भवितव्य सुरक्षित करेल - जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**पाण्याचा एक थेंब वाचवणं म्हणजे भविष्याची एक आशा जपणं! वाढती जलटंचाई, कोरडी होत चाललेली भूजल पातळी आणि बदलत्या हवामानाच्या संकटात वाशिम जिल्ह्याने एक सकारात्मक आणि सामूहिक कृतीची दिशा स्वीकारली – ती म्हणजे वत्सगुल्म भूजल पुनर्भरण स्पर्धा २०२५. ही स्पर्धा एक चळवळ ठरली श्रमदानातून साकारलेली, लोकसहभागातून उभी राहिलेली आणि पर्यावरणप्रेमातून वाढलेली.**




- वत्सगुल्म भूजल पुनर्भरण स्पर्धा २०२५
- बक्षीस वितरण समारंभ उत्साहात संपन्न
- जलता-यांतून उगवतेय भविष्याची आशा
- जिल्ह्यात जनुना खुर्द गावाने पटकाविला प्रथम क्रमांक

गावकऱ्यांनी हातात फावडे घेतले आणि जमिनीला दिला नवजीवनाचा श्वास. तिथं केवळ जलतारे तयार झाले नाहीत, तर निर्माण झाली उमेद, एकजूट आणि जलजागरूकतेची नवी ओळख. जिल्ह्यातील सर्वच ग्रामपंचायतींनी दाखवलेला उत्साह, बांधिलकी आणि जलप्रेम पाहून मन भरून येते. 'वत्सगुल्म भूजल पुनर्भरण स्पर्धा' ही केवळ प्रशासन पुरस्कृत स्पर्धा नाही तर ही लोकशक्तीचा जागर आहे. गावकऱ्यांनी जेव्हा जलतारे खोदले, तेव्हा त्यांनी केवळ मातीच हलवली नाही तर भविष्यासाठी आशा रुजवली. ही चळवळ प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि सामान्य नागरिक यांना एका ध्येयाने एकत्र आणणारी ठरली आहे.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी केले. भूजल संवर्धनासाठी जिल्हा प्रशासनातर्फे राबविण्यात आलेल्या 'वत्सगुल्म भूजल पुनर्भरण स्पर्धा २०२५' चा बक्षीस वितरण समारंभ वाटाणे लॉन, वाशिम येथे आज दि.२१ जुन रोजी उत्साहात पार पडला.यावेळी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. उपस्थित होत्या.प्रमुख अतिथी म्हणून शिक्षक आमदार किरणराव सरनाईक, आमदार श्याम खोडे, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, परिविक्षाधीन जिल्हाधिकारी आकाश वर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपजिल्हाधिकारी कैलास देवरे, प्रकल्प संचालक अनिसा महाबळे , जलताराचे जनक डॉ. पुरुषोत्तम वायाळ, समता फाउंडेशनचे उत्तमचंद बगडिया, तिफनचे फाउंडेशनचे देशमुख, समाजसेवक मारशेटवार गुरुजी, वेदमुथा, कृषी उत्पन्न बाजार समिती वाशिमचे माधवराव काकडे, मानोरा येथील भुजंगराव राठोड, कारंजा येथील भालचंद्र जाधव, ब्रह्मकुमारी स्वाती दिदी, आर्ट ऑफ लिव्हिंगचे संचालक डॉ.हरिष बाहेती, डॉ.सरोज बाहेती, सुभाषराव नानोटे, माजी नगराध्यक्ष अशोक हेडा, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुभाष चौधरी , सामाजिक कार्यकर्ते राजु पाटील राजे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. स्पर्धेत प्रथम क्रमांक जनुना खुर्द, द्वितीय क्रमांक मालेगाव तालुक्यातील कोळदरा तर तृतीय क्रमांक रिसोड तालुक्यातील वाघी खुर्द या गावांना मिळाला. या कार्यक्रमाची सुरुवात अहमदाबाद येथे विमान दुर्घटनेमध्ये मृत्युमुखी पडलेल्या बांधवांना व अरण्यरुषी पद्मश्री मारुती चितमपल्ली यांना श्रद्धांजली अर्पण करून झाली. दीपप्रज्वलन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हरीष बाहेती यांनी केले.

## ३९ वी विदर्भ केसरी कुस्ती स्पर्धेसाठी बुधवारी निवड चाचणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■



विदर्भातील कुस्ती क्षेत्रात मानाची समजली जाणारी ३९ वी विदर्भ केसरी, कुमार मुले-मुली गटातील कुस्ती स्पर्धा यावर्षी पुसद येथे २७ते २९ जून या कालावधीत होणार आहे. या स्पर्धेसाठी वाशिम जिल्ह्यातील पात्र कुस्तीगीरांची निवड करण्यासाठी बुधवारी, २५ जून रोजी मंगरूळपीर येथील सांस्कृतिक भवनात वाशिम जिल्हा निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी १० ते १२ या वेळेत वजन चाचणी घेतली जाईल. त्यानंतर दुपारी १२.३० वाजता कुस्त्यांना प्रारंभ होईल. सर्व स्पर्धा गादीवर (मॅटवर) घेतल्या जाणार आहेत. जिल्ह्यातील कुस्तीप्रेमींसाठी ही एक पर्वणीच ठरणार आहे. या चाचणीमध्ये वजन गट पात्रतेमध्ये पुरुष गट : ५७, ६१, ६५, ७०, ७४, ७९ ते १२० किलो, १४ वर्षाखालील कुमार मुले मध्ये ३४, ३८, ४२, ४६, ५० किलो, १७ वर्षाखालील कुमार मुले मध्ये ४५, ५१, ६०, ७१, ८०, ९२, ११० किलो, महिला गटामध्ये ४६, ५०, ५३, ५७, ६२, ६५, ६८ किलो, १४ वर्षाखालील कुमार मुली ३३, ३६, ३९ किलो, १७ वर्षाखालील कुमार मुली ४०, ४३, ४६, ४९ किलो असे वजनगट असणार आहेत. जिल्ह्यातील होनहार कुस्तीगीरांसाठी विदर्भ केसरीसारख्या व्यासपीठावर आपली ताकद सादर करण्याची ही नामी संधी आहे. इच्छुकांनी वेळेत उपस्थित राहून आपले नाव नोंदवावे, असे आवाहन वाशिम जिल्हा कुस्तीगीर असोसिएशनचे अध्यक्ष नितीन मडके, उपाध्यक्ष पुरुषोत्तम तुपसांडे, सचिव ज्ञानेश्वर गादेकर, सहसचिव पंजाबराव देशमुख, कोषाध्यक्ष गणेश उदगिरे, सदस्य विनोद राऊत, समाधान खांडेकर यांनी केले आहे.

## बाल शिवाजी मराठी विद्यानिकेतन येथे प्रवेशोत्सव



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

स्थानिक बाल शिवाजी मराठी विद्यानिकेतन मालेगाव येथे दिनांक २३ जून रोजी शाळेच्या पहिल्या दिवसाच्या औचित्य साधून सुंदर अशा प्रवेशोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये प्रवेशोत्सवाची सुरुवात ही इयत्ता पहिली प्रवेश घेतलेल्या नवीन मुलांच्या हातामध्ये पुष्पगुच्छ पाठ्यपुस्तके व तसेच त्यांच्या शाळेतील पहिल्या पावलांचे ज्ञान ठसे पांढराशुभ्र कोऱ्या अशा कापडावर उमटून करण्यात आले कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे अध्यक्ष अरविंद देशमुख तसेच शाळेच्या सचिव रंजना देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन फीत कापून करण्यात आले. मुख्याध्यापक प्रशांत देशमुख यांनी मुलांचे औक्षण करत त्यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तर शाळेतील शिक्षक वृंदांनी पहिल्या दिवशी उपस्थित असलेल्या सर्व मुलांवर पुष्प वर्षाव करत त्यांचे स्वागत केले प्रवेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शाळेतील सर्व वर्ग खोल्यांची रंगीबेरंगी फिती व बलून लावून सजावट करण्यात आले होते.

## दोन कुख्यात गुंड एक वर्षासाठी स्थानबद्ध

### गांजा विक्रेता शेट्टी व बेलेवर एमपीडीएची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला शहरातील दोन कुख्यात गुन्हेगारांना 'एम. पी. डी. ए. कायद्या'अंतर्गत एक वर्षाकरिता जिल्हा कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली ही महत्त्वपूर्ण कार्यवाही पार पडली.

जब्बार किराणा मागे, पुरपिडीत कॉर्टर, अकोट फाईल येथे राहणारा संतोष उर्फ शेटटी पुरुषोत्तम यंगड (वय ३३) व लाडीस फाईल, अकोट फाईल येथील ऋषीकेश उर्फ रूषी अंबादास बेले (वय २३) या दोघांवर खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, दंगा, शांतताभंग, शस्त्र बाळगणे यासारख्या गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत. यापूर्वी त्यांच्यावर प्रतिबंधक कारवाया करण्यात आल्या होत्या, मात्र त्याचा काहीच परिणाम झाला नव्हता.



या दोघांच्या गुन्हेगारी वृत्तीवर आळा बसावा व जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्थेवर परिणाम होऊ नये, या उद्देशाने पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी त्यांना स्थानबद्ध करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्याकडे सादर केला होता. संबंधित प्रकरणाच्या सर्व कायदेशीर बाबींची तपासणी केल्यानंतर व गोपनीय स्त्रोतांतून माहिती मिळवून दोन्ही आरोपी धोकादायक असल्याचे निष्पन्न झाल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी २३ जून २०२५ रोजी त्यांना एक वर्षाकरिता स्थानबद्ध ठेवण्याचा आदेश जारी केला. या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक शंकर शेळके, अकोट फाईल पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शेख रहीम यांच्यासह अनेक पोलीस अधिकारी व अंमलदारांनी विशेष मेहनत घेतली. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'अकोला जिल्ह्यात कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अशा सराईत गुन्हेगारांविरुद्ध आगामी निवडणूक व सणउत्सवाच्या पार्श्वभूमीवर एम.पी.डी.ए.सह अन्य कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार आहे.' जानेवारी २०२५ पासून आतापर्यंत अकोला जिल्ह्यातील १० धोकादायक व्यक्तींना स्थानबद्ध करण्यात आले आहे, अशी माहिती दिली.

## शेतीच्या वादातून वृद्ध शेतकऱ्यावर हल्ला; सात आरोपींवर गुन्हा दाखल

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

तालुक्यातील चिवरा गावात शेतीच्या जुन्या वादातून झालेल्या भांडणात एका ६० वर्षीय शेतकऱ्याला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना समोर आली आहे. या घटनेप्रकरणी मालेगाव पोलिस ठाण्यात गंभीर कलमांखाली सात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चिवरा येथील रहिवासी महादेव हरी मुठाळ (६०) यांनी तक्रार दाखल केली आहे की, २१ जून रोजी रात्री ८ ते ८:३० च्या दरम्यान त्याच गावातील नारायण हरी मुठाळ आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी हातात काठ्या आणि रॉडने त्यांच्यावर हल्ला केला. जमिनीच्या वादातून त्यांनी त्याला आणि त्याच्या कुटुंबाला शिवीगाळ केली आणि त्याच्या मुलावर आणि पत्नीवर



हल्ला केला. तसेच त्याला जीवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणात पोलिसांनी आरोपी नारायण हरी मुठाळ, किशन नारायण मुठाळ, आशा नारायण मुठाळ, मोतीराम हरिभाऊ मुठाळ, गोलू मोतीराम मुठाळ, विकास मोतीराम मुठाळ आणि नंदा शंकर मुठाळ, हे सर्व रहिवासी चिवरा, तहसील मालेगाव यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचा तपास एसएचओ संजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशांत वानखेडे करत आहेत.

## वाशिम येथे रिपब्लिकन फेडरेशनची बैठक संपन्न

### जे. एस. शिंदे यांची जिल्हा संयोजक पदी निवड



■ प्रतिनिधी | वाशिम ■

येथे दि २१ जुन रोज शनिवारी रिपब्लिकन फेडरेशन ची बैठक जे. एस. शिंदे यांच्या अध्यक्षतेत संपन्न झाली. बैठकीमध्ये रिपब्लिकन फेडरेशन, नागपूर चे मुख्य संयोजक, आयु. मिलिंद पखाले उपस्थित होते. बैठकीत बोलताना त्यांनी सांगितले की सध्या आंबेडकर वादी समाज खूप उदासीन अवस्थे मध्ये आहे कारण मागच्या अनेक निवडणुकीत आंबेडकर वादी पक्षाला पूर्ण पणे अपयश आलेले दिसत आहे. तसेच आज सर्व च आंबेडकर वादी पक्ष समाजाच्या प्रश्नावर मुंग गिळून बसल्यासारखे गप्प आहेत. म्हणून बाबासाहेब आंबेडकर यांच्या रिपब्लिकन विचारावर आधारित आणी पूर्ण अंतर्गत लोकशाही मानणारा पक्ष असावा, अशी लोकभावना आहे म्हणून आम्ही 'रिपब्लिकन फेडरेशन' या नावाने नागपूर येथे दि १४ जून २०२५ ला घोषित केला आहे.हा पक्ष शिक्षण व शिक्षणातील अनेक प्रश्न तसेच शिक्षणाचे खाजगीकरण, बेरोजगारीचा प्रश्न तसेच अन्याया च्या प्रश्नावर लढेल, आणी अशा सर्व प्रश्नावर हा पक्ष काम करेल आणी आज त्याचाच भाग म्हणून आपण वाशीम येथे सुरु करायचे ठरवत आहोत. या भूमिकेला उपस्थित सर्वांनी सहमती दर्शवली तसेच या भूमिकेच्या समर्थनात आयु. दीपक ढोले, पत्रकार गजानन गवई, ॲड. हिरामण मोरे, प्रा गोविंद वैद्य,अनंत तायडे इत्यादी नी आपली भूमिका मांडली.

## अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ कार्यकारिणीची सभा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ वाशिम जिल्हा कार्यकारिणीची बैठक दि. २२ जून रोजी महामंत्री प्रा. विलास गायकवाड यांच्या निवासस्थानी वाशिम येथे पार पडली. सभेला अध्यक्ष म्हणून अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ अमरावती विभागीय कार्यकारिणीचे उपाध्यक्ष प्रा. सच्चिदानंद बिच्चेवार हे उपस्थित होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून वाशिम जिल्हा कार्यकारिणीचे अध्यक्ष प्रा. ठकसेन राजगुरे हे उपस्थित होते. बैठकीचे प्रस्ताविक महामंत्री प्रा. विलास गायकवाड यांनी केले. बैठकीच्या आयोजनाचा उद्देश आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी स्पष्ट केला.

## विद्यार्थ्यांचे औक्षण करून शैक्षणिक वर्षाची सुरवात

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम येथील विद्याभारती शाळेत सत्र २०२५-२६ विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. दि २२ जून रोजी शालेय स्वच्छता करून, रविवारी शाळापूर्व तयारी नियोजन करण्यात आले. दीर्घ सुट्ट्यांचा आनंद उपभोगून शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळा हवीहवीशी वाटावी यासाठी दि.२३ जून रोजी प्रवेश उत्सव विविध उपक्रमांसह साजरा करून २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यात आली.

इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना तसेच पहिल्या दिवशी शाळेत येणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांचे अतिशय आनंदाने आपल्या भारतीय संस्कृती



प्रमाणे प्रथम दिवसाची सुरुवात ही शुभ व्हावी यासाठी विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना शाळेमध्ये प्रवेश देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी लेझीम पथकासमवेत प्रवेश दिंडी व प्रभात फेरी काढण्यात आली. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजन करून मान्यवरांच्या हस्ते नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले आहे. त्यानंतर उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे अध्यक्ष प्रा. सुरेशराव मिटकरी, शाळेचे संचालक भीमरावजी गंगावणे, शाळेचे संचालक सुमित सुरेशराव मिटकरी तसेच मुख्याध्यापक नितेश मिटकरी व शाळेचे पर्यवेक्षक विजय गोटे यांच्या हस्ते पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले. तसेच तसेच सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकासोबत एक सुंदर भेट वस्तू तसेच त्यांना शाळेच्या प्रथम दिवसाच्या शुभेच्छा देणारे शुभेच्छापत्र सुद्धा देण्यात आले. शाळेचे अध्यक्ष प्रा. सुरेशराव मिटकरी यांनी यावेळी बालकांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच पुढील शैक्षणिक वर्षाकरिता शुभेच्छा दिल्या. यादिवशी विद्यार्थ्यांना नवीन विशेष वाटावे तसेच सर्वांना स्मरणात राहण्याकरिता शाळेच्या प्रांगणामध्ये सुंदर असा सेल्फी पॉईंट देखील तयार करण्यात आला व सर्व विद्यार्थ्यांचे सुंदर असे छायाचित्र देखील घेण्यात आले.

## आ. श्याम खोडे यांनी केले खरात कुटुंबाचे सांत्वन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

मंगरूळपिर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय,कर्तव्यदक्ष आमदार श्यामभाऊ खोडे यांनी शनिवार २१ जून रोजी अनसिंग येथील खरात व लाटे कुटुंबाची भेट घेवून त्यांचे सांत्वन केले.तसेच तनुजा खरात यांचे पती अनिल खरात यांना आ.खोडे यांनी चार लाख रुपयाचा धनादेश देवून मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अजून आर्थिक सहाय्य करण्यासाठी पुढाकार घेणार असल्याची ग्वाही आ.खोडे यांनी दिली.तर गंभीर जखमी झालेल्या गंगाबाई लाटे यांना पुढील उपचारासाठी आर्थिक मदत देणार असल्याची माहिती यावेळी आ.खोडे यांनी दिली. १२ जून रोजी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास अनसिंग येथील तनुजा अनिल खरात (१९ वर्ष) आणि गंगाबाई लाटे (४० वर्ष) या त्यांच्या घरापासून जवळच असलेल्या शेतामध्ये पिण्याचे पाणी आणण्यासाठी गेल्या होत्या.अचानक त्यावेळी विजांचा कडकडाट सुरू झाला. दोघीही पाणी घेवून घरी परत येतांना तनुजा खरात हिच्या अंगावर वीज पडून ती जागीच ठार झाली.तर सोबत असलेल्या गंगाबाई लाटे गंभीर जखमी झाल्यात.या नैसर्गिक आपत्तीमुळे खरात परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला. वाशीमचे आमदार श्यामभाऊ खोडे यांनी शनिवार २१ जून रोजी सकाळी अनसिंग येथे खरात व लाटे कुटुंबाची भेट घेवून दोन्ही कुटुंबाचे सांत्वन केले.

## शरीराच्या, मनाच्या आणि आत्म्याच्या समतोलासाठी योगाची भूमिका अत्यंत महत्त्वाची - आ. सरनाईक

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**योग ही भारताची प्राचीन आणि अमूल्य देणगी आहे. आपल्या शरीराच्या, मनाच्या आणि आत्म्याच्या समतोलासाठी योगाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाने दररोज काही वेळ योगासाठी द्यायला हवा,' असे आवाहन आमदार किरणराव सरनाईक यांनी यावेळी केले.**

### वाशिममध्ये ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात



'योग: कर्मसु कौशलम' या भगवद्गीतेतील शिकवणीनुसार योग ही केवळ व्यायामाची पद्धत नसून, ती आरोग्य, समतोल आणि मानसिक शांती प्राप्त करण्याची जीवनशैली आहे. 'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग' या २०२५ सालच्या संकल्पनेनुसार वाशिम शहरातील वाटाणे लॉन येथे उत्साहात संपन्न झाला. आयुष मंत्रालय, भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार, जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद तसेच विविध योग संस्थांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीत विधानपरिषद सदस्य आमदार किरणराव सरनाईक बोलत होते . याप्रसंगी जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस., परिविक्षाधीन जिल्हाधिकारी आकाश वर्मा, तहसीलदार निलेश पळसकर, शिक्षणाधिकारी आकाश आहाळे, मुख्याधिकारी निलेश गायकवाड, जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर भोंडे, क्रीडा अधिकारी मारोती सोनकांबळे आणि 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चे योगप्रशिक्षक डॉ. हरिष बाहेती, आयुष विभागाच्या योग थेरपीस्ट तेजस्विनी माणिकराव, पतंजली योगसमितीचे डॉ. भागवत वानखेडे, पतंजली महिला योग समितीच्या दिपा वानखेडे आदींचा समावेश होता. यावेळी उपस्थितांना आमदार किरणराव सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली 'योग प्रतिज्ञा' देण्यात आली. योग दिनाच्या कार्यक्रमात क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, क्रीडा पुरस्कारार्थी, खेळाडू मार्गदर्शक, स्काउट्स गाइड, एन एस एस, एनसीपी, योगसाधक,नागरिक, महिला, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक, आरोग्य विभागाचे कर्मचारी, पोलीस कर्मचारी तसेच अनेक सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमात प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून योगाचे विविध आसन, प्राणायाम व ध्यान यांचे महत्त्व सांगण्यात आले. योग प्रशिक्षकांनी साधकांना व उपस्थितांना योग्य पद्धतीने योग करण्याचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस्विनी माणिकराव यांनी केले.जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या संयोजनात वाटाणे लॉनचे संचालक शिवाजीराव दिनकरराव वाटाणे यांच्या सहकार्याने पार पडले. आयोजन व संयोजन विदयाभारतीचे जिल्हा अध्यक्ष प्रा.दिलीप जोशी यांनी केले. कार्यक्रमानंतर बोलताना जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. म्हणाल्या की, योग ही जीवनशैली आहे. शरीर आणि मन दोन्ही आरोग्यपूर्ण ठेवण्यासाठी योग अत्यंत उपयुक्त आहे. त्यांनी पुढे सांगितले की, शालेय विद्यार्थ्यांपासून वरिष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी दररोजच्या जीवनात योगाचा अंगीकार करणे आवश्यक आहे.

योग दिनानिमित्त वाशिम जिल्ह्यातील वाटाणे लॉन हे योगाच्या सामूहिक शक्तीचे केंद्र ठरले. विविध संस्था आणि नागरिकांच्या एकत्रित सहभागातून 'एक पृथ्वी, एक आरोग्य' या संकल्पनेची मूर्त अमलबजावणी घडून आली. नियमित योग साधना ही आरोग्याचा मूलमंत्र असून त्याद्वारे समाजातील सकारात्मकतेला चालना मिळते, अशा भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केल्या. आभार किशोर भोंडे यांनी मानले.कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २०९ ■ मंगळवार, २४ जून २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# जिल्हा वार्षिक योजनेचा शंभर टक्के निधी खर्च करा-पालकमंत्री डॉ.भोयर

## -पालकमंत्र्यांकडून जिल्हा नियोजन समितीचा आढावा

## - वार्षिक योजनेची कामे गुणवत्तापुर्वक करण्याचे निर्देश

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून विविध विभागांना निधी दिला जातो. हा निधी कोणत्याही परिस्थितीत शासनास परत न जाता शंभर टक्के खर्च झाला पाहिजे. या योजनेतून कामे करतांना गुणवत्तापुर्वक करा. विकासाची चांगली कामे करून जिल्ह्याचे नाव लौकिक कसे करता येतील यासाठी विभागांनी प्रयत्न करावे, अशा सूचना पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केल्या.

नियोजन भवन येथे पालकमंत्र्यांनी मागील वर्षातील सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजनेचा झालेला खर्च, या आर्थिक वर्षातील या तिनही योजनेतून मे महिना अखेरपर्यंत झालेल्या खर्चाचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते.

बैठकीला पालकमंत्र्यांसह खा.अमर काळे, आ.दादाराव केचे, आ.समीर कुणावार, आ.सुमित वानखेडे, आ.राजेश बकाने, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन, जिल्हा पोलिस अधीक्षक अनुराग जैन, उपवनसंरक्षक हरविर सिंह, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, जिल्हा नियोजन अधिकारी अनिरुद्ध राजुरवार यांच्यासह सर्व विभागप्रमुख अधिकारी उपस्थित होते.

सुरुवातीस जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी मागील वर्षाचा खर्च व यावर्षातील आतापर्यंत झालेल्या खर्चाची माहिती सादर केली. मागील वर्षी तिनही योजनेतून ३७४ कोटी ४५ लाख ६२ हजार इतका निधी मंजूर होता. त्यापैकी ३७४ कोटी ४३ लाख ६२ हजार इतका खर्च झाला. खर्चाची टक्केवारी ९९.९९ इतकी आहे. मागील वर्षात सर्व यंत्रणांनी केलेल्या उत्कृष्ट



कामासाठी पालकमंत्र्यांनी कौतूक केले. यावर्षी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेत ३५० कोटी, अनुसूचित जाती उपयोजना ४४ कोटी तर आदिवासी उपयोजनेत १८ कोटी ७० लाख असे ४१२ कोटी ७० लाख रुपये मंजूर आहेत.

या निधीतून जिल्ह्यात विकासाची चांगली कामे करा. प्रस्ताव करतांना लोकप्रतिनिधींना विश्वासात घ्या. त्यांची मान्यता घेऊन प्रशासकीय मान्यता व निधी खर्च करण्याची कारवाई करण्यात यावी. खर्च करतांना विकास कामे देखील चांगली होणे आवश्यक आहे. विभागप्रमुखाने कामांच्या गुणवत्तेची दक्षता घ्यावी. आपल्या विभागाची कामे अधिक चांगली आणि जिल्ह्याच्या विकासाला हातभार लावणारी कशी होतील, याकडे लक्ष देण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी केल्या.

**तोवर कंत्राटदारांची देयके थांबवा**

वर्धा जिल्ह्याचे ठिकाण आहे, त्यामुळे साहजिकच शहरातील विविध मैदानांवर वर्षभर विविध कार्यक्रम होत असतात. कार्यक्रमानंतर मैदान पुर्णपणे स्वच्छ, निटनेटके व पुर्वीप्रमाणे होणे आवश्यक आहे. तसे होत नसल्याने मैदानांवर सराव करणारे खेळाडू तसेच नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. सद्या सर्व मैदानांवरील स्वच्छता व निटनेटकेपणाची कामे झाली नसेल तर त्वरीत करून घ्या, तोवर संबंधित कंत्राटदारांचे देयके थांबवा असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

**त्या सोयाबीन बियाण्याची चौकशी करण्याचे निर्देश**

जिल्ह्यात वरुण नावाचे सोयाबिनचे बियाणे विकले जात आहे. हे बियाणे गुणवत्तेचे नसल्याची बाब आ.बकाने यांनी बैठकीत मांडली. यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर नुकसान सोसावे लागणार असल्याची शक्यता असल्याने कृषी विभागाने या बियाण्यांचा किती साठा जिल्ह्यात आहे, हे तपासून बियाण्यांची तत्काळ चौकशी करण्याचे आदेश दिले.

**बालवैज्ञानिक देतील इस्त्रोला भेट**

दरवर्षी तालुका व जिल्हास्तरावर विज्ञान प्रदर्शनी आयोजित केली जाते. यातील बाल वैज्ञानिकांना नागपूर येथील रमन विज्ञान केंद्र व जिल्हास्तरावर निवडलेल्या ५१ बालकांना बंगळूर येथील इस्त्रोच्या केंद्राला भेट देण्याचे नियोजन करा. जिल्ह्यात बालकांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देऊन चांगले वैद्यानिक घडविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे.

यावेळी खा.अमर काळे, आ.दादाराव केचे, आ.समीर कुणावार, आ.सुमित वानखेडे, आ.राजेश बकाने यांनी विविध प्रकारच्या सूचना केल्या. रुग्णालयांमध्ये आवश्यक औषधांची उपलब्धता, शिक्षकांची रिक्त पदे, शाळा, अंगणवाडी बांधकाम व सुरक्षा भिंत, स्मशानभुमीस जाणारे रस्ते, ग्रामसडक योजनेची अपुर्ण कामे, घरकुल लाभार्थ्यांना पट्ट्यांचे वाटप व मोजणी, सुरक्षा कुंपनासाठी जंगलालगतच्या गावांचा समावेश, हातपंप दुरुस्ती, मागील वर्षातील प्रलंबित कामे, सेवाग्राम पाणी पुरवठा योजनेचे वाढीव काम, जलजीवन मिशनची कामांना गती, आर्वी शहरातील नागरिकांना मालमत्ता पत्रक, वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजना, आर्वी येथे शिवाजी महाराजांचा नवीन पुतळा बसविणे, बँकांकडून अनुदानाची परस्पर कपात, आर्वी शहरातील अंडरग्राऊंड ड्रेनेज, जळालेल्या रुग्णांवर उपचार अशा सूचनांचा समावेश आहे. या सूचनांवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

# शेतकऱ्यांनी पेरलेल्या शेतीची दुसऱ्याच दिवशी रान डुक्कराने केले उध्वस्त





**कारंजा (घाडगे) जनमाध्यम :** तालुक्यामध्ये गेल्या चार दिवसापासून पेरणीच्या हंगामाला सुरुवात झाली असून तालुक्यातील सर्व शेतकरी सोयाबीन, पराटी, तुर, भुईमूग, मुंग, उडीद, इत्यादी खरीप हंगामी पेरणीच्या लगबगीत असताना पेरल्यानंतर दुसऱ्याच दिवशी रात्री जंगली रानडुकराने धुमाकूळ घातला आणि शेतकऱ्यांनी पेरलेली शेती पुर्ण उध्वस्त केली,

त्यामुळे शेतकरी संकटात सापडलेला असून ही परिस्थिती संपूर्ण तालुक्यामध्ये निर्माण झाली आहे, अतिशय महागडे बियाणे, खते, शेतीमध्ये लागवड करून शेतकरी लागवड करत आहेत परंतु रानडुकराच्या हौदसाने केलेल्या नुकसानीने अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आलेली कारंजा घाडगे तालुक्यामधील आजनडोह येथील शेतकरी अनिल दिग्रसे, रेबिचन दिग्रसे, प्रकाश दिग्रसे या शेतकऱ्यांसह अनेक शेतकऱ्यांनी अगोदरच्या दिवशी पेरलेल्या शेतीमध्ये जंगली डुकरांनी पेरलेली शेती पूर्णपणे उकरून काढून पेरलेले बियाणे नष्ट केले त्यामुळे आजनडोह येतील अनेक शेतकऱ्यांवर फार मोठे संकट कोसळले असून या रानटी रानडुकरांचा वन विभागाने बंदोबस्त करावा अन्यथा अनेक शेतकऱ्यांवर उपासमारीची किंवा आत्महत्येची वेळ येऊ शकते. विशेष म्हणजे अनिल दिग्रसे यांचे जेष्ठ बंधूंनी सततच्या नापिकीमुळे काही महिन्यापूर्वीच गळफास घेऊन आत्महत्या केली होती, आणि आता रानडुकराच्या

**हौदासाने पुन्हा तीच वेळ अनेक शेतकऱ्यांवर आलेली आहे-**

याबाबत आजनडोह येथील सरपंच अनिल दिग्रसे यांना विचारले असता त्यांनी सांगितले की आजनडोह हे जंगलव्याप्त गाव असून येथे रानटी डुकरांचा रोही, वाघ ,बिबट यांचा सतत हौदच असतो त्यामुळे शेती कशी पिकवावी या विवंचनेत शेतकरी काल शेत पेरल्याबरोबरच गावातील शेतकऱ्यांचे नुकसान न भरून निघणार असल्याने या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी आत्महत्येशिवाय पर्याय नसल्याचे बोलून दाखवले आहे,

## गोवा विधानसभा अध्यक्षांची एमगिरीला भेट

# गोव्यात एमगिरीचा ग्रामीण औद्योगिक विकास मॉडेल स्वीकारणार- डॉ. रमेश तावडकर

**वर्धा जनमाध्यम:** ग्रामीण समुदायांना सक्षम बनवण्यासाठी नवोपक्रम, तंत्रज्ञान प्रसार व क्षमतेच्या निर्मितीच्या माध्यमातून एमगिरीकडून सुरू असलेले प्रयत्न कौतुकास्पद आहे. गोव्यात एमगिरीचा ग्रामीण औद्योगिक विकास मॉडेल स्वीकारणार असून एमगिरीकडून विकसित केलेल्या पंचगव्य उत्पादने तंत्रज्ञानाच्या माध्यमातून गोवा राज्यातील गोशाळा सक्षम व आत्मनिर्भर बनवाव्यात, असे आवाहन गोवा विधानसभेचे अध्यक्ष डॉ. रमेश तावडकर यांनी केले.



डॉ. रमेश तावडकर यांनी ९ सदस्यीय शिष्टमंडळासह २२ जून रोजी महात्मा गांधी ग्रामीण औद्योगिकीकरण संस्था (एमगिरी), वर्धा येथे भेट दिली. यावेळी ते बोलत होते. या दरम्यान डॉ. तावडकर यांनी संस्थेच्या सर्व विभागांचे निरीक्षण करून संस्थेचे संचालक व शास्त्रज्ञांशी गोवा राज्यातील बेरोजगारी कमी करण्यासाठी एमगिरीकडून विकसित करण्यात आलेल्या तंत्रज्ञानाचे हस्तांतरण आणि कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याबाबत चर्चा केली. एमगिरीचे संचालक डॉ. अशुतोष मुरकुटे यांनी डॉ. रमेश तावडकर यांना संस्थेच्या प्रमुख कार्यकलापांविषयी, उपलब्धीबद्दल व खादी, अन्नप्रक्रिया, कुंभारकला, गोशाळा सक्षमीकरण, सुगंधित तेल व सौर ऊर्जा?यांची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचा समारोप गांधीवादी विचारधारेवर आधारित वैज्ञानिक व तांत्रिक हस्तक्षेपांच्या माध्यमातून आत्मनिर्भर ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करणे व शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करण्याच्या सामूहिक बांधिलकीने करण्यात आला. डॉ. रमेश तावडकर यांच्यासोबत शिष्टमंडळात सदस्य म्हणून रामकांत नाईक गवकार, साइमन रेबेलो, लक्ष्मण पागी, गांदेश मडगांवकर, खाजगी सचिव राजेंद्र बोरकर, विशेष कार्य अधिकारी संतोष लोल्येकर, अभियंता विनय तुपाकी व सरपंच सदस्य गणेश गवकार यांचा समावेश होता.

# दुचाकी अपघातात आई-वडिल-मुलगा जखमी

## -सुलतानपूर शिवारातील घटना

**हिंगणघाट जनमाध्यम :** नंदोरी कडे दुचाकीने जात असताना डुकरांनी धडक दिली. ही घटना २१ रोजी रात्री ८.३० वाजतादरम्यान सुलतानपूर गावाजवळ घडली. यात सुनील अंबादास कावळे (४५), पत्नी रजनी सुनील कावळे (४०) व मुलगा प्रतिक कावळे (११) सव. रा. नंदोरी तिघेही जखमी झाले.




मिळालेल्या माहितीनुसार, नंदोरी येथील सुनील कावळे हे पत्नी व मुलासह एम. एच. ३२ ए. यू. ३४२९ क्रमांकाच्या दुचाकीने हिंगणघाट येथून आपल्या मुलांसाठी शालेय वस्तू खरेदी करून मूळगावी नंदोरीच्या दिशेने निघाले. दरम्यान, सुलतानपूर गावाजवळ त्यांच्या दुचाकीला अचानक डुकरांनी धडक दिल्यामुळे तिघेही खाली पडून जखमी झाले.

जखमींना मागेहून येणाऱ्या ट्रकला थांबवून ट्रकमधून नंदोरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दाखल करण्यात आले.

# वर्ध्यात शिवसेनेच्या वैद्यकीय मदत कक्ष कार्यालयाचे लोकार्पण

**वर्धा जनमाध्यम :** शिवसेना प्रणित तसेच डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन च्या वतीने संचालित वंदनीय बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय मदत कक्ष जिल्हा कार्यालयाचे लोकार्पण कक्षाचे अध्यक्ष मंगेश चिवटे यांचे हस्ते दि.२२ जून रोजी केजाजी चौक, गोंडप्लॉट येथे पार पडले. याप्रसंगी शिवसेनेचे लोकसभा संपर्क प्रमुख राज दीक्षित, लोकसभा संघटक रविकांत बालपांडे, सहसंघटक गणेश इखार, जिल्हा समन्वयक अनिल देवतारे, जिल्हा प्रमुख राजेश सराफ, जिल्हा प्रमुख प्रशांत शहागडकर,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख दिलीप भुजाडे,उपजिल्हा प्रमुख नितीन देशमुख,महिला आघाडी जिल्हा प्रमुख शुभांगी ठमेकर,वैद्यकीय मदत कक्षाचे विदर्भ प्रमुख सचिन डाखोरे,पूर्व विदर्भ प्रमुख प्रविण शर्मा, उप प्रमुख संजय सतई, जिल्हा संपर्क प्रमुख विनोद बाभुळकर,वैद्यकीय मदत कक्षाचे शहर विभाग जिल्हाप्रमुख डॉ. प्रमोद कडू, ग्रामीण जिल्हा प्रमुख जसवंत बहादुरे, वैद्यकीय मदत कक्षाच्या महिला जिल्हा प्रमुख शाजिया इनामदार, ओ बी सी /व्ही जे एन टी सेनेचे जिल्हा प्रमुख रामेश्वर लांडे सर, कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत रामटेके यांची उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित शिवसैनिकांना मार्गदर्शन करतांना मंगेश चिवटे यांनी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या उपक्रमाबद्दल माहिती देतांना



सांगितले की सरकारने आत्ता पर्यंत राज्यातील ३ कोटी ३७ लक्ष नागरिकांचा वैद्यकीय विमा काढला असून त्या रुग्णाच्या विविध आजारावर पॅनल वर असलेल्या विविध धर्मार्थ दवाखान्यात उपचारासाठी मार्गदर्शक करणे यासाठी मदत कक्षाची गरज असल्याचे सांगितले. लहान मुलांच्या हृदयात छिद्र पडलेलं असेल त्यासाठी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे वतीने मोफत उपचार तसेच रुग्णाच्या पालकांचा प्रवास,भोजन, राहण्याचा खर्च करण्यात येते. दिव्यांग बांधवाना आत्तापर्यंत २५०० मोड्युलर हात /पाय व कॅलिपर्स चे वाटप करण्यात आले असून मदत कक्ष स्थापने पासून २५० ॲम्ब्युलन्स चे मोफत वाटप करण्यात आले आहे.कक्षाचे वतीने राज्यात एकनाथ रक्तदाता सुरक्षा कवच ही योजना कार्यान्वित असून रक्तदात्यास १० लक्ष रुपयाची आरोग्य सुरक्षा विमा योजना सुरु केली आहे.महाविकास आघाडी सरकारच्या काळात फक्त २.५ कोटी तर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असतांना जात,धर्म,पक्ष, बाजूला ठेऊन ४१९ कोटी रुपये मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून रुग्ण उपचारासाठी खर्च केल्याचं मोठ समाधान होत असल्याचे मार्गदर्शन करतांना त्यांनी सांगितले.संचालन डॉ. प्रमोद कडू यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वी तेसाठी पत्रकार अनुप भार्गव, डॉ. तांबेकर, बादल श्रीवास,शार्दूल वांदिले,विजय कोल्हे,अजय सोरटे, डॉ कपिल मून, किरण उपाध्ये, विजय टेम्भूरणे,राजीव राऊत,प्रदीप सोडे, देविदास कामडी, शेरसिंग देवढे,रेवचंद भावेकर यांनी सहकार्य केले असून शेकडो शिवसैनिकांची उपस्थिती होती.

# शासकीय शाळांचा दर्जा व गुणवत्ता टिकविण्यासाठी आदर्श शाळांची निर्मिती - पालकमंत्री

## -साटोडा येथे पालकमंत्र्यांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत

## -संपुर्ण जिल्ह्यात शाळा प्रवेशोत्सव आनंदात साजरा

**वर्धा जनमाध्यम :** खाजगी शाळांच्या तुलनेत राज्यातील ग्रामीण भागातील शाळांची परिस्थिती पाहता शाळांचा दर्जा व गुणवत्ता टिकविण्यासाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यात आदर्श शाळांची निर्मित करण्यात आली आहे. या आदर्श शाळांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होऊन विद्यार्थ्यांना शासकीय शाळेत प्रवेशासाठी आवड निर्माण होईल, असे प्रतिपादन पालकमंत्री यांनी केले.

जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये आज शैक्षणिक सत्राला सुरुवात झाली. जिल्ह्यातील १०० शाळांमध्ये शासकीय अधिकारी व पदाधिकारी यांच्याहस्ते पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे फुल देऊन स्वागत करण्यासाठी शाळा प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. साटोडा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा येथे आयोजित शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमास पालकमंत्री डॉ.भोयर उपस्थित होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी पराग सोमन, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी डॉ. मंगेश घोगरे, शिक्षणाधिकारी धर्मपाल कुमरे, गटविकास अधिकारी श्री. लोखंडे, साटोडा उपसरपंच प्रिती शिंदे, कृषि उत्पन्न बाजार समिती वर्धाचे सभापती अतिम गावंडे, डॉ. अरविंद वंजारी, डॉ. विपीन राऊत, उपमुख्याद्यापक रविंद्र पावडे आदी उपस्थित होते. केंद्र शासनाच्यावतीने पीएमश्री व राज्य शासनाच्यावतीने सीएमश्री शाळा योजना सुरु करण्यात आली आहे. योजनेंतर्गत दर्जेदार अत्याधुनिक शाळांची निर्मिती करण्यात येत असुन आधुनिक शिक्षणाच्या सोईसुविधा निर्माण करण्यात येत आहे. जिल्ह्यातील आठही तालुक्यात प्रत्येकी एक अशा आदर्श शाळा तयार करण्यात येत आहे. साटोडा येथील शाळेला आदर्श शाळा तयार करण्यासाठी ५२ लाख रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला असल्याचे डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले. यातून लवकरच शाळा बांधकाम व डिजिटायजेशनची कामे हाती घेण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील कमी होत चाललेली पटसंख्या वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांनी गावातील शाळेत प्रवेश घ्यावा, यासाठी गावकऱ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, त्यांना चांगल्या वातावरणात उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी प्रशासनाच्यावतीने प्रयत्न करण्यात येत आहे. त्यामुळे गावातील विद्यार्थ्यांनी शहरातील शाळेत प्रवेश न घेता गावातील शाळेतच प्रवेश घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी केले.

विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागावी यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. उत्तम व सुंदर शाळा तयार करण्यत येत असून जिल्ह्यातील ४५ हजार विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व पाठ्यपुस्तके वितरीत करण्यात आले असल्याचे यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन म्हणाले. यावेळी शाळेतील प्रत्येक नवागत विद्यार्थ्यांचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी फुल देऊन स्वागत केले.



कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांना पाठ्य पुस्तकांच्या संचाचे वितरण करण्यात आले. तत्पुर्वी प्रवेशोत्सवानिमित्त सर्वप्रथम ग्रामपंचायत कार्यालय येथून पुस्तक दिंडी काढण्यात आली. पुस्तक दिंडीमध्ये शाळेतील नवागत विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात सहभागी झाले. शाळा प्रवेशोत्सवाचा कार्यक्रम संपुर्ण जिल्हाभर घेण्यात आला. अनेक ठिकाणी लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळेत उपस्थित होते.

# रसुलाबाद येथील शाळेचा प्रवेशउत्सव, खा.अमर काळे यांच्या उपस्थितीत

## -विद्यार्थ्यांची गावातून ट्रॅक्टर मधुन प्रभात फेरी

**रसुलाबाद जनमाध्यम :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, रसुलाबाद येथे आयोजित प्रवेशोत्सव कार्यक्रमात सहभागी खासदार.अमर काळे यानी येऊन नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभाचे औचित्य साधून, या कार्यक्रमाद्वारे शाळेतील नवागत विद्यार्थ्यांचे औपचारिक स्वागत करण्यात आले व त्यांच्या शिक्षण प्रवासाची एक सुंदर सुरुवात करण्यात आली.

या प्रसंगी विद्यार्थ्यांना नवीन शालेय गणवेशाचे मोफत वितरण करण्यात आले. लहानग्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद, उत्साह आणि नव्या शालेय जीवनाची उर्मी पाहून मन भारावून गेले. शिक्षण हा केवळ ज्ञानाचा प्रकाशच नव्हे, तर व्यक्तिमत्त्व घडवण्याचा एक प्रभावी मार्ग आहे आणि या प्रवेशोत्सवामुळे हेच अधोरेखित झाले.



कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक, ग्रामस्थ व स्थानिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वांनी मिळून नव्या विद्यार्थ्यांना स्नेहपूर्वक शुभेच्छा दिल्या आणि त्यांना एक सकारात्मक, सुरक्षित व समर्पित शिक्षण वातावरण देण्याचे वचन दिले.



# फळपिक विमा योजना मृग बहारला ३० जून पर्यंत मुदतवाढ

## -सहभागासाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक अनिवार्य

**वर्धा जनमाध्यम :** पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजना मृगबहार २०२५-२६ मध्ये सहभागी होण्यासाठी ३० जून २०२५ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली असून योजनेत सहभागी होण्याकरिता शेतकरी ओळखपत्र क्रमांक असणे अनिवार्य असल्याचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कळविले आहे.

वर्धा जिल्ह्यातील जास्तीत-जास्त शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होण्याकरिता बँकेत किंवा आपले सरकार सेवा केंद्रावर विहित मुदतीत विमा हप्ता भरुन सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या फळपिकांना हवामान धोक्यांपासून विमा संरक्षण देऊन आर्थिक स्थैर्य निर्माण करण्यासाठी प्रधानमंत्री पीकविमा योजनेंतर्गत हवामानावर आधारित फळपिक विमा योजना वर्ष २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षा मध्ये मृग व आंबिया बहाराकरिता वर्धा जिल्ह्यातील संत्रा, मौसंबी, लिंबू आणि केळी या फळ पिकांकरिता अधिसूचितक्षेत्रा मध्ये योजना राबविण्यात येत आहे.

मृगबहार योजना ही अधिसूचित केलेल्या क्षेत्रातील अधिसूचित फळपिकांसाठीच असणार आहे. कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ही योजना ऐच्छिक राहील. खातेदारांव्यतिरिक्त कुळाने किंवा भाडे पट्टीने शेती करणारे शेतकरी या योजनेत भाग घेऊ शकतात. या योजनेतंर्गत ३० ते ३५ टक्के पर्यंतचा अतिरिक्त ५ टक्के विमा हप्ता दायित्व राज्यशासनाने स्वीकारला असून ३५ टक्क्यांवरील विमा हप्ता राज्यशासन व शेतकरीयांनी ५०:५० टक्के प्रमाणे भरावयाचे आहे. संत्रा व लिंबू पिकांकरिता सहभाग नोंदविण्याची अंतिममुदत १४ जून २०२५ होती. मात्र, या योजनेत सहभागी होऊ ईच्छिणारे शेतकरी या योजने पासून वंचित राहू नये म्हणून केंद्रशासनाने १७ जून २०२५ च्यानिर्देशानुसार ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी ?ग्रिस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळखपत्र क्रमांक अनिवार्य असल्याने ज्या शेतकऱ्यांनी अजून पर्यंत ओळखपत्र क्रमांक तयार केला नसेल त्यांनी तातडीने तयार करावा असे आवाहन, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शंकर तोटावार यांनी केले आहे. योजने बाबत अधिक माहितीसाठी क्षेत्रीय स्तरावरील मंडळ कृषी अधिकारी, तालुकाकृषीअधिकारी, उपविभागीय कृषीअधिकारी तसेच जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयाकडे संपर्क साधता येणारआहे.

# अंदाज समितीच्या अमृत महोत्सवी वर्षात लोकशाही मूल्यांच्या गौरवाची संधी-लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला

## ■ अंदाज समितीच्या ७५ वर्षानिमित्त मुंबईत राष्ट्रीय परिषद ■ मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन

**मुंबई/प्रतिनिधी :** देशाच्या संसदीय लोकशाही रचनेमध्ये महत्वपूर्ण भूमिका बजाविणा-या अंदाज समितीचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. या अमृत महोत्सवी वर्षात संसदीय लोकशाहीतील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सुशासनाच्या मूल्यांचा गौरव करण्याची संधी आहे. असे गौरवोद्गार लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सत्रात काढले. भारतीय संसदेच्या अंदाज समितीच्या कार्यारंभाला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित देशभरातील अंदाज समित्यांचे अध्यक्ष आणि सदस्यांच्या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्यास राज्यसभा उपसभापती हरिवंश, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अंदाज समितीचे अध्यक्ष संजय जैसवाल, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषद उपसभापती नीलम गो-हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, महाराष्ट्र विधानमंडळाच्या अंदाज समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर, सर्व राज्य, संघराज्य क्षेत्रांच्या अंदाज समित्यांचे अध्यक्ष व सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळाचे सदस्य आणि इतर मान्यवर उपस्थित होते. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले, दि. १० एप्रिल १९५० रोजी स्थापन झालेली संसदेची अंदाज समिती सार्वजनिक निधीच्या योग्य वापरावर लक्ष ठेवते. समितीने आतापर्यंत एक हजारपेक्षा अधिक अहवाल सादर करून शिक्षण, आरोग्य, संरक्षण, पायाभूत सुविधा अशा विविध क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत. समितीने केलेल्या शिफारशी देशाचे धोरण ठरविताना अत्यंत महत्त्वपूर्ण ठरत आहेत. विशेष म्हणजे, १७ व्या लोकसभेत सादर झालेल्या इलेक्ट्रिक वाहन धोरण अहवालामुळे केंद्र सरकारने ईव्ही (इलेक्ट्रानिक वाहने) वरील करसवलती आणि रस्ता कर माफीसारख्या निर्णयांची अंमलबजावणीसुद्धा केली असल्याचे सांगत श्री. बिर्ला यांनी अंदाज समितीच्या स्थापनेपासून आजपर्यंत कार्यरत राहिलेल्या सर्व सभापतींचे, पहिले लोकसभा अध्यक्ष जी. व्ही. मावळणकर यांचे स्मरण केले. त्यांच्या दूरदर्शी नेतृत्व व वित्तीय शिस्तीच्या कार्याच्या गौरव केला.संसदेतील आणि राज्य विधानमंडळांतील अंदाज समित्यांनी सार्वजनिक खर्चाचे प्रभावी परीक्षण करत प्रशासनाला कार्यक्षम आणि जनतेला जबाबदार बनवले आहे. समितीने भारतीय रेल्वेसारख्या क्षेत्रातील धोरणात्मक सुधारणा, शासकीय सचिवालयाच्या पुनर्रचनेसारख्या





शिफारशी आणि लोकसेवांमधील परिणामकारकता वाढवणारे निर्णय यावर उल्लेखनीय कार्य केले आहे. प्रगत तंत्रज्ञानाच्या वापराने या समित्यांची विश्लेषण क्षमता वाढवणे, सदस्यांचे कौशल्यवर्धन करणे आणि जनतेशी अधिक सुसंवाद साधणे या गोष्टी भविष्यातील कार्यासाठी आवश्यक असल्याचेही श्री.बिर्ला यांनी यावेळी स्पष्ट केले.या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्ताने केंद्र व राज्य समित्यांमधील सहकार्य वाढवून सर्वोत्तम शासकीय पद्धतींचा प्रसार करण्यासाठी विचारविनिमयाचे व्यासपीठ उपलब्ध होत आहे. डिजिटल साधनांचा वापर, डेटा विश्लेषण आणि लोकसहभाग यावर भर दिला जात आहे. यामध्ये सर्वांनी कृतीतून लोकहितासाठी कार्य करावे. आणि लोकशाहीचा खंबीर आधारस्तंभ असलेल्या समित्या अधिक सक्षम करण्याचे आवाहनही श्री. बिर्ला यांनी यावेळी केले.

### महाराणी अहिल्यादेवी होळकर यांचे सुशासनाचे तत्त्व आजही आदर्श-सभापती प्रा. राम शिंदे

'सुशासन म्हणजे लोकहिताचा, न्यायाचा आणि संवेदनशीलतेचा समतोल राखणारी शासनव्यवस्था जेंव्हा-जेंव्हा सुशासनाची चर्चा होते, तेव्हा महाराणी अहिल्यादेवी होळकर यांचे नाव श्रद्धेने घेतले जाते. यावर्षी त्यांच्या जन्माचा त्रिशताब्दी वर्षप्रवेश असून, संपूर्ण देशभरात त्यांचे कार्य नव्या पिढीसमोर पोहोचवण्याची गरज आहे. त्यांच्या कार्यपद्धतीतून आजच्या काळातही प्रेरणा घेण्यासारख्या अनेक बाबी आहेत,' असे प्रतिपादन विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी चर्चासत्रात सांगितले. लार्ड थामस लारेन्स यांसारख्या आंतरराष्ट्रीय विचारवंतांनी त्यांचे वर्णन 'फिलासाफर क्वीन ऑफ इंडिया' असे केले. शेतक-यांना करमाफी देणे, विहिरी-तलावांच्या माध्यमातून सिंचन सुविधा उपलब्ध करून देणे, अशा अनेक प्रशासनिक सुधारणांद्वारे लोकाभिमुख व पारदर्शक प्रशासनाची मुहूर्तमेढ रोवली.

### अंदाज समितीच्या ईव्ही धोरणासह शिक्षण, आरोग्यासंदर्भात प्रभावी शिफारशी- अध्यक्ष संजय जैसवाल

सार्वजनिक निधीच्या पारदर्शक आणि जबाबदार वापरासाठी अंदाज समितीने सातत्याने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. आतापर्यंत या समितीने १ हजार ३३ अहवाल सादर केले असून, ईव्ही धोरणासह शिक्षण, आरोग्य, संरक्षण, पायाभूत सुविधा आदी क्षेत्रांचा आढावा घेऊन महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत, असे प्रतिपादन समितीचे अध्यक्ष संजय जैसवाल यांनी केले. ते म्हणाले, १७ व्या लोकसभेतील इलेक्ट्रिक वाहन धोरण अहवाल सादर केल्यानंतर शिफारसीनंतर सरकारने ईव्हीवरील करसवलती लागू केल्या आणि रस्ता कर माफ करण्याबाबत अधिसूचना जारी केली. तसेच या समितीने कार्यपद्धतीतही सुधारणा केली आहे व १९६८ पासून नियमावली राबवली आहे. ही समिती कार्यक्षमतेसह प्रशासकीय सुधारणांसाठी मार्गदर्शक ठरली आहे.

### अंदाज समितीच्या शिफारशींवर आधारित अर्थसंकल्प-अध्यक्ष नार्वेकर

संविधान निर्मात्यांच्या दृष्टिकोनानुसार आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि लोककल्याणाच्या मूल्यांची अंमलबजावणी हे राज्यघटनेच्या सशक्तव्यवस्थेचा मूळ गाभा आहे. याचे प्रभावी माध्यम म्हणजे अंदाज समिती आहे. अंदाज समितीच्या शिफारशींवर आधारित अर्थसंकल्प आर्थिक शिस्तीचा आणि सामाजिक विकासाचा मार्गदर्शक असतो, अशा शब्दात विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी अंदाज समितीच्या कार्याचा गौरव केला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या लोकाभिमुख राज्यव्यवस्थेला छत्रपती शाहू महाराजांनी सामाजिक समतेचा दृष्टिकोन दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संवैधानिक अधिष्ठानमुळे आज हीच परंपरा अंदाज समितीच्या कार्यातून पुढे चालत आहे. अंदाज समितीच्या अहवालाद्वारे शासनाच्या आर्थिक धोरणांचे सखोल विश्लेषण होते. या शिफारशींवर आधारित अर्थसंकल्प तयार करणे हे केवळ प्रशासनाचे कार्य नव्हे, तर ते सरकारचे संविधानिक व नैतिक कर्तव्य आहे. राज्य आणि केंद्र सरकारांनी संतुलित, परिणामकारक आणि सामाजिकदृष्ट्या सर्वसमावेशक योजना राबवताना संसदीय समित्यांच्या मार्गदर्शनाचा आधार घेतला पाहिजे.



### अंदाज समित्यांचे योगदान धोरणात्मक निर्णयात महत्त्वपूर्ण -अर्जुन खोतकर

लोकशाही व्यवस्थेत संसद आणि विधानमंडळांना सर्वोच्च स्थान असून, या संस्थांतील विविध समित्यांचे कामकाजही तितकेच महत्त्वाचे आहे. या समित्या लोकशाहीची मूल्य जपत धोरणनिर्मितीत महत्वपूर्ण भूमिका बजावतात. समित्या विधिमंडळातील संघटनेचे एकक असून प्राशसन आणि जनतेमध्ये दुवा म्हणून काम करतात. अंदाज समित्यांनी झुणका-भाकर योजना, ग्रामीण स्वच्छता योजना, पाठ्यपुस्तक संशोधन मंडळ, एकाधिकार कापूस खरेदी योजना यासारख्या महत्त्वाच्या धोरणांवर प्रभावी शिफारशी केल्या आहेत. या परिषदेतून सर्व सदस्यांना नव्या संकल्पना, अभ्यासाचे दृष्टिकोन आणि कार्यपद्धती मिळतील. अंदाज समित्यांनी अधिक सशक्त, सक्रिय भूमिका घ्यावी, हा या चर्चेचा मुख्य उद्देश आहे असेही श्री.खोतकर यांनी यावेळी सांगितले. विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांचे पुष्पगुच्छ देउन स्वागत केले. तसेच पोलीस बँड पथकाकडून सलामी देण्यात आली. महाराष्ट्रीयन पद्धतीने त्यांचे टिळा लावून औक्षण करण्यात आले. त्यानंतर संसद आणि सर्व राज्यातील विधानमंडळांच्या अंदाज समिती प्रमुख आणि सदस्यांचे एकत्रित समूह छायाचित्र काढण्यात आले. संसदेच्या अंदाज समितीच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त स्मरणिकेचेही मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

### अंतिम घटकांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी अंदाज समितीचे योगदान महत्वाचे - मुख्यमंत्री

अंदाज समिती ही केवळ आर्थिक परीक्षण करणारी संस्था नाही, तर ती अंतिम माणसाच्या आशा - आकांक्षा पूर्ण करणारी प्रभावी यंत्रणा आहे लोकशाहीत या अंदाज समितीचे योगदान महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'प्राक्कलन' हा शब्द संस्कृतमधून आलेला असून पूर्वीचा गणना म्हणजेच अंदाज होय. सरकारचे अंदाजपत्रक सादर होते, तेव्हा त्यामागे एक वैज्ञानिक प्रक्रिया असते. विभागांना निधी देताना त्यांच्या योग्य विनीयोगावर अंकुश ठेवणारी यंत्रणा असणारी अंदाज समिती अत्यंत प्रभावी भूमिका बजावते. ही समिती केवळ शिफारसी करत नाही, तर ती सरकारला त्यांच्या कार्यपद्धतीत बदल करण्याची भाग पाडते. महाराष्ट्रात अंदाज समितीच्या सुमारे ५५ ते ७० टक्के पेक्षा अधिक शिफारसींची अंमलबजावणी होते, ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. प्रशासनावर नैतिक दबाव निर्माण करून शिस्त, जबाबदारी आणि पारदर्शकतेचा संस्कार घडवणा-या समितीमुळे अचूक कामकाजाबाबत प्रशासनाला जाणीव राहते, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अंदाज समितीमुळे लोकशाही व्यवस्था सक्षम होते. प्रशासनातील कार्यपद्धती तपासणे, धोरणांचे



मूल्यांकन करणे आणि अर्थसंकल्पातील तरतुदी प्रत्यक्ष जनतेपर्यंत पोहोचतात का, हे पाहणे या समितीच्या माध्यमातून शक्य होते. समित्या सरकारवर अंकुश ठेवणारे माध्यम आहे. अधिवेशनाच्या बाहेही या समित्या बाराही महिने काम करत असतात. यामुळे प्रशासन अधिक गतिमान होते. अमृतकाळात आपण सर्वांनी मिळून या समितीला अधिक सक्षम, प्रभावी आणि परिणामकारक कसे करता येईल, यावर विचार केला पाहिजे. भविष्यातील पुढील पिढ्यांसाठी आदर्श मानके निर्माण करण्याचे हे सुवर्णसंधीचे वर्ष आहे, असेही फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

### विकासासाठीचा प्रत्येक रूपया सर्वसामान्यांपर्यंत पोहचावा -उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

विकासासाठी खर्च केला जाणारा प्रत्येक रुपया सर्वसामान्यांपर्यंत पोहचला पाहिजे आणि त्यादृष्टीने संसदेच्या प्राक्कलन समितीचे ( अंदाज समिती) काम खूप परिणामकारक ठरते. संसद तसेच विविध राज्यांच्या प्राक्कलन समितीच्या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, गरीब कल्याण हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा अजेंडा असून प्रत्येक रुपया हा गरिबांपर्यंत पोहचलाच पाहिजे हे त्यांचे नेहमी सांगणे असते. अंदाज समित्या या दृष्टिकोनातून महत्वाची भूमिका बजावत असतात. तसेच प्रशासनाची कार्यक्षमता, अर्थकारण आणि पारदर्शकता सुनिश्चित करतात. सध्या या समित्यांचा अमृतकाल असून देशाचीही प्रगती दुप्पट गतीने होत आहे.संसदीय समित्या म्हणजे छोटी संसद किंवा छोटी विधिमंडळे असतात. या समित्या म्हणजे लोकशाहीच्या आत्म्याचा आरसा आहेत असे सांगून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, लोकशाही व्यवस्थेत आर्थिक जबाबदारी आणि पारदर्शकता हे अत्यंत महत्त्वाचे आधारस्तंभ असून अंदाज समिती हे एक अत्यंत सक्षम आणि प्रभावी संसदीय माध्यम आहे. आपल्या अंदाजपत्रकात अनेक गोष्टी असतात. घोषणा आणि तरतुदीही असतात. या तरतुदींचा योग्य, ठराविक वेळेत आणि प्रभावी वापर होतोय की नाही, हे पाहणे महत्त्वाचे ठरते आणि हीच जबाबदारी ही समिती पार पाडते असे सांगून उपमुख्यमंत्री शिंदे यांनी लाडकी बहीण योजनेच्या यशाचाही उल्लेख केला. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरू करण्याआधी आरबीआयच्या सर्व मार्गदर्शक तत्वांचा, अंदाजपत्रकातील तरतुदींचा, एफआरबीएम कायद्याचा पूर्ण विचार करून पाउल उचलले. जनतेच्या व्यापक हितासाठी अशा योजना अत्यावश्यक असतात. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मागील ११ वर्षांच्या कार्यकाळात शासकीय कार्यात पारदर्शकतेचा आदर्श प्रस्थापित झाला आहे. त्यामुळे अंदाज समितीचे कार्य सुलभ झाले आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. एकीकडे आर्थिक पातळीवर सावध आणि कुशल राहून शिस्तीचे पालन करावे लागते तर, दुसरीकडे जनतेने निवडून दिलेल्या सरकारने जनतेच्या अपेक्षांवर खरे उतरणेही महत्त्वाचे असते. शेवटी लोकशाहीतील सरकार हे जनतेसाठीच असते असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.



## ७६ लाख रहस्यमय मतांबाबतच्या याचिकेवर हायकोर्टात सुनावणी पूर्ण

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांनंतर महाविकास आघाडीसह विरोधी पक्षांनी वाढीव मतदानाबाबत सातत्याने निवडणूक आयोग तसेच सत्ताधा-यांवर टीका केली. काँग्रेस खासदार आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही अनेकदा या वाढीव मतदानावरून सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. यासंदर्भात एक लेखही विविध वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आला होता. या लेखाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक लेख लिहूनच उत्तर दिले. तसेच महायुतीतील अनेक नेत्यांनी यावरून काँग्रेसवर पलटवारही केला. यातच आता यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिकेवर सुनावणी पूर्ण झाल्याची माहिती मिळाली आहे. मुंबई उच्च न्यायालयात महाराष्ट्र २०२४ विधानसभा निवडणुकीत संध्याकाळी ६ वाजल्यानंतर अचानक रहस्यमय पद्धतीने वाढलेल्या ७६ लाख मतांबाबत महत्त्वपूर्ण सुनावणी पार



पडली. वंचित बहुजन आघाडीचे चेतन चंद्रकांत अहिरे यांनी याबाबत न्यायालयात याचिका दाखल केली होती. यात ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी बाजू मांडली. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर २५ जून रोजी निकाल जाहीर केला जाईल, असे स्पष्ट केले आहे, अशी माहिती प्रकाश आंबेडकर यांनी दिली.या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी या प्रकरणावर आपली भूमिका मांडली. त्यांनी यापूर्वीही निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप केला होता. १६ जानेवारी २०२५ रोजी त्यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे व इतर विरोधी पक्षांना पत्र लिहून ईव्हीएम वापर तसेच १९६१ मधील निवडणूक नियमांत झालेल्या संशोधनाविरोधात संयुक्त लढ्याचे आवाहन केले होते. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी असेही नमूद केले होते की, ही ७६ लाख मतांची आकडेवारी फक्त 'चूक' नाही, तर ती निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर व लोकशाहीवर गंभीर प्रश्न उपस्थित करते. दरम्यान, याचिकाकर्ता चेतन अहिरे यांचा आरोप आहे की, मतदान संपल्यानंतर आकस्मिकरित्या ७६ लाख मतांची नोंद झाली, जी पूर्वीच्या एकूण आकडेवारीशी जुळत नाही.

## लाडूत सापडला मानवी अंगठा

### ◆ परिसरात उडाली खळबळ ◆

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील एका हलवायाकडून विकत घेतलेल्या लाडूमध्ये मानवी अंगठा सापडल्याची अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेविषयी गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, अन्न व औषध प्रशासन विभागाने तातडीने कारवाई करत चौकशी सुरू केली आहे. गोहे बुद्रुक गावातील रहिवासी रामचंद्र पोतकुळे यांनी १ जून रोजी डिंभेगाव येथील नित्यानंद हॉटेलमधून २५० ग्रॅम लाडू आणि काही भेळ विकत घेतली होती. हे मिठाईचे सामान त्यांनी घरी नेले. जेवणानंतर जेव्हा कुटुंबाने लाडू खायला सुरुवात केली, तेव्हा एका लाडूमध्ये मानवी अंगठा असल्याचे लक्षात आले.यामुळे कुटुंबातील सदस्यांना अतिसार आणि मळमळ होण्यास सुरुवात झाली. अखेर ३ जून रोजी त्यांनी FDA कडे अधिकृत तक्रार दाखल केली. अन्न व औषध प्रशासन विभागा कडून करण्यात आलेल्या प्राथमिक तपासात असे उघड झाले आहे की, संबंधित मानवी अंगठा हा नित्यानंद हॉटेलच्या



मालक बाळू भोकरेंच्या मुलाचा आहे. तपासाअंती समोर आले की, लाडू तयार करत असताना त्याचा मुलगा विद्युत-चालित लाडू मिक्सिंग मशीन चालवत होता. यावेळी अचानक वीज गेली आणि पुन्हा वीज आल्यानंतर मशीनमध्ये त्याचा हात अडकून अंगठा छाटला गेला. यावेळी मशीन तोडून त्याचा हात बाहेर काढण्यात आला आणि त्याला तातडीने रुग्णालयात दाखल

## कर्करोगग्रस्त आजीला नातवाने कच-याच्या ढिगा-यात फेकले

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतून माणुसकीला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. गोरेगावमध्ये एका आजीसोबत घडलेल्या प्रकारामुळे मन सुन्न झालं आहे. त्वचेचा कर्करोग असलेल्या आजीला तिच्या स्वतःच्या नातावाने कच-याच्या ढिगा-यात फेकल्याची दुःखद घटना घडली आहे. यशोदा गायकवाड असं या ६० वर्षांच्या आजीचे नाव आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि तिला रुग्णालयात दाखल केले. कूपर रुग्णालयात वृद्ध महिलेवर सध्या उपचार सुरु आहेत.आजी आजोबांसाठी त्यांची नातवंडे सर्वकाही असतात. आपलं म्हातारपण नातवंडांसोबत जावं अशीच त्यांची इच्छा असते. मात्र गोरेगावात एका नातवाने त्याच्या आजीसोबत केलेल्या कृत्याने अनेकांना धक्का बसला. नातवाने केलेल्या कृत्याने माणुसकीला काळीमा फासण्याचा प्रकार घडला आहे. यशोदा गायकवाड यांच्या नातवाने त्यांना आजारपणामुळे थेट कच-याच्या ढिगा-याजवळ फेकून दिले. या प्रकारानंतर पोलिसांनी त्यांना रुग्णालयात दाखल केलं असून त्या सध्या उपचार घेत आहेत.

रविवारी आरे कॉलनीतील युनिट



क्रमांक ३२ कडे जाणा-या रस्त्यावर सकाळी ८.३० च्या सुमारास ही घटना उघडकीस आली. पोलीस नियंत्रण कक्षाला माहिती मिळाल्यानंतर आरे पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी पोहोचले. त्यावेळी ६० वर्षीय यशोदा गायकवाड या कच-याच्या ढिगा-यात असहाय्य अवस्थेत पडल्या होत्या. त्यांच्या चेह-यावर, गाल आणि नाकावर जखमा दिसत होत्या. पोलिसांनी विचारपूस केल्यानंतर त्यांनी आपलं नाव सांगितले. त्या त्यांच्या नातवंडासोबत मालाड परिसरात राहत असल्याचो गायकवाड यांनीच पोलिसांना सांगितले. त्यामुळे पोलिसांनी त्यांच्या कुटुंबियांचा शोध सुरु केला. गायकवाड यांची अवस्था फारच बिकट असल्याने पोलिसांनी त्यांना तात्काळ पोलीस व्हॅनमधून जोगेश्वरी ट्रॉमा केअर रुग्णालयात नेले होते. मात्र तिथे सुविधांचा अभाव असल्याने रुग्णालयाने त्यांना दुसरीकडे जाण्यास सांगितले. त्यानंतर पोलिसांनी त्यांना कूपर रुग्णालयात आणलं. आठ तासांनंतर संध्याकाळी ५.३०च्या सुमारास अधिका-यांनी मध्यस्थी केल्यानंतर गायकवाड यांच्यावर कूपर रुग्णालयात उपचार सुरु करण्यात आले आहेत.

## सरळसेवा भरतीमध्येही आता किमान पर्सेंटाईल

### राज्य लोकसेवा आयोगाचा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :**शासकीय नोकरीतील काही पदे ही सरसेवा पद्धतीने भरली जात होती. यासाठी पुर्वी स्पर्धापरीक्षेप्रमाणे नियम नव्हते पण आता स्पर्धा परीक्षेप्रमाणेच सरळसेवा भरतीप्रक्रियेकरीता किमान पर्सेंटाईल अर्हतामान लागु करण्याचा निर्णय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतला आहे. याबाबतचे प्रसिद्धीपत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. शासकीय नोकरीसाठी सरळसेवा भरती होत असेल तर आता उमेदवारांना निवड प्रक्रियेत पात्र ठरण्यासाठी ठराविक पर्सेटाईल गुण मिळवणे बंधनकारक राहणार आहे. हा निर्णय भरतीप्रक्रिया अधिक पारदर्शक आणि गुणवत्ताप्रधान करण्याच्या उद्देशाने घेण्यात आला आहे. यामुळे नियुक्-त करण्यात येणा-या पदासाठी योग्-य उमेदवाराची निवड होणार आहे. उमेदवाराच्या निवडीसाठी उच्च दर्जाचे निकष निश्चित होणार आहेत.याबाबत २३ जून २०२५ रोजी संकेतस्थळावर अधिकृत निर्णय जाहीर करण्यात आला आहे. यापूर्वी केवळ राज्-यसेवच्या स्पर्धा परिक्षेत होणा-या भरतीसाठी पर्सेटाईलचे गुण ग्रा धरले जात होते. या पद्धतीमुळे स्पर्धा परिक्षेतून योग्य उमेदवाराची नियुक्-ती होत होती. पर्सेटाइल चा एक निकष म्हणून केला जातो, जिथे निवड होणा-या पदासाठी जास्त पर्सेटाइल असलेले उमेदवार निवडले जातात.यापूर्वी सरळसेवा भरतीमध्ये लेखी परिक्षा व मुलाखत हे दोनच महत्वाचे टप्पे होते. पण सध्या कोणत्याही पदासाठी जाहीरात प्रसिद्ध झाल्-यास लाखोंने अर्ज येतात. पण आता पर्सेटाईलच्या नियमामुळे निवडप्रक्रियेचे निकष अधिक कठीण होतील. त्यामुळे चाळणीतून अधिक सक्षम उमेदवार निवडला जाईल. लेखी परिक्षेसाठी पर्सेटाईल अर्हतामान प्रामुख्याने लेखी परिक्षेसाठी लागू होईल.

## २८ जुलैचा दावा खरा होणार? तिसरे महायुद्ध अटळ?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**गेल्या अनेक महिन्यांपासून जग अशांततेच्या गर्तेत आहे. रशिया आणि युक्रेन युद्धापासून सुरू झालेला विनाश आता इराण-इस्त्रायलयुद्धाने अधिक तीव्र झाल्याचे पाहायला मिळत आहे. गेली अनेक वर्ष रशिया आणि युक्रेन यांच्यात युद्ध सुरू आहे. परंतु, त्यावर तोडगा अद्याप निघालेला नाही. यातच इस्त्रायल आणि इराण यांच्या युद्धात अमेरिकेने उडी घेतली आहे. यातच बाबा वेंगा-नास्त्रेदमस यांनी केलेली भविष्यवाणी चिंता वाढवणारी असल्याचे म्हटले जात आहे. एकीकडे रशिया युक्रेन युद्ध सुरू असतानाच इस्त्रायलने हमासवर जोरदार हल्ले केले. याचे रुपांतरही मोठ्या युद्धात होणार अशी चिन्हे होती. यातच पाकने पहलगाम येथील पर्यटकांवर केलेल्या हल्ल्याला भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबवत प्रत्युत्तर दिले होते. यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये मोठे युद्ध होउ शकते, असे दावे केले जात होते. परंतु, युद्धबंधी करण्यात आली. या घडामोडींनी जग काहीसे शांत होताना दिसत असतानाच इस्त्रायल आणि इराण यांच्यात युद्धाला तोंड फुटले. यात अमेरिकेने इस्त्रायलच्या बाजूने उडी घेतली. तर आता इराणच्या बाजूने रशिया युद्धात उतरू शकतो, असा कयास बांधला जात आहे. जेव्हा कोणतीही मोठी आपत्ती येते, तेव्हा ती अमावस्या आणि पौर्णिमेच्या आसपास येते. तसेच अशा प्रकारची नैसर्गिक किंवा कोणतेही संकट येणार असते, तेव्हा शनि, मंगळ, गुरू, राहु हे ग्रह केंद्र किंवा त्रिकोणात स्थित असतात. अशा





### बाबा वेंगा-नास्त्रेदमस यांची मोठी भविष्यवाणी

वेळेस काही मोठी घटना घडण्याची शक्यता असते. ५ जुलै रोजी चंद्र तूळ राशीत असेल आणि गुरूची चंद्रावर दृष्टी असेल. त्याच वेळी, २४ जुलै रोजी मंगळ आणि केतू एकाच अंशावर राहून युती करत आहेत, तर बुध आणि चंद्र यावेळी कर्क राशीत आहेत. तर शनि मीन राशीत आहे. आताच्या घडीला शनि आणि मंगळाचा अशुभ असा षडाष्टक योग सुरू आहे. बाबा वेंगा यांनी २०२५ बद्दल केलेले भाकीत सध्या प्रचंड व्हायरल होत आहे. जगावर अनेक मोठी संकट येतील. युरोपमध्ये मोठा संघर्ष सुरू होईल, त्यानंतर हा संघर्ष हळूहळू संपूर्ण जगाला आपल्या कवेत घेईल, मोठ्या प्रमाणावर जीवितहानी होईल, असे भाकित बाबा वेंगा यांनी वर्तवले होते. जगभरात सध्या जी परिस्थिती निर्माण झाली आहे, त्यामुळे बाबा वेंगा यांचे हे भाकित खरे ठरणार का? अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. त्यांनी भयानक भूकंप, पूर आणि इतर नैसर्गिक आपत्तींचा इशाराही दिला होता. अनेक ज्योतिष तज्ज्ञांच्या मते ७ जुलैपासून ते २८ जुलैपर्यंत खप्पर योग, षडाष्टक योग सारखे अनेक खतरनाक योग तयार होत आहेत. त्यामुळे आता तिसरे महायुद्ध होणार का? अशी शंका उपस्थित करण्यात येत आहे. याबाबतचे अनेक दावे व्हायरल होताना दिसत आहेत. या भविष्यवाण्यांमध्ये असे म्हटले आहे की, २०२५ मध्ये तिसरे महायुद्ध सुरू होउ शकते. नास्त्रेदमसच्या प्रसिद्ध पुस्तक 'लेस प्रोफेटीज'चा हवाला देत असा दावा करण्यात आला आहे की, २०२५ मध्ये जग एका भयानक युद्धाच्या विळख्यात सापडू शकते. ज्यामुळे भयानक विनाश होउ शकतो.

## मुंबईत दिसलास तर एन्काउंटर करून टाकू

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतून दरोड्याची मोठी घटना समोर आली आहे. मुंबई पोलिसांच्या नावावर धमकावून ५० लाख रुपयांची लूट करणा-या तिघांना मुंबई पोलिसांनी अटक केली. एका व्यक्तीचे अपहरण करून त्याच्याकडून ५० लाख रुपये लुटल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी पाच जणांना अटक केली. आरोपींनी त्या व्यक्तीला फेक इन्काउंटरमध्ये जीवे मारण्याची धमकीही दिली होती. दक्षिण मुंबईतील लोकमान्य टिळक मार्ग पोलिस ठाण्यात रविवारी दरोड्याचा गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर सहा तासांच्या आत पोलिसांनी पुणे, सातारा आणि ठाण्यातून आरोपींना अटक केली. अजय बाळकृष्ण लोखंडे (३२), रेवणसिद्ध राजाराम जावडे (२७), सागर दामोदर जाधव (२९), विकास अंकुश देहाळे(३८, सर्व रा. सांगली), दिलीप काशिनाथ ढेकळे (४३, ठाणे) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी संध्याकाळी ७ वाजण्याच्या सुमारास तक्रारदार भुलेश्वरमधील पोपलवाडी परिसरातून जात असताना ही घटना घडली. पोलिस अधिकारी असल्याचा दावा करत चार जणांना त्याला अडवले. चौघांनीही त्या व्यक्तीला जबरदस्तीने गाडीत बसवले आणि त्याचे अपहरण केले. आरोपींनी त्याला चाकू धाक दाखवत तुला गंभीर परिणाम भोगावे लागतील अशी धमकी दिली. आरोपींनी त्याची ५० लाख रुपये असलेली बॅग हिसकावून घेतली आणि त्याच्या मोबाईल फोनमधून सिम कार्ड काढून त्याला नवी मुंबईतील खारघरला रस्त्याच्या कडेला उतरवले. आरोपींनी तक्रारदाराला मुंबईत परत येउ नको, दिसलास तर तुला फेक इन्काउंटरमध्ये संपवून टाकू अशी धमकीही दिली. त्यानंतर ती व्यक्ती मुंबईत परतली आणि लोकमान्य टिळक मार्ग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## तडजोड की सरमिसळ?

सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक निवडणुका घेण्याचे आदेश आणि परवानगी दिल्यानंतर विविध राजकीय पक्षांनी आपल्या ताकदीनुसार कराव्या लागणाऱ्या युती आघाडीच्या स्वरूपाची महाराष्ट्रभर चाचपणी सुरू केली आहे. वैशिष्ट्य म्हणजे भाजपा, काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार), राष्ट्रवादी (अजित पवार गट), शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (ठाकरे गट) आणि मनसे असे सात प्रमुख पक्ष निवडणूक लढवत असताना स्थानिक निवडणुकांचे कमी असलेले मतदान आणि होऊ शकणारी मतविभागणी लक्षात घेता या निवडणुका एकमेकांच्या साथीनेच लढणे फायद्याचे आहे, याची जाणीव सर्वच पक्षांना आहे.तरी बहुतेक सर्वच पक्षांनी हुशारीने 'एकला चलो रे'ची तयारीदेखील असल्याची वक्तव्ये करायला सुरुवात केली आहे.स्थानिक पातळीवर होणाऱ्या निवडणुका मुख्यत्वे स्थानिक समस्या आणि प्रश्नांवरच लढवल्या जातात. महाराष्ट्रातल्या महानगरपालिका बरखास्त होऊन गेली दोन वर्षे त्यांचा कारभार प्रशासनाच्या अधिपत्याखाली चालत आहे. मध्यंतरीच्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणात झालेल्या उलथापालथींने सर्व मुख्य पक्षांची सरमिसळ झाली आहे.त्यामुळे ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होऊ घातलेल्या स्थानिक निवडणुकांमध्ये कोणते पक्ष स्वतंत्र लढतील तर कोण युती आघाडीमध्ये सामील होतील हे अद्याप स्पष्ट नाही. त्यामुळे मतदारराजा कुणाला साथ देईल याचा आज अंदाज बांधणे कठीण आहे. प्रमुख राजकीय पक्षांचा 'एकला चलो रे'चा आक्रमक पवित्रा लक्षात घेता भूतकाळातल्या काही गोष्टींचा आणि वर्तमानातील शक्यतांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा चांगला प्रभाव असणाऱ्या पुणे, पिंपरी-चिंचवड, अहमदनगर, नवी मुंबई या नहानगरपालिका भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्या युतीतच लढवणे अजितदादा पसंत करतील असे दिसते. कारण पक्षापेक्षा एक नेता म्हणून जातीने लक्ष घालून त्यांनी या पालिकांमध्ये काम केले आहे. त्यामुळे त्यांना तिथे शरद पवार गटाची गरज भासणार नाही. उद्धव आणि राज ठाकरे यांच्या मनोमिलनाच्या चर्चा रंगू लागल्या आहेत. यापूर्वी राज ठाकरेंनी दोन वेळा उद्धव गटाबरोबर जायला अनुकूलता दाखवली. त्यावेळी त्यांना कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे पहिला प्रस्ताव कुणाकडून येतो यावर अडून बसलेला गाडा पुढे हलेल असे वाटत नाही. त्यातच मुख्यमंत्री फडणवीस आणि राज ठाकरे यांच्या भेटीने काही वेगळी समीकरणे मांडली जातात की काय, असे चित्र निर्माण झाले. पण मुंबई किंवा नाशिकसारख्या एखाद-दुस-या पालिकेशिवाय अन्यत्र राज ठाकरेंना जवळ करणे भाजपला फायद्याचे ठरणार नाही. एकनाथ शिंदेंच्या मुख्यमंत्रिपदाच्या अडीच वर्षांच्या काळात महायुतीतर्फे दहा महत्त्वाच्या घोषणा सुरू केल्या गेल्या. यात लाडकी बहीण योजना, शेतकरी कर्जमाफी, रोजगारनिर्मिती आणि वृद्धांना पेन्शन वाढ या अनुषंगाने प्रमुख घोषणा करण्यात आल्या होत्या,त्यातील लाडकी बहीण योजनेचे निकष कडक करून पूर्वी योजनेचा लाभ घेतलेल्या ब-याच लाडक्या भगिनींना योजनेपासून दूर केले गेले. स्थानिक निवडणुकीत युतीला याचा तोटा होऊ शकतो आणि युतीतील पक्ष वेगवेगळे लढले तर मतविभाजनामुळे तोटयाचे स्वरूप मोठे असू शकते.आपापसातील कुरघोड्यांमुळे आणि रोज उद्भवणाऱ्या नवीन वादांमुळे टीकेचे लक्ष्य होणाऱ्या युती सरकारच्या प्रसिद्धीमध्ये घसरण होत आहे. त्यातच सरकारमधील काही मंत्र्यांच्या बेजबाबदार वक्तव्यांनी विरोधकांच्या हाती आयते कोलीत आले. सरकार म्हणजे लोकनियुक्त प्रतिनिधींनी नियुक्त केलेली यंत्रणा असते, म्हणून आपल्या जबाबदारीचे भान राखून सरकारमधील मंत्र्यांनी आणि नेत्यांनी बेजबाबदार वक्तव्ये टाळणे अपेक्षित होते. काही विरोधी नेते हुशारीने अशी वक्तव्ये करणाऱ्यांना हेरून भडकवण्याचे काम चोख बजावत होते तर सत्ताधारी या सापळ्यात व्यवस्थित अडकत होते. त्यांची बाजू सावरताना मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पक्षांचे प्रदेशाध्यक्ष यांच्या नाकी नऊ आलेले पाहिले. सत्ताधारी आणि विरोधींच्या अशा वर्तणुकीचा कोणाला किती तोटा झाला हे नियोजित निवडणुकांमध्ये दिसून येईल. या पार्श्वभूमीवर भाजपा, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांना स्थानिक पातळीवरील निवडणुका एकत्रितपणे लढण्यावाचून पर्याय नाही. पाच दहा जागांमध्ये मैत्रीपूर्ण लढती होण्यापलीकडे त्यांच्यात वाद होणार नाहीत. त्यामुळे शिंदे गट आणि ठाकरे गट किंवा अजित पवार आणि शरद पवार गट एकत्र यायची शक्यताही धुसर आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादीशी संग करून उद्धवजींनी हिंदुत्व सोडले असा प्रचार विधानसभेच्या निवडणुकीवेळी केला गेला. त्याचा उद्धव सेनेला फटका बसला. गेली तीस-चाळीस वर्षे महाराष्ट्रात स्थायिक झालेल्या अशा परप्रांतीयांचे, त्यांच्या तरुण मुलामुलींचे मतदान आता महाराष्ट्रातच होते आणि त्याचे प्रमाण लक्षणीय आहे हे आता उध्दव ठाकरे यांना विसरून चालणार नाही. शिवाय राज ठाकरे जागावाटपाच्या वेळी अवाजवी अपेक्षा ठेऊ शकतात हे उद्धव ठाकरे जाणून असतीलच, खरे तर मुंबई महानगरपालिकेसाठी स्वबळावर लढण्याची हिंमत कोणताच पक्ष दाखवू शकत नाही. मात्र जास्तीत जास्त जागा पदरात पाडून घेण्यासाठी आणि पालिकेवर सत्ता आणण्यासाठी 'एकला चलो रे'ची तयारी दर्शवून निवडणुकांना सामोरे जायची भीती मित्रपक्षांमध्ये पसरवण्याचे काम पद्धतशीरपणे सुरू आहे, पण त्यात काही राम नाही. आज फडणवीस, शिंदे आणि अजित पवार यांना एकमेकांशिवाय पर्याय नाही. एकत्र राहूनच स्थानिक निवडणुकात यश मिळवण्यासाठी हे तिघेही आटोकाट प्रयत्न करतील. आज शिवसेनेच्या ठाकरे गटामध्ये ब-याच जिल्ह्यांमध्ये फूट पडली आहे. विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर उद्धव गटाचे बरेच माजी नगरसेवक शिंदेंच्या गटात सामील झाले आहेत. चांदा ते बांदा 'ऑपरेशन टायगर' राबवले जात आहे. अशा वेळी एकत्र राहण्यातच युतीतील पक्षांची भलाई आहे. त्यातूनही शरद पवारांनी कार्यकर्त्यांना स्थानिक पातळीवर पक्षीय बलाबल ओळखून आघाडी, युती करण्याचे निर्देश दिले. तसे इतरही पक्षांनी केले तर सतेसाठी महाराष्ट्रभर आश्चर्यकारक सरमिसळ आणि तडजोड झालेली पहायची तयारी ठेवावी लागेल.



# बाळासाहेबांच्या स्वप्नांसाठी गनिमीकाव्याने धोबीपछाड?

मुंबईत सध्या निवडणूकांची धग वाढू लागली आहे.प्रमुख सत्ताधारी पक्ष भाजप-शिंदे सेना यांच्याकडून निवडणूक प्रचार आणि तयारीचा शुभारंभ झाला आहे. तर उध्दव ठाकरे यांनी देखील पक्षाच्या ५९व्या वर्धापन दिनाचे निमित्त साधून आपल्या पक्षाकडून कार्यकर्त्याना तयारीला लागण्याचा आदेश दिला आहे. मनसेचे पक्षाध्यक्ष राज ठाकरे यांनी देखील मुख्यमंत्र्याना बांद्रा येथे पंचतारांकीत हॉटेलात स्वत:च्या वाढदिवसा निमित्त भेट घेतली. ही भेट व्यावसाईक आणि राजकीय दोन्ही प्रकारची होती म्हणे! मग निवडणूकांच्या रणनितीवरही तेथे चर्चा झाल्याचे सांगितले जात आहे. या चर्चांचा तपशील बाहेर आला नसला तरी या भेटी नंतर ज्या घटना घडल्या त्यावरून राजकीय चाणाक्ष विश्लेषकांकडून त्यावर भाष्य केले जात आहे.

### हिंदीच्या सक्तीचे भूत दाखवून लुटूपूटूचा संघर्ष?

ठाकरे-फडणवीस यांच्या भेटीनंतर दोनच दिवसांत राज्य सरकारकडून हिंदी भाषेला पहिलीपासून अनिवार्य करण्याबाबतच्या निर्णयाचे शुध्दीपत्रक काढण्यात आले. म्हणजे या पूर्वी शासनाने निर्णय घेताना बहुदा ते शुध्दिवर नव्हते का? अशी मिश्कील प्रतिक्रिया यावर काही मराठी पत्रकारांनी दिली. असो गंमत तर पुढेच आहे. या शुध्दीपत्रकात सरकारकडून तिसरी भाषा म्हणून मराठी इंग्रजी नंतर हिंदीला पर्यायी भाषा घेण्याची मुभा देण्यात आली आहे. मात्र अट अशी की ज्या भाषा शाळेत पहिली ते पाचवीचे विद्यार्थी पर्यायी म्हणून घेतील त्या किमान वीस जणांच्या गटाने घ्याव्या लागतील तरच त्यांना त्या शिकण्यासाठी स्वतंत्र शिक्षक शाळा नेमू शकेल अन्यथा त्यांना दूरस्थ पध्दतीने (ऑनलाईन) शिक्षण घ्यावे लागणार आहे.

आता अजून गंमत पहा राज्यातील मध्यप्रदेशच्या सिमे जवळच्या जिल्ह्यात भाषावार प्रांत रचना झाली तरी मराठी सोबत हिंदी सहजपणे बोलण्या वागण्याची भाषा आहे. विदर्भात उत्तर महाराष्ट्रात हे जाणवते.मराठवाड्यात हैद्राबादी हिंदीचा प्रभाव इतका आहे की अगदी नाशिक नगर पर्यत हिंदीचा वापर (कायकू?) मराठी सोबतच होताना दिसतो. मुस्लिम समाज, उत्तर भारतीय लोक जवळपास सर्वच जिल्ह्यात रोजगारासाठी आले आहेत त्यांच्यामुळे हिंदी देखील महाराष्ट्रात मराठी इतकीच प्रचलीत भाषा आहेच. मुंबई परिसरात दुधवाला, चक्कीवाला रिक्षावाला,पानवाला भैय्याच आहे. त्यामुळे हिंदीला मराठीच्या बरोबरीने स्थान आहे.(भैय्या आजकाल दूध इतना पात्तळ क्यो देता है?)

कर्नाटक आंध्र-तेलंगणच्या सीमेलगतच्या जिल्ह्यात मराठीसोबत कानडी तेलगू देखील प्रचलीत आहे,तर गुजरात लगतच्या महाराष्ट्रात नंदूरबार धुळे ठाणे मुंबई जिल्ह्यात गुजराथी राजस्थानी मारवाडी भाषा मराठी सोबतच प्रचलीत आहेत. कुणाला त्यावरुन जीवघेणा संघर्ष करण्याची राजकारण करण्याची गरज वाटल्याचे दिसत नाही. समाज सामंजस्याने एकोप्याने रहात असताना मग हिंदीच्या सक्तीचे भूत दाखवून निवडणूकीसाठी लुटूपूटूच्या संघर्षाचा मुद्दा का पेटवायचा आहे?

### जनता खोट्या प्रचाराला बळी पडणार नाहीच!

कारण त्यात सरकारसमोर लोकांचे मूळ प्रश्न विरोधकांनी लोकानी विचारूच नयेत? सर्वात महत्वाचा मुद्दा विधानसभा निवडणूकीच्या मतदार याद्या आणि मतदानात झालेल्या घोटाळ्याच्या मुद्यावरुन लोकांचे लक्ष अन्यत्र वळविण्याचा हा उद्योग असल्याचे सामान्य जनतेला कळून चुकले आहे. त्यामुळे मनसे नेते भाजप सोबत न जाता त्यांची अश्या मुद्यावर दिशाभूल करण्यासाठी मदत करत असल्याचे अनुमान राजकीय विश्लेषक मांडत आहेत. कॉग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी हेच पत्रकार परिषद घेवून सांगितले. त्यांनी निवडणूक आयोगाच्या अचानक नियमावलीत बदल करण्याच्या आणि सायंकाळी पाच नंतरचे दस्तावेज नष्ट करण्याच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिल्याचे देखील सांगितले आहे.हिंदी सक्तीच्या या मुद्यावर त्यामुळे मुंबई आणि महाराष्ट्रात आता जनता खोट्या वावदूक प्रचाराला बळी पडणार नसल्याचे दिसत आहे. मराठी भाषेच्या शाळांना खरेतर सुविधा आणि विद्यार्थी का मिळत नाहीत यावर सरकार आणि मनसे सारख्या पक्षांकडून जागृती होणे आवश्यक आहे असे राजकीय विश्लेषक सांगत आहेत. मात्र सवंग राजकीय पोळी भाजून घेण्याची सवय झालेल्या राजकीय नेत्यांना आता लोकांचे खरे प्रश्न सोडवायचे नाहीत म्हणून खोटा आवेश आणून वेळ मारुन नेणारे मुद्दे सूचत असावेत!

### शिवसेना पक्ष प्रमुखांची फिल्मी डायलॉगबाजी!

दुसरीकडे शिवसेनेचे दोन वर्धापनदिन साजरे करण्यात आले एक गट २०२२मध्ये जन्माला आला मात्र त्यांनी देखील ५९वा वर्धापनदिन साजरा केला. कारण खरी शिवसेना आपलीच आहे या मुद्यावर ते ठाम असून सध्या त्यांना निवडणूक आयोगाकडून पक्ष आणि चिन्ह देण्यात आले आहे. त्यामुळे वरळीत या पक्षाच्या कार्यकर्त्याना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबोधीत केले मात्र त्यांच्या भाषणात तोच तोचपणा साचलेपणा अडिचवर्षा पासूनचे जुनेच मुद्दे असल्याचे दिसले. मात्र नुकतेच परराष्ट्र मंत्रालयाच्या कामगिरीवर जावून आलेल्या दोन खासदारांच्या कामगिरीवर शिंदे सेनेकडून या मेळाव्यात भर देण्यात आला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका जिंकण्याचे आव्हान असल्याने शिंदे यांच्याकडून कार्यकर्ते आमदार पदाधिकारी यांची बैठक देखील घेण्यात आली. थोडक्यात रणशिंग फुंकण्यात आले आहे.

तर षण्मुखानंद सभागृहात झालेल्या सभेला सभागृहात मावणार नाही अशी गर्दी झाल्याचे पहायला मिळाले. उध्दव ठाकरे यांनी खास शैलीत शेलक्या शब्दात नेहमीप्रमाणे भाषण केले. मात्र शेवटी त्यांनी फिल्मी पध्दतीने 'कम ऑन किल मी' हा नाना पाटेकर यांच्या प्रहार सिनेमातील गाजलेला डायलॉग म्हटल्याने त्याबद्दल सभा संपल्यावर अस्वस्थ चर्चा पहायला मिळाली. या सभेनंतर तासाभरातच शिंदे यांच्या सभेत ठाकरेंना पुन्हा फिल्मी पध्दतीनेच 'मरे हुवे को क्या मारना' असा जबाब मिळाला त्यामुळे मग पुन्हा या दोन्ही सेनाप्रमुखांच्या वक्तव्यांची चर्चा होत राहिली. मात्र दोनच दिवसांत मुंबईत केंद्रीय गृहमंत्री अमीत शहा आले आणि त्यांनी राजकीय सभा नसतानाही पुन्हा उध्दव ठाकरे यांना डिवचण्यासाठी शिंदे यांच्या शिवसेनेला असली सेना म्हणत मुंबईच्या निवडणूक प्रचाराचा नारळच फोडला.

### ठाकरेबंधू एकत्र येण्याची शक्यता

त्यानंतरही ठाकरे यांच्या सभेत मनसे सोबत जाण्याबाबत केलेल्या सकारात्मक वक्तव्यांवर मनसेच्या प्रवक्त्यांची टिका टिपणी होत राहिली आहे. हे दोन भाऊ एकत्र येणार किंवा नाही उध्दव ठाकरे सकारात्मक आहेत तर प्रस्ताव का देत नाहीत वगैरे आता बोलण्यात येत आहे. मात्र मागील चार वर्षापासून सत्ताधारी पक्ष केवळ मुंबईतून उध्दव ठाकरेंची सत्ता घालविण्यासाठी नको तो राजकीय प्रपंच करुन बसली असताना आता ठाकरे बंधुना एकत्र येवू देण्याची चूक भाजप होवू देणार नाही हे फडणवीस राज ठाकरे भेटीने स्पष्ट झाले आहे.

### अमीत-आदित्य ठाकरेच्या खांद्यावर निवडणूकीची जबाबदारी?

आतल्या गोटात मात्र शरद पवार यांनी जसे एकत्र यावे किंवा नाही याचा निर्णय तरुण पिढीकडे सोपवला तसाच प्रकार मुंबई महापालिकेसाठी दोन्ही ठाकरेबंधूनी केला तर तो मोठा गनिमीकावाच ठरण्याची शक्यता आहे. जाणकार सूत्रांच्या मते अगदी शेवटच्या क्षणी अमीत आणि आदित्य ठाकरे यांच्या खांद्यावर मुंबई महापालिकेच्या निवडणूकीची जबाबदारी सोपवली जाईल आणि नव्या पिढीचे दोन ठाकरेबंधू एकत्र येण्याची शक्यता नाकारता येत नाही. अगदी याच पध्दतीने राष्ट्रवादीने आता दादा-ताईंच्या मध्ये मनोमिलनावर जसे काही निर्णय सोपवले आहेत तसे झाले तर भाजप आणि अन्य राजकीय पक्षांना तो धोबीपछाड असेल. मुंबईचे राजकारण, मुंबई महापालिकेचे अर्थकारण मग ठाकरेंच्या घराण्याकडेच राहिल यात शंका नाही. कारण महाविकास आघाडीतील किंवा महायुतीच्या अन्य पक्षांना हा मोठा धक्का असेल शिंदे यांची उसनी शक्ती मग काम करु शकेल असे नाही आणि भाजप कॉंग्रेस वगैरे पूर्णत: अलग पडण्याची शक्यता आहे.मराठी माणसांची एकगठ्ठा ५६टक्के आणि मुस्लिम व अन्य समाजांची चार पाच टक्के मते या नव्या समिकरणाला सहज मिळू शकतात असे या सूत्रांनी सांगितले. उध्दव ठाकरे या निमित्ताने राजकीय संन्यास घेतील की नाही?राज ठाकरे यांच्याकडून हा निर्णय घेताना भाजपचा दबाव तर येणारच त्यावर ते काय करतील?

शिंदे, कॉंग्रेस इत्यादी पक्ष काय भुमिका घेतील?या सा-या गोष्टीना थारा नसेल कारण अगदी शेवटच्या क्षणी हा गनिमीकावा खेळला जाण्याची शक्यता आहे. उध्दव ठाकरे यांच्या भाषणातील आत्मविश्वासाला 'कम ऑन किल मी' ला बाळासाहेब ठाकरे यांनी शेवटच्या सभेत जसे माझ्या उद्धव आदित्यला सांभाळा अशी आर्त साद होती तशीच किनार आहे. विरोधकांना आणो मनसे प्रमुखांनाही ते तुम्हाला मी नकोच आहे तर बाजुला होतो म्हणू शकतात? त्यानंतर आदित्यला धुरा सोपवून अमित सोबत मनसे त्यांच्यासोबत येवू शकते यात राजकारणासोबतच कौटुंबिक मनोमिलनाचा नवा अध्याय असेल असेही राजकीय सूत्रांचे मत आहे.याच राजकीय संदर्भाने सारी तयारी केली जात आहे असे या सूत्रांचे मत आहे! पाहूया घोडा मैदान दूर नही! तुर्तास इतकेच!!

**किशोर आपटे**

# आणीबाणीची पन्नाशी !



**भारत सरकारने दरवर्षी २५ जून हा दिवस ' संविधान हत्या दिवस ' म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला आहे.हा दिवस १९७५ च्या आणीबाणीच्या अमानुष वेदना सहन करणाऱ्या सर्वांच्या मोठ्या योगदानाचे स्मरण करेल. या निमित्ताने आणीबाणीच्या आठवणी जाग्या करणारा हा लेख.**

२५ जून १९७५ रोजी भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात जारी केलेल्या आणीबाणी विषयीच्या आठवणी देशातील जनता कधीच विसरणार नाही, कारण जगातील सर्वात मोठ्या लोकशाही प्रधान देशामध्ये अशा प्रकारची घटना घडेल असे त्या अगोदर कुणाला स्वप्नातही वाटले नसेल.आणीबाणी मध्ये व्यक्ती स्वातंत्र्यावर आलेले बंधन, वृत्तपत्रांची झालेली मुस्कटदाबी, सक्तीची नसबंदी संबंधीच्या घटना आणि दिल्लीच्या तुर्कमान गेट येथील गरीबांच्या झोपड्यांवर फिरवलेला बुलडोझर या सर्व घटना कधीही न विसरता येणाऱ्या होत्या.आणीबाणी टाळता आली असती का? असा प्रश्न आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर देशातील जनतेला पडला होते. आणीबाणी विषयी या लेखात आपण विस्तृत आढावा घेणार आहोत.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या विरोधात निकाल देऊन त्यांची निवडणूक रद्द केल्यानंतरचा हा घटनाक्रम आहे.अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निकाल बाहेर आल्यानंतर काही तासांतच गुजरात विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर होऊ लागले.सुरूवातीच्या निकालांवरून इंदिरा गांधी यांचा पक्ष (कॉंग्रेस)निवडणूकीत हरणार हे निश्चित झाले होते.कॉंग्रेस विरोधी पक्षांची मोट बांधून तयार झालेला जनता मोर्चा हा पक्ष कॉंग्रेसचा पराभव करून गुजरात मध्ये सत्तेवर येणार हे नक्की झाल्याने इंदिरा गांधी यांना दुहेरी धक्का बसला होता.एकीकडे अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार इंदिरा गांधी यांची निवडणूक रद्द झाली होती आणि दुसरीकडे गुजरात हे राज्य कॉंग्रेसच्या हातातून गेले होते.

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालानंतर इंदिरा गांधी यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी विरोधकांकडून जोरदारपणे होऊ लागली होती.'इंदिरा मस्ट गो' असा नारा विरोधकांकडून देण्यात येत होता.अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या विरोधात इंदिरा गांधी यांच्या कडून सर्वोच्च न्यायालयात अपील केले जाणार हे निश्चित होते आणि त्या ठिकाणी निकाल हा इंदिरा गांधी यांच्या बाजूने लागण्याची जास्त शक्यता होती.परंतु त्या प्रक्रियेमध्ये चार ते सहा महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता होती.सर्वोच्च न्यायालयाकडून अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालाला विनाअट स्थगिती मिळाली असती तर इंदिरा गांधी यांना त्यांच्या पदावर राहण्यात कोणतीही अडचण येणार नव्हती.इंदिरा गांधी अल्पकाळासाठी आपले पद सोडण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात होते.कोणत्याही प्रकारची राजकीय महत्त्वाकांक्षा नसलेले मंत्रीमंडळातील आपले सहकारी सरदार स्वरणसिंग यांच्याकडे त्या तात्पुरत्या काळासाठी पंतप्रधानपद सोपविणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत होती.सर्वोच्च न्यायालयाचा निकाल त्यांच्या बाजूने लागल्यास त्या सन्मानाने पुन्हा पंतप्रधान पदावर येणार होत्या.परंतु तसे होणार नव्हते.

इंदिरा गांधी यांच्या निकटच्या वर्तुळातील अनेक जणांना असे वाटत होते की सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत इंदिरा गांधी यांनी आपल्या पदावरून बाजूला होणे त्यांच्या करता आणि देशाकरता फायद्याचे ठरेल.परंतु इंदिरा गांधी यांच्या तोंडावर हे सांगण्याची त्यांची हिंमत नव्हती.इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळातील जवळ जवळ सर्व सहकारी,कॉंग्रेसशासित राज्यांतील सर्व मुख्यमंत्री आणि कॉंग्रेसचे जवळ जवळ सर्व खासदार यांच्यात मात्र आपणच कसे जास्त निष्ठावंत आहोत, हे इंदिरा गांधी यांना दाखवण्यासाठी जणू स्पर्धाच सुरू होती.इंदिरा गांधी यांनी आपले पद सोडण्याची बिलकूल आवश्यकता नाही असे ते इंदिरा गांधी यांना आग्रहाने सांगत होते.त्यांची निष्ठा किती खरी होती या बाबत संशयाला जरी वाव असला तरी त्यांना खरी भीती होती ती इंदिरा गांधी या तात्पुरत्या काळासाठी सुद्धा पदावरून दूर झाल्या तर आपल्या साम्राज्याला धक्का तर लागणार नाही ना?, इंदिरा गांधी यांच्या कृपेने त्यांनी जे साम्राज्य उभारले होते ते (त्या पदावर नसतील तर) कोसळणार तर नाही ना?अशी भीती त्यांना वाटत होती.

मात्र इंदिरा गांधी यांचे सुपुत्र संजय गांधी हे आपल्या मताबाबत ठाम होते.इंदिरा गांधी यांनी तात्पुरत्या काळासाठी राजीनामा देण्याची आवश्यकता नाही,असा सल्ला त्यांनी आपल्या आईला दिला होता.इंदिरा गांधी यांनी राजीनामा देण्याची गरज नाही हे सांगण्यासाठी त्या सभा आयोजित करण्यात आल्या होत्या.अर्थात या सभांना गर्दी जमवण्यासाठी शेजारच्या राज्यांतून बसेसद्वारे माणसे आणण्यात आली.यामध्ये अर्थातच कॉंग्रेसशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची फार मोठी मदत झाली.

जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील विरोधी पक्ष इंदिरा गांधी यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी करत होते.त्यांनी त्या करता मोठ्या सभा आयोजित केल्या होत्या, तसेच निषेध मोर्चेही काढले होते.याच सुमारास इंदिरा गांधी यांना विख्यात कायदेपंडित नानी पालखीवाला यांच्याकडून अनपेक्षितरीत्या पाठिंबा मिळाला.नानी पालखीवाला हे कॉंग्रेस विरोधी पक्षांचे सहानुभूतीदार समजले जात असल्याने त्यांनी दिलेला पाठिंबा आश्चर्यजनक असाच होता .त्यांनी इंदिरा गांधी यांची केस लढवण्याची तयारी तर दाखवलीच शिवाय इंदिरा गांधी यांनी आपल्या पदाचा राजीनामा देण्याची कोणतीही आवश्यकता नसल्याचा सल्लाही दिला.२४ जून १९७५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांच्या अपिलाबद्दलचा आपला निकाल सुनावला.सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती दिली, मात्र ती अट घालूनच.त्या अटीनुसार इंदिरा गांधी या त्यांच्या पदावर राहू शकणार होत्या, तसेच संसदेत त्या बोलूही शकणार होत्या, मात्र त्यांच्या अपिलाचा अंतिम निकाल लागेपर्यंत त्या संसदेत मतदान करु शकणार नव्हत्या.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा निकाल जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील विरोधी पक्षांना उत्साहित करणारा होता.इंदिरा गांधी यांनी राजीनामा द्यावा म्हणून देशभर आंदोलन सुरू करण्याचा निर्णय जयप्रकाश नारायण यांनी जाहीर केला.आपली ही योजना त्यांनी दिल्ली येथील रामलीला मैदानावरील प्रचंड जाहीर सभेत जाहीर केली.मात्र इंदिरा गांधी या गप्प बसणार नव्हत्या.विरोधकांच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी त्यांनी एक योजना तयार केली होती, ही योजना तयार करण्यात इंदिरा गांधी यांना सर्वात मोलाचे सहकार्य केले होते ते सिद्धार्थ शंकर रे यांनी.सिद्धार्थ शंकर रे हे निपुण कायदेपंडित होते.

२५ जून १९७५ रोजी रात्री अकरा वाजता इंदिरा गांधी राष्ट्रपती भवनात पोहोचल्या.त्यांच्या बरोबर सिद्धार्थ शंकर रे हे होते.देशामध्ये अंतर्गत आणीबाणी जारी करण्याचा निर्णय आपल्या सरकारने घेतला असल्याची माहिती इंदिरा गांधी यांनी राष्ट्रपती फक्रुद्दिन अली अहमद यांना दिली.त्या संबंधीचा आपल्या मंत्रिमंडळाने पारीत केलेला ठराव खरे पाहता इंदिरा गांधी यांनी राष्ट्रपतींना सादर करायला हवा होता परंतु सिद्धार्थ शंकर रे यांनी त्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले.या सर्व गोष्टी नंतर करता येतील, कारण पंतप्रधानांचा शब्द पुरेसा आहे, असे स्पष्टीकरण रे यांनी दिले.त्यावर राष्ट्रपतींनी कोणतेही स्पष्टीकरण मागितले नाही आणि कागदपत्रावर सही केली. त्यानंतर देशभरात आणीबाणी जारी करण्यात आली, जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था, हुकूमशाही मध्ये परावर्तित झाली.

**अभय गोखले**

# शिवसेना शिंदे गट स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत स्वबळावर उतरणार

## जिल्ह्यात सत्ता स्थापनेचा आत्मविश्वास : हरिहर लिंगनवार यांची घोषणा



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी शिवसेना शिंदे गटाने मोठी रणनीती आखली असून, येत्या सप्टेंबर महिन्यात होऊ घातलेल्या नगर परिषद व जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये पक्ष स्वबळावर उतरून प्रत्येक ठिकाणी सत्ता स्थापनेचा निर्धार बाळगून आहे. यवतमाळ येथे आयोजित पत्रकार परिषदेत शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार यांनी ही माहिती दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री संजय राठोड यांच्या नेतृत्वाखाली हा निवडणूक लढविण्यात येणार असून, संपूर्ण जिल्ह्यातील शिवसैनिकांना एकत्र आणत संघटनात्मक बांधणी बळकट केली जाणार आहे.

हरिहर लिंगनवार यांनी सांगितले की, "शिवसेना शिंदे गटाच्या माध्यमातून जिल्ह्यात ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या मूलमंत्रानुसार काम केले जात आहे. त्यामुळे येत्या निवडणुकांमध्ये नागरिकांना भ्रष्टाचारमुक्त आणि पारदर्शक प्रशासन देण्याचा आमचा निर्धार आहे." ते पुढे म्हणाले की, जिल्ह्यातील नगर परिषद आणि जिल्हा परिषद क्षेत्रात विकासाच्या विविध योजनांचा भरणा करण्यात आला आहे. आतापर्यंत साडेतीन लाखांहून अधिक घरकुलांची निर्मिती झाली आहे. विजेच्या प्रश्नांवर शासनाने ठोस उपाययोजना केल्या आहेत. तसेच ग्रामीण भागातील पांदन रस्ते आणि शेतकऱ्यांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. शेतकरी आणि तरुण वर्गाचा शिवसेनेला पाठिंबा मोठ्या प्रमाणात मिळत आहे. "जिल्ह्यातील शेतकरी, शेतमजूर, तरुणवर्ग, व्यापारी वर्ग आणि सर्वसामान्य जनता मोठ्या प्रमाणावर शिवसेना शिंदे गटाच्या पाठीशी उभी आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये शिवसेना उमेदवारांची मोठ्या मताधिक्याने निवड होईल," असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. लिंगनवार यांनी सांगितले की, "शिवसेना ही सामान्य जनतेच्या हक्कांसाठी लढणारी आणि जनतेच्या समस्या सोडविणारी पार्टी आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये शिवसेना सर्व नगर परिषद तसेच जिल्हा परिषदेवर भगवा फडकावणार हे निश्चित आहे." धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांवर आधारित प्रचार केला असून "धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारसरणीचा आणि कार्यपद्धतीचा प्रचार-प्रसार करत शिवसेना शिंदे गट निवडणुकीला सामोरे जाणार आहे. आम्ही प्रत्येक घरापर्यंत विकास पोहचवण्याचे काम प्रामाणिकपणे करू," असेही लिंगनवार यांनी स्पष्ट केले.

शिवसेना शिंदे गटाची ताकद वाढतेय अशी प्रतिक्रिया यावेळी बोलताना जिल्हा संपर्कप्रमुख श्रीधर मोहोड यांनी सांगितले की, "पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात आणि जिल्ह्यात शिवसेना शिंदे गटाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे. सामान्य जनतेच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेणारा आणि विकासाची दिशा दाखवणारा हाच एकमेव पर्याय आहे." भविष्यातील दिशा आणि निर्धार तयार केला असून शिवसेना शिंदे गटाने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्ता स्थापन करण्यासाठी ठोस रणनीती आखली आहे. कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण, प्रचाराचे नियोजन आणि मतदारांशी थेट संवाद यावर भर दिला जाणार आहे. पत्रकार परिषदेला हरिहर लिंगनवार, श्रीधर मोहोड, राजूदास जाधव, गजानन डोमाळे, यशवंत पवार, विश्वास नांदेकर यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिस्तबद्ध संघटन आणि नवनियुक्त पदाधिकारी

यावेळी जिल्ह्यातील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची सविस्तर माहिती देण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी विधानसभा निहाय संघटनात्मक नेमणुका करण्यात आल्या आहेत : हरिहर लिंगनवार – जिल्हा संपर्कप्रमुख (वणी, राळेगाव, यवतमाळ, आर्णी विधानसभा क्षेत्र) श्रीधर मोहोड – जिल्हा संपर्कप्रमुख (दिग्रस, पुसद, उमरखेड विधानसभा क्षेत्र) विश्वास नांदेकर – समन्वयक (चंद्रपूर-यवतमाळ लोकसभा क्षेत्र) राजूदास जाधव – जिल्हा प्रमुख (आर्णी, वणी विधानसभा क्षेत्र) गजानन डोमाळे – जिल्हा प्रमुख (यवतमाळ, राळेगाव विधानसभा क्षेत्र) यशवंत पवार – जिल्हा प्रमुख (दिग्रस, पुसद, उमरखेड विधानसभा क्षेत्र) या सर्व नियुक्त्या एक वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात आल्या असून, यामार्फत प्रत्येक विधानसभा क्षेत्रात संपर्क आणि संघटन मजबूत करण्यावर भर देण्यात येणार आहे.

# गव्हर्नमेंट शाळेत विद्यार्थ्यांचे पेढा भरवून स्वागत...

## जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांच्याहस्ते प्रवेशोत्सव





जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - शहरातील गव्हर्नमेंट शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प व पेढा देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या स्वागत सोहळ्याने विद्यार्थ्यांसह पालकांची मनं जिंकली.

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार, प्रवेशाचा पहिला दिवस उत्साहात साजरा करण्यासाठी गोधनी रोडवरील गव्हर्नमेंट शाळेत जय्यत तयारी करण्यात आली होती. या वेळी प्राथमिक उपशिक्षणाधिकारी राजेश मडावी, विस्तार अधिकारी प्रणिता गाढवे, दिपीका गुल्हाणे तसेच पालक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंदार पत्की यांचे पारंपरिक बंजारा वाद्यांच्या निनादात स्वागत करण्यात आले. शाळेच्या प्रांगणात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना स्वतः पत्की यांनी पेढा भरवून व गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. 'या शाळेने अनेक अधिकारी, पदाधिकारी घडविले असून याच शाळेची अदिबा अनम आयएएस झाली आहे. ही गौरवशाली परंपरा पुढे नेण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे,' असे आवाहन पत्की यांनी यावेळी केले. शाळेच्या विकासासाठी रंगरंगोटी, आधुनिक प्रयोगशाळा व बॉटनिकल गार्डनसाठी आवश्यक निधी दिला जाईल, असेही त्यांनी जाहीर केले. तसेच शाळेतील नैसर्गिक परिसर, स्वच्छता व पोषक वातावरणाचे त्यांनी विशेष कौतुक केले. या कार्यक्रमाला मुख्याध्यापक साहेबराव पवार, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये सबाहत तसनिम, सैय्यद असलम अहमद, सुनिल गावंडे, अनवार अहमद निसार, सुनिल बरमदे, शुभांगी शंभरकर, हिमांशु गिरम, शालिनी ठाकरे, संदिप मारगाये, सैय्यदा फरहीन अंजुम, प्रकाश साबळे, सीमा सिडाम, राजकुमार यादव, प्रविण धाबर्डे, स्मिता मेश्राम, नितीन घोटकर, मुग्धा बन्सोड यांचा समावेश होता.

# पालकमंत्री संजय राठोड यांच्याहस्ते ई-बसेसचे लोकार्पण





जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : यवतमाळ आगारास तीन नवीन शिवाई या वातानुकुलित अद्ययावत ई-बसेस व दारव्हा आगारास पाच नवीन लालपरी बस प्राप्त झाल्या. या बसेसचे लोकार्पण आज पालकमंत्री संजय राठोड यांच्याहस्ते यवतमाळ आगाराच्या आवारात करण्यात आले.

यावेळी पालकमंत्र्यांसह आ.बाळासाहेब मांगूळकर, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक हेमराज कच्छवा, आगार व्यवस्थापक जावेद खान, हरीष थोरात, पराग पिंपळे, हरीहर लिंगनवार, राजुदास जाधव, इलेक्ट्रॉनिक बस आगार व्यवस्थापन प्रतिक पवार, निरिक्षक चव्हाण, यंत्र अभियंता नरसिंग चव्हाण, विभागीय वाहतूक अधिकारी दादाराव दराडे, वाहतूक निरीक्षक हरीष थोरात आदी उपस्थित होते. पालकमंत्री संजय राठोड यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील सर्व आगारास यापूर्वी प्रत्येकी १० नवीन बसेस प्राप्त झाल्या होत्या. आता नव्याने यवतमाळ बस आगारास पाच अत्याधुनिक शिवाई या वातानुकुलित इलेक्ट्रॉनिक बसेस उपलब्ध झाल्या. त्यापैकी आगारास प्राप्त तीन बसेसचे लोकार्पण आज झाले. दोन इलेक्ट्रॉनिक बसेस लवकरच उपलब्ध होणार आहे. सोबतच दारव्हा आगारास पाच नवीन लालपरी प्राप्त झाल्या असून या बसेसचे लोकार्पण देखील पालकमंत्र्यांनी फित कापून केले व बसेस प्रवाशांच्या सेवेत दाखल केल्या. यावेळी पालकमंत्री व आ. बाळासाहेब मांगूळकर यांनी बस व बसमधील सुविधांची पाहणी केली.

## एकाच रॉयल्टीवर दिवसभर होणारी रेती वाहतुक थांबवा, मनसेची मागणी



जनमाध्यम प्रतिनिधी

राळेगाव - एकच रॉयल्टी काढून दिवसभर रेती तस्करी केल्या जात असल्याने यावर प्रतिबंध करण्याची मागणी मनसेच्या वतीने उपविभागीय अधिकारी राळेगाव यांच्याकडे करण्यात आली.

राज्यात मोजकेच रेती घाट लिलाव झाले असुन याचाच फायदा रेती तस्कर चांगल्या प्रकारे करून घेतल्या जात असल्याचा प्रकार राळेगाव तालुक्यात सुरू आहे. लगतच्या चंद्रपूर जिल्ह्यातील सोईट व बर्मडा रेती घाट लिलाव झाला असुन या ठिकाणी मिळणाऱ्या अधिकृत रॉयल्टीच्या आधारे रेती विक्री करणे गरजेचे असताना मात्र रेती तस्करांनी शक्कल लढवून एकच रॉयल्टी काढून त्याद्वारे रेती घाटावरील इतर ठिकाणची रेती चोरून त्याची दिवसभर वाहतूक राळेगाव तालुक्यात खैरी, वडकी, राळेगाव मार्गे आणुन विकल्या जात आहे.

या पास वर केवळ चार ब्रास रेती वाहतूक करण्याची परवानगी असताना मात्र सात ते आठ ब्रास रेती वाहतूक टिप्पर द्वारे केली जात आहे. या ओव्हर लोड वाहतुकीमुळे रस्त्याची तर वाट लागतच आहे, परंतु भरधाव धावणाऱ्या या टिप्परमुळे नागरिकांच्या जीवाला सुध्दा धोका निर्माण झाला आहे.

## अ.भा.सफाई मजदुर कॉंग्रेस ट्रेड यूनियन ७२६२ या संघटनेची सभा व नियुक्ती प्रमाणपत्र वाटप





जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - २२ जून रोज रविवारला पुसद येथील विश्रामगृहात अ.भा.सफाई मजदुर कॉंग्रेस ट्रेड युनियन ७२६२ ची सभा संपन्न झाली, ही संघटना प्यारेंट संघटना म्हणून नावारूपास आली असून या संघटनेच्या सभेचे आयोजन नवनियुक्त यवतमाळ जिल्हा अध्यक्ष संजय पवार यांच्या वतीने करण्यात आली होते.

या सभेच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष संघटनेचे प्रदेशाध्यक्ष बालाजी मंडेपु यानी भुषविले तर या सभेच्या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथि म्हणून अनुपजी खरारे (प्रदेश कार्याध्यक्ष) पि.बी.मालकुळे प्रदेश महामंत्री, राहुलजी टाक प्रदेश सचिव, सुभाष चव्हाण प्रदेश संघटक, ओवेश सारवान युवा प्रकोष्ठ प्रदेशाध्यक्ष,गणेश तांबोळे अमरावती विभागीय अध्यक्ष, इत्यादी मान्यवर मंचकावर उपस्थित होते.

मान्यवराच्या हस्ते नवनियुक्त अकोला जिल्ह्याचे अध्यक्ष रमेशजी गोडाले, वाशिम जिल्ह्याचे अध्यक्ष नंदूजी पवार, अमरावती जिल्ह्याचे अध्यक्ष किशोर धामने, यवतमाळ जिल्हा अध्यक्ष संजय पवार, यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष म्हणून गणेश सोनवाल या नवनियुक्त पदाधीकार्यांना नियुक्ति प्रमाणपत्र देऊन त्यांना मान्यवरा कडुन मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक यवतमाळ जिल्हा अध्यक्ष संजय पवार यानी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.वसंत राठोड यानी केले, तसेच अनिल झुंज यानी सर्वांचे आभार मानले.

# वेचक

## दिग्रस येथे शाळेचा पहिला दिवस शाळा प्रवेशोत्सव साजरा



दिग्रस - नगरपरिषद मराठी प्राथमिक शाळा क्रमांक ७ लक्ष्मी नगर दिग्रस येथे शाळेचा पहिला दिवस शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे डॉक्टर विरेंद्र अस्वार वैद्यकिय अधिकारी ग्रामीण रुग्णालय दिग्रस विद्यार्थ्यांचे पालक व विद्यार्थी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष व सदस्य या कार्यक्रमाला उपस्थित होते. शाळेचा पहिला दिवस असल्यामुळे विद्यार्थ्यांना शालेय गणवेश बूट मोजे शालेय पुस्तक विद्यार्थ्यांना जेवनासह गोड पदार्थ देण्यात आले महाराष्ट्र शासनाचा वृक्षारोपण कार्यक्रम एक पेड मा के नाम या कार्यक्रमाच्या निमित्त शालेय परिसरात वृक्षारोपण सुद्धा करण्यात आले डॉक्टर वीरेंद्र अस्वार यांनी आपल्या कार्यक्रमाचे भाषणात पूर्ण विद्यार्थ्यांना शालेय स्कूल बॅग विद्यार्थ्यांना प्रेझेंट देण्याचे सांगितले आहे.

## दिग्रस आर्यवैश्य समाजाची नविन कार्यकारणी गठीत



दिग्रस - दिग्रस आर्यवैश्य समाजाचे नवनिर्वाचित अध्यक्ष सचिन बनगीनवार यांनी आपली कार्यकारिणी गठीत करून शुक्रवार २० जून २०२५ रोजी स्थानिक ब्रम्हानंद स्वामी महाराज मंदिराच्या सभागृहात कार्यकारिणी जाहीर करून नवीन कार्यकारिणीतील पदाधिकारी व सदस्यांचे बॅच लावून पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. अध्यक्ष सचिन बनगीनवार यांनी जाहीर केलेल्या दिग्रस आर्यवैश्य समाजाच्या नविन कार्यकारणीत उपाध्यक्ष म्हणून रामदास पद्मावार व डॉ. मिलिंद पद्मावार, सचिव सखाराम तुंडलवार, सहसचिव ऍड. विवेक बनगीनवार, कोषाध्यक्ष विशाल सत्तूरवार, सह कोषाध्यक्ष ओम कब्बावार तर सदस्य म्हणून मुकेश कोंडावार, मंगेश दुद्दलवार, धनंजय निलावार, पंकज चक्करवार, पंकज गुज्जलवार, गजानन चिंतावार, समीर उपलेंचवार, गौरव दुद्दलवार, शरद पद्मावार, महेश व्यवहारे, अंकुश गड्डमवार यांची निवड करण्यात आली या प्रसंगी उपस्थित शेकडो आर्यवैश्य समाजबांधवानी टाळ्या वाजवून नवीन कार्यकारिणीचे स्वागत केले. या प्रसंगी मंचकावर आर्यवैश्य समाजाचे माजी अध्यक्ष संजय दुद्दलवार, नवनिर्वाचित अध्यक्ष सचिन बनगीनवार, माजी प्राचार्य देवानंद पद्मावार यांची उपस्थिती होती.

## सहकार सेना जिल्हा कार्याध्यक्षपदी जितेश नावडे यांची नियुक्ती



यवतमाळ - येथील सामाजिक कार्यकर्ते जितेश नावडे यांची उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या सहकार सेना जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड झाली आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आपण आपल्या क्षेत्रामध्ये शिवसेना संघटना शक्तीशाली व मजबूत करण्यासाठी अविरत काम कराल अशी अपेक्षा ठेऊन वरीष्ठांकडून नियुक्ती देण्यात आली आहे. ही असलेली अपेक्षा ताकदीनिशी पूर्ण करण्याचा प्रयत्न करील अशी आशा जितेश नावडे यांनी व्यक्त केली. जितेश नावडे हे सहकार क्षेत्रातील एक अनुभवी नेतृत्व म्हणून सर्व दूर परिचित आहेत. ते या पदाद्वारे सहकार क्षेत्रात क्रांतीकारक बदल घडून आणतील याचा ठाम विश्वास आहे. नावडे यांनी माऊली अर्बनच्या माध्यमातून आपल्या नेतृत्वगुणांची ओळख जिल्ह्याला करून दिली. त्यांच्या निवडीचे श्रेय त्यांनी शिवसेना नेते खासदार अरविंद सावंत, खासदार संजय देशमुख, जिल्हा संपर्क प्रमुख राजेंद्र गायकवाड, जिल्हा प्रमुख किशोर इंगळे यांना दिले आहे.

## उमरखेड; स्थानिक नागरिकांचे टोल नाक्यावरील कर तात्काळ बंद करा



उमरखेड - नुकतेच नागपूर तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील नांदगव्हाण गावाजवळ टोल नाका सुरू करण्यात आले आहे. सदर टोल नाक्यावरून उमरखेड शहर हे १५ किलोमीटरच्या अंतरावर असून येथील शहरवासीयांना कडून टोल नाक्यावर कर घेण्यात येत आहे. त्यामुळे पंधरा किलोमीटर अंतरावरील नागरिकांकडून टोल वसुली आकारल्या नये करिता २३ रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने उपविभागीय महसूल अधिकारी सखाराम मुळे यांना निवेदनातून मागणी करण्यात आली तसेच येत्या काही दिवसात स्थानिक नागरिकांकडून टोल वसुली बंद न केल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ही निवेदनातून दिला आहे.

# विद्यार्थ्यांची चारचाकी वाहनात गावभर मिरवणूक, शाळेत आनंदसोहळा

## 'एक मुलगा, एक झाड' शिक्षणासोबत निसर्गाचीही जोपासना



जनमाध्यम प्रतिनिधी

बाभूळगाव - तालुक्यातील जिल्हा परिषद मराठी शाळा, आसेगाव देवी येथे विद्यार्थ्यांचा पहिला दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेतील ८०% विद्यार्थी पारधी समाजातील असून, १००% निकालाची परंपरा असलेल्या या शाळेतील पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे विशेष स्वागत करण्यात आले.

मुख्याध्यापक विजय गुल्हाने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात शाळा समिती अध्यक्ष प्रदीप तडस्कर, सरपंच सचिन चव्हाण, जेष्ठ नागरिक व सेवानिवृत्त मुख्याध्यापक पुंडलिकराव भगत, तसेच ग्रामसेवक ओमप्रकाश कावलकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ, पुस्तके व गणवेश देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांना चार चाकी वाहनातून भव्य गावफेरीने झाली. त्यानंतर शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. "एकमुलगाएकझाड" या उपक्रमांतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याने वृक्षलागवड केली. त्याचबरोबर शाळा आकर्षक सजावटीने नटविण्यात आली होती. सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट वाटप करून गोड आठवणींचा प्रारंभ करण्यात आला.

उल्लेखनीय बाब म्हणजे शाळा पूर्णपणे डिजिटल असून सौरऊर्जेवर कार्यरत आहे. त्यामुळे शाळेला वीजबिल लागत नाही. या सर्व उपक्रमांमुळे आसेगाव देवी येथील जिल्हा परिषद मराठी शाळा, शिक्षण क्षेत्रात एक आदर्श ठरत आहे.

# मुख्याधिका-याने केली आयुक्ताच्या आदेशाची अवहेलना

## जिल्हा परिषदच्या जागेची नगर पंचायतकडून हर्रास : सामाजिक कार्यकर्ते धरमचंद छल्लाणी यांची कार्यवाहीची मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी

बाभूळगाव - नगर पंचायत बाभूळगाव येथील मुख्याधिकारी डॉ. पल्लवी सोटे ह्या माहिती अधिकारात मागितलेली माहिती अर्जदारांना देत नसल्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत. असेच एका माहिती अधिकार प्रकरणात त्यांनी चक्क राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ अमरावती यांच्या आदेशाची दोन वेळा अवहेलना केल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे. बाभूळगाव शहरातील रहिवासी तथा सामाजिक कार्यकर्ता धरमचंद छल्लाणी यांनी बाभूळगाव आठवडी बाजार हर्रास प्रकरणी माहितीचा अधिकार कायदा अंतर्गत माहिती मागितली होती.

मात्र त्यांना नगर पंचायतकडून प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी मुदतीनंतर राज्य माहिती आयुक्त खंडपीठ अमरावती यांचेकडे द्वितीय अपील दाखल केला. दोनदा आदेश पारीत केल्यावर सुद्धा मुख्याधिकारी डॉ. पल्लवी सोटे यांनी माहिती दिली नाही. हा राज्य माहिती आयुक्त यांच्या आदेशाचा अपमान असून येथील मुख्याधिकारी व जिल्हा परिषदच्या जागेवर डल्ला मारणा-या नगर पंचायत प्रशासन यांचेवर शासनाने कठोर कार्यवाही करावी अशी मागणी केली, त्या बाबतचे निवेदन १८ जून रोजी जिल्हाधिकारी यांना दिले आहे. याबाबत सविस्तर असे की, स्थानिक आठवडी बाजारची जागा जिल्हा परिषद यांचे यवतमाळ मालकीची असताना नगर पंचायत बाभूळगाव कोणत्या नियमानुसार हर्रास करीत आहे, याबाबतची माहिती माहिती अधिकार कायद्यांतर्गत जिल्हा परिषद यवतमाळ यांना मागितली असता त्यांनी नगर पंचायत बाभूळगाव यांना ह्या संबंधात माहिती द्यावी असे पत्र दिले होते. त्यानुसार नगर पंचायतने आजपर्यंत सुद्धा वारंवार अर्ज करून, अपिल दाखल करून कोणतीही माहिती न दिल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे जावे लागले. यानंतर राज्य माहिती आयोगाने एकदा नव्हे तर दोनदा आदेश दिल्यानंतरही येथील मुख्या धिकारी डॉ. सोटे यांनी माहिती दिली नाही.

उलट 31 जानेवारी 2025, 5 फेब्रुवारी, 18 फेब्रुवारी, 20 फेब्रुवारी अश्या सुनावणीसाठी तारखा देवून स्वतः मुख्याधिकारी गैरहजर राहून सुनावणी घेतल्या नाही. या वरून आजपर्यंत आठवडी बाजाराचा करण्यात आलेला हर्रास हा नि यमबाह्य दिसून येत आहे. आणि माहिती दिल्यामुळे हा प्रकार उजेडात येवू शकतो, या भितीपोटी सदर मुख्याधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे.

# राष्ट्रवादी कॉंग्रेस (श.प.) पक्षाच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक पूर्व बैठक




जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा पूर्वी एकाच परिवाराच्या ताब्यात होता. मात्र, आता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस शरद मैंद यांनी आपल्या पक्षाला सर्व सामान्यांचा पक्ष असल्याची ओळख करून दिली. दिनांक २२/६/२०२५ रोजी रविवार ला हॉटेल अनुप्रभा येथे आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकिबाबत पक्षाच्या सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी यांची बैठक घेण्यात आली.

त्यामुळे आगामी सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकित राष्ट्रवादी कॉंग्रेस (शप) ची सत्ता येईल असा विश्वास पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा यवतमाळ जिल्हा निरीक्षक अफझल फारुकी यांनी व्यक्त केला. येथील हॉटेल अनुप्रभा मध्ये स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक पूर्व आढावा बैठकीत ते मार्गदर्शन करीत होते. यावेळी उपस्थित जिल्हाध्यक्ष वर्षाताई निकम म्हणाल्या की सध्या पेरणीची गडबड, मग सणाची आणि लगेच स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीची घाई होणार असल्याने वेळेचे भान ठेऊन कामाला लागावे लागणार आहे.

सर्व धर्म समभाव मानणारा समाजातील दलित, मुस्लिम आदिवासी मतदार धामक्ष असून या मतदाराला आपलेसे करा, पुसद तालुक्यातील माळपठार भागात पाणी पोहोचविण्यासाठी जिप च्या सत्तेची चावी हातात घ्या, त्यासाठी गाव तिथे शाखा खोलण्याचे त्यांनी आवाहन केले. यावेळी शहराध्यक्ष डॉ. अकील मेमन यांनी दोन्ही दिवंगत माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक व सुधाकर राव नाईक यांच्या काळात पानी कमी पडू दिले नाही.

# मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रम समितीवर धनंजय तांबेकर



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - गोदावरी अर्बन मल्टिस्टेटचे व्यवस्थापकीय संचालक, राज्य पतसंस्था फेडरेशनचे संचालक, तसेच सहकार क्षेत्रातील प्रख्यात तज्ज्ञ धनंजय तांबेकर यांची नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 'पतसंस्था व्यवस्थापन पदविका' अभ्यासक्रम समितीवर निवड झाली आहे. एक विषयतज्ज्ञ म्हणून त्यांच्या अनुभवाचा फायदा आता राज्यभरातील हजारो विद्यार्थ्यांना होणार आहे.

पतसंस्था व्यवस्थापन पदविकेचा अभ्यासक्रम करणार तयार

धनंजय तांबेकर हे सहकार क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून सुपरिचीत आहेत. त्यांनी ज्या ज्या संस्थांमध्ये कार्य केले त्या संस्था नावारूपास आल्या आहेत. सहकार क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून त्यांनी देशविदेशातील अनेक सेमीनारमध्ये मार्गदर्शन केले आहे. नाशिक येथील मुक्त विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतर्फे 'डिप्लोमा इन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी मॅनेजमेंट' हा नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. याच अभ्यासक्रमाचा विषयनिहाय अभ्यासक्रम तयार करण्यासाठी एका तज्ज्ञ सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीमध्ये 'सहकारी पतसंस्थांचे व्यवस्थापन' या विषयासाठी धनंजय तांबेकर यांची विषयतज्ज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात आली. या विषयाच्या समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. रविंद्र भोसले काम पाहणार आहेत. सहकार क्षेत्रातील तांबेकर यांचे महत्वपूर्ण योगदान आणि ज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांना व्हावा, या उद्देशाने ही निवड केल्याचे विद्यापीठाने पत्रात नमूद केले आहे. यासंदर्भातील बैठक २७ मे रोजी विद्यापीठाच्या मुख्यालयात नाशिक येथे पार पडली.

# त्या तिघांच्या मैत्रीची घडी बसली नीट 'एमबीबीएस' साठी तिघेही ठरले फीट !



जनमाध्यम प्रतिनिधी

दिग्रस - खरं तर ते एका शहराचे, एका शाळेचे किंवा एकमेकांना फारसे ओळखीचे देखील नव्हते. नीटच्या तयारीसाठी ते एकत्र आले आणि त्यातुन त्यांची ओळख झाली. लवकरच ही ओळख मैत्रीत बदलली. अन् या तिघांनी आपल्या यशाने एक आगळी वेगळी प्रेरणा नीटची तयारी करीत असलेल्या लाखो मुलांना दिली.

या तिघांची एकत्रित मेहनत, समंजस मैत्री आणि सातत्याने केलेला एकत्रित अभ्यास आज सर्व विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणास्थान ठरत आहे. एकाच वेळेस, एकाच स्वप्नासाठी, एकमेकांना बळ देत, तिघांनीही या प्रवासात एकमेकांची पाठराखण केली आणि अखेर यशाचं सुंदर फळ मिळवलं. जैद, आदित्य अन् द्रोपदच्या मैत्रीची आणि त्यांच्या एकत्रित यशाची ही अनोखी कहाणी आहे. जैद व आदित्य दोघेही दिग्रसचे. पण ते एकमेकांना ओळखत देखील नव्हते. आदित्य येथील विद्याभारती शाळेचा तर जैद विद्यानिकेतन शाळेचा विद्यार्थी. द्रोपद हा बाभूळगावच्या दारव्हळकर महाविद्यालयाचा विद्यार्थी. नांदेड येथील भार्गव क्लासेस मध्ये नीटची तयारी करण्यासाठी तिघांनाही प्रवेश घेतला. येथेच त्यांची ओळख झाली आणि लवकरच ही ओळख मैत्रीत परिवर्तित झाली. तिघांनी सोबत केलेल्या ग्रुप स्टडीने नीट सारखा कठीण पर्वत सहज सर करता येतो.

हे त्यांनी दाखवून दिले. खरं तर मित्र एकमेकांचे स्पर्धक नसतातच मुळी! पण अनेकदा या पवित्र नात्याला स्पर्धेची धडर लागते अन् आधी चांगले मित्र असलेली मुले एकमेकांना स्पर्धक मानू लागतात. पण मैत्रीच्या या अनोख्या कहाणीने नांदेडसह संपूर्ण राज्यात यशाचे आगळेवेगळे उदाहरण सर्वांसमोर ठेवले आहे. जिथे मैत्री, मेहनत आणि एकसमान ध्येयाने तीन मित्रांनी वैद्यकीय प्रवेश परीक्षा नीटमध्ये अप्रतिम यश मिळवले आहे. या तिघांनी एकत्र अभ्यास करत, एकमेकांना प्रोत्साहन देत, स्वप्नांना पंख दिले आणि जवळपास समान गुण मिळवून आपल्या मैत्रीचे नाव उज्ज्वल केले.

# शिवसंस्थेचे संस्कार जीवनात अंमलात आणावेत

## हर्षवर्धन देशमुख यांचा प्रशिक्षणार्थ्यांशी संवाद, पोलीस व सैन्यभरतीपूर्व प्रशिक्षणार्थीचा निरोप समारंभ

**अमरावती/का.प्र.**

पोलीस आणि सैन्यभरतीचे प्रशिक्षण गेल्या सहा महिन्यांपासून घेत असताना शिवाजी शिक्षण संस्थेने आपल्यावर मेहनत घेण्यासोबतच चांगले संस्कार दिले आहेत. भविष्यात जेव्हा शासकीय सेवेची किंबहुना जनसेवेची संधी मिळेल तेव्हा आपल्या कर्तृत्वातून आपण शिवाजी शिक्षण संस्थेचे प्रशिक्षणार्थी आहात याची जाणीव समाजाला व्हावी. संस्थेचे संस्कार आपल्या जीवनात अमलात आणून आपण जीवनात यशस्वी व्हावे अशी भावना श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी व्यक्त केली.



श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या अनंत पंजाबराव देशमुख स्पर्धा परीक्षा अकादमीच्या वतीने टीआरटीआय व बार्टी पुणे यांच्या सहयोगातून पोलिसभरती व सैन्यभरतीपूर्व प्रशिक्षणाच्या प्रथम बॅचच्या प्रशिक्षणार्थ्यांचा निरोप समारंभ थाटात पार पडला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानाहून ते बोलत होते.कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, अमरावती विद्यापीठाचे



व्यवस्थापन परिषद सदस्य भैय्यासाहेब मेटकर, सुप्रसिद्ध युवा वक्ते विशाल खर्चवाल, अनंत पंजाबराव देशमुख अकादमीचे संचालक पंकज निर्मळ यांची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाची सुरूवात संस्थेच्या संस्कारगीताने झाली. यावेळी भैय्यासाहेब मेटकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले की, आजच्या स्पर्धात्मक युगात बहुजनांच्या तरूण तरूणींना स्पर्धा परिक्षेचे प्रशिक्षण देऊन अतिशय दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शासकीय नोकरीसाठी घडवणूक करण्याचे काम संस्था चांगल्या रितीने करत आहेत. अनंत पंजाबराव देशमुख अकादमीच्या उद्देश्य सफल होताना पाहून आपल्याला आनंद होत असल्याची भावना व्यक्त केली.

कार्यक्रमात अकादमीच्या वतीने अर्चना सावलकर, मुन्नी कासदेकर, भाग्यश्री बेठेकर, रेखा लडके, मनिता परते, मनिष मावस्कर, सुभाष बेठेकर, रामविलास परते, माधव बोके, कमलेश धिकार या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच युवराज पांडे आणि साक्षी चव्हाण या विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण कार्यक्रमाबद्दल आपली मते व्यक्त केली.प्रास्ताविक अकादमीचे संचालक पंकज निर्मळ संचालन गजानन पाटील, आभार प्रदर्शन वैभव भडके यांनी केले. कार्यक्रमाला अकादमीचे सर्व शिक्षक तसेच अकादमीमध्ये प्रशिक्षण घेणारे शेकडो विद्यार्थी तसेच विद्यार्थिनींची उपस्थिती होती.



### आत्मशक्तीला जागृत करा, यश पदरात पडेल - विशाल खर्चवाल

आपण केवळ आपल्या बाहेरच्या ज्ञान आणि शक्तीच्या उपयोगातून रोज स्पर्धा करत असतो. मुळात आपली जीवनात स्पर्धा ही स्वत:शीच असते. गौतम बुद्ध असो किंवा हनुमान असोत त्यांना त्यांच्या शक्तीची जाणीव ही स्वत:च्या अंतरआत्म्याचे चिंतन केल्यावरच झाली. त्यामुळे आधी स्वत:मध्ये असलेल्या शक्तीची जाणीव करून घ्या आणि नंतर तुमच्याशी स्पर्धा करणारा कुणीही नसेल. ज्याप्रमाणे एखाद्या अणुच्या आतमधील उर्जेचा वापर करून जगात अणुउर्जेसारखी प्रचंड उर्जा निर्माण झाली तशीच उर्जा प्रत्येकाच्या आतमध्ये आहे. त्या उर्जेचा वापर आपल्या जीवनात करायला शिका असा सल्ला कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते विशाल खर्चवाल यांनी विद्यार्थ्यांशी बोलताना दिला.

### अकादमीचा विद्यार्थी इतरापेक्षा वेगळा असेल - हेमंत काळमेघ

गेल्या सहा महिन्यांपासून अनंत पंजाबराव देशमुख अकादमीच्या वतीने बार्टी आणि टीआरटीआयच्या संकल्पनेतून विद्यार्थी घडविण्याची जी संकल्पना होती त्याला मूर्तरूप देण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली आहे. २०२२ पासून या अकादमीमध्ये अनेक चांगल्या सुविधा निर्माण करून बहुजनांच्या मुलांना स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण आणि मुल्यशिक्षण देण्याचे काम अविरतपणे सुरू आहेत. या बॅचमधून बाहेर पडणारा विद्यार्थी हा इतरांपेक्षा निश्चितच वेगळा असेल कारण त्याचे प्रशिक्षण हे अनंत पंजाबराव देशमुख अकादमीमधून प्रशिक्षण घेतलेले आहे. भविष्यात शासकीय नोकरीत असताना संस्थेचे संस्कार आणि मुल्य कधीही विसरू नका असे हेमंत काळमेघ विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हणाले.




समितीतर्फे महेंद्र कॉलनी येथे योग दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी मन

## अहिल्या महिला आरोग्य समितीतर्फे मनपा आयुक्तांचे स्वागत



**अमरावती/का.प्र.**

आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त महानगरपालिका अंतर्गत अहिल्या महिला आरोग्य समितीतर्फे महेंद्र कॉलनी येथे योग दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी मनपाच्या नवनियुक्त आयुक्त सौम्या शर्मा यांचे रोप देऊन आशा वर्कर संध्या पाटील यांनी स्वागत केले.

याप्रसंगी उपस्थित मान्यवर महानगर पालिका उपायुक्त शिल्पा नाईक ,सार्वजनिक आरोग्य विभाग महानगरपालिको आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे,डॉ. मुंदडा,क्षिप्रा मानकर,अंकुर होलीनेस फाउंडेशनअध्यक्ष नीलिमा भूत,मंजुषा महाले,स्वाती सुनील जावरे,आरोग्य समितीचे अध्यक्ष प्रवीण आठवले,कल्पना वानखडे तसेच आरोग्य विभागातील नागरिक महिलावर्ग उपस्थित होते.

### डॉ. दादासाहेब उपाख्य ज्ञा.पु.राऊत यांचे निधन



**अचलपूर**- सामाजिक, शैक्षणिक, व साहित्य क्षेत्रातील व्यक्तीमत्व व गुरुदेव विद्या प्रसारक मंडळाचे सचिव, नितीन राऊत यांचे वडील डॉ. दादासाहेब उपाख्य ज्ञानेश्वर राऊत यांचे आज २३ जून रोजी सकाळी ४ वाजताच्या सुमारास पुणे येथील निवासस्थानी निधन झाले. त्याची अंत्येष्टी आज मंगळवार २४ जून रोजी सकाळी १० वाजता शांती वाटीका येथील परतवाडा निवासस्थानावरुन करण्यात येणार आहे. ते आपल्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी असा आप्त सोडून गेले आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र शोक संवेदना व्यक्त केल्या जात आहे.

## गुरांना युरियापासून दूर ठेवा

**अमरावती/का.प्र.**

बऱ्याचदा पाळीव जनावरे युरिया खातात आणि युरियाच्या सेवनामुळे जनावरांना तीव्र विषबाधा होते आणि त्यांच्या शरीरात अमोनियाची पातळी वाढते. त्यामुळे कधीकधी जनावरांचा मृत्यू देखील होतो.

अशा परिस्थितीत पाळीव जनावरे युरियाच्या संपर्कात येऊ नयेत आणि ते सेवन करू नये याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की बहुतेक शेतकरी शेतीच्या कामात युरियाचा वापर खत म्हणून करतात. त्यामुळे अनेक वेळा जाणूनबुजून किंवा नकळत युरिया पशुखाद्यात मिसळतो. त्याचे सेवन केल्याने प्राण्यांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अशा परिस्थितीत प्राण्यांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.

**युरिया विषबाधेसाठी व्हिनेगर सोल्यूशन**

प्राण्यांमध्ये युरियामुळे होणाऱ्या विषबाधेवर उपचार करण्यासाठी व्हिनेगर म्हणजेच ॲसिटिक असिडचा वापर केला जातो. युरियामुळे होणाऱ्या विषबाधेमुळे प्राण्यांमध्ये अमोनियाची पातळी वाढते. दुसरीकडे, व्हिनेगरमध्ये असलेले ॲसिटिक ॲसिड अमोनियाला निष्क्रिय करते आणि पोटाच्या रुमेन नावाच्या भागात पीएच पातळी कमी करते, ज्यामुळे विषारीपणाचा परिणाम कमी होतो. यामुळेच, युरियामुळे विषारीपणा झाल्यास, प्राण्यांना ५टक्के ॲसिटिक ॲसिड असलेले २ ते ४ लिटर द्रावण दिले जाते. यामुळे विषारीपणाचा परिणाम कमी होतो.

**जनावरांच्या खाद्य आणि चारा प्रक्रियेत जास्त युरिया वापरू नये**

प्राण्यांसाठी तयार केलेले अन्न पूर्णपणे युरियामुक्त ठेवावे. तसेच, चारा पिकांना खताचा जास्त डोस देऊ नये. कारण त्याचा प्राण्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो आणि त्यांना युरियामुळे विषारीपणा देखील होऊ शकतो. म्हणून, योग्य प्रक्रियेसह संतुलित प्रमाणात युरिया वापरणे आवश्यक आहे.

युरिया विषबाधा जवळजवळ सर्व प्रकारच्या प्राण्यांमध्ये होते. अशा परिस्थितीत, प्राण्यांना युरियापासून दूर ठेवले पाहिजे. ज्या ठिकाणी युरियाचा वापर अतिशय शास्त्रीय पद्धतीने निर्धारित प्रमाणात केला जातो, तेथे जनावरांना विषबाधा होण्याचा धोका कमी असतो. दुसरीकडे, जर युरियाचे प्रमाण जास्त असेल तर विषबाधा निश्चित आहे.

यासोबतच, जर एखाद्या प्राण्याने युरियाची पिशवी चाटली किंवा युरिया मिसळलेले पाणी सेवन केले तर त्या प्राण्याचा मृत्यू जवळजवळ निश्चित आहे.

## अंजनगाव नगरपरिषदच्या डिझेल पेट्रोलची शहरभर चर्चा

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

शहरातील कचरा संकलनासाठी व ईतर शासकीय वाहनांसाठी वापरल्या जाणाऱ्या गाड्यांसाठी दरमहा सुमारे साडेचार लाख रुपयांचे डिझेल,पेट्रोल व ऑईल लागत होते. मात्र एका खाजगी कंत्राटदारच्या स्वाक्षरीने काही महिन्यांतच बेकायदेशीररीत्या महिन्याकाठी सहा लाख रुपये डिझेल पावतीवर खोडतोड करुन बिल काढण्याचा प्रयत्न केला असल्याची चर्चा नगरपरिषद परिसरात आहे.

नगरपरिषद क्षेत्रातील कचरा व्यवस्थापनासाठी वापरल्या जाणाऱ्या गाड्यांसाठी व कार्यालयीन कामकाजाचे गाड्यांमध्ये मोठ्या प्रमाणात डिझेलचा वापर होतो ज्यामुळे नगरपरिषदला मोठा आर्थिकभार सोसावा लागतो.नगरपरिषदच्या सर्व वाहनांना अंदाजे महिन्याकाठी चार लाख रुपयांचे डिझेल, पेट्रोलची आवश्यकता असताना नगरपरिषद कार्यालयामध्ये सतत ठीय्या देऊन व अधीका-यांशी घनिष्ट संबध असणा-या एका



### शासकीय वाहनांच्या डिझेल बिलावर अधिकाऱ्या ऐवजी कंत्राटदारांचीच स्वाक्षरी

खाजगी कंत्राटदार व्यक्तीने घंटागाड्या व ट्रक्टर वाहनांसाठी डिझेल व पेट्रोलचा वापर करण्याच्या अधीकार नसताना मर्जीने अधीकार व स्वाक्षरीचा गैरवापर करीत आपल्या स्वाक्षरीने डीझेल,पेट्रोल घेतले असल्याचे बेकायदेशीर प्रकरण समोर आले आहे.या गैरकृत्यातील डिझेल, पेट्रोल घेतल्याच्या स्वाक्षरी असलेल्या पावत्या सार्वजनिक झाल्या असल्याने,कार्यालयाने नेमुन दिलेल्या कामकाजास व शासकीय वाहनांच्या इंधन वापरण्यासाठी अधीकार देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने डिझेल ,पेट्रोल घेणे गरजेचे असताना,यात कोणताही अधिकार नसणा-या खाजगी व्यक्तीचे स्वाक्षरीने ईंधन घेण्यात आले आहे. खाजगी कंत्राटदार व्यक्तीच्या स्वाक्षरीने डिझेल, पेट्रोल घेण्याचा गैरप्रकार किती वर्षांपा सून सुरू होता,त्यास तसे अधीकार पालीके मार्फत हस्तातरीत केल्या गेले होते काय ? त्यास पालीके द्वारा अधीकृत केले होते काय ?त्याने सदर केलेली बिले ही वाढीव आकडेवारी दर्शवुन सादर केली काय ? ही बिले पालीके मार्फत स्वीकृत झाली काय ? या सर्व बाबीची चौकशी होणे गरजेचे असून यात लाखो रुपयांची हेराफेरी झाली असल्याची शक्यता वर्तवीण्यात येत आहे.

> नगरपरिषद मध्ये असला कोणताही प्रकार झालेला नाही.पुर्वी नगर परीषदेचे एस.आय.सुर्यवंशी डिझेल पेट्रोलच्या बिलावर सह्या करत होते. कंत्राटदाराने सह्यांची बिले सादर केल्याची माहीती नाही.शहरात गाडयांचे काम चालू असल्याने डिझेल च्या बिलात वाढ झालेली आहे.
>
> **मिलिंद वानखडे,** आरोग्य निरीक्षक, नगरपरिषद अंजनगाव सुर्जी

नगरपरिषदेच्या इंधन घोटाळ्यात लाखो रुपयांचा भ्रष्टाचार करणाऱ्या खासगी कंत्राटदार व्यक्तींची व संमधीत विभागाची सखोल चौकशी होणे गरजेचे असताना पालीके मार्फत प्रकरणात मूग गिळून आहे.या प्रकरणात चौकशी झाल्यास बिंग फुटेल या भितीने खाजगी कंत्राटदाराचे पातक दडपण्यात आले असल्याने नगरपरिषद प्रशासनाच्या कार्यपद्धती व कार्यप्रणालीवर प्रश्न चिन्ह उपस्थित होत आहे.

## एनएमसी मान्यता प्रक्रियेत द्वितीय वर्ष एमबीबीएस

### एमपीएससीकडून लवकरच ९५० पदांची भरती, अमरावती जीएमसीमध्येही कर्मचारी वाढ

**अमरावती/ का.प्र.**

गेल्या वर्षी सुरू झालेल्या एनएमसी मान्यता प्रक्रियेत सरकारी वैद्यकीय महाविद्याल याच्या एमबीबीएसच्या दुसऱ्या वर्षाची माहिती देताना अधिका ऱ्यांनी अमरावती मंडळाला पुढील एका महिन्यात केवळ अमरावतीमध्येच नव्हे तर राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पुरेसा कर्मचारी नियुक्त केला जाईल. कर्मचाऱ्यांची कमतरता आणि काही सुविधांमुळे एनएमसीने नवीन सत्राची मान्यता थांबवली होती. अशी सूचना सुमारे ३० महाविद्यालयांना पाठवण्यात आली होती.

अधिकाऱ्यांनी अमरावती मंडळाला सांगितले की, वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव धीरज कुमार आणि इतर अधिकारी बुधवारी मेडिकल कौन्सिलसमोर हजर झाले. त्यांनी आश्वासन दिले की एमबीबीएसच्या अभ्यासासाठी आवश्यक असलेल्या शिक्षकांची नियुक्ती पुढील काही दिवसांत केली जाईल.त्यांच्या आश्वासनानुसार, एनएमसीने एमबीबीएसच्या वेगवेगळ्या वर्षांच्या मान्यतेबाबत सकारात्मक आणि जलद निर्णय घेण्याचे सांगितले आहे.एमपीएससीच्या ९५० पदांसाठी जाहिरात वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी अमरावती विभागाला सांगितले की, सरकारने राज्य निवड आयोगामार्फत वैद्यकीय महाविद्याल यांमध्ये ९५० पदांच्या कायमस्वरूपी भरतीसाठी जाहिरात दिली आहे. आतापर्यंत कंत्राटी पद्धतीमुळे डॉक्टर महाविद्यालयांमध्ये शिकवण्याचे टाळत असत.आता कायमस्वरूपी नियुक्त्या मिळाल्यानंतर ते तयारी करत आहेत. त्याचप्रमाणे, एनएमसी समोर, राज्य अधिकाऱ्यांनी असा दावाही केला आहे की महाराष्ट्रात भरपूर वैद्यकीय पदवीधर आहेत.अमरावतीसाठी अलिकडेच ८ नवीन पदांच्या भरतीची माहिती देताना सूत्रांनी सांगितले की, अमरावतीमध्ये कर्मचाऱ्यांची संख्या ४५ वर पोहोचली आहे.



नीटचा निकाल जाहीर झाल्यानंतर, वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेशाबाबत गोंधळ सुरू होतो.त्याचप्रमाणे, एनएमसी प्रत्येक महाविद्यालयातील अध्यापन कर्मचारी आणि इतर सुविधांचे निरीक्षण करण्यासाठी स्वतःची टीम पाठवते. पूर्णपणे समाधानी झाल्यानंतरच त्या वर्षाच्या अभ्यासाला मान्यता दिली जाते. सुविधा आणि कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे मान्यता देण्यापूर्वी वैद्यकीय परिषदेने देशातील १०५ वैद्यकीय महाविद्यालयांना नोटिसा बजावल्या होत्या.त्यामुळे एमबीबीएस आणि वैद्यकीय शास्त्राच्या इतर शाखांच्या अध्यापनाबद्दल चिंता व्यक्त केली जात होती. परंतु बातमीनुसार, राज्य सरकारच्या प्रधान सचिवांनी एनएमसीला लेखी आश्वासन दिले आहे की कर्मचाऱ्यांची कमतरता भासणार नाही.

दरम्यान, सूत्रांनी अमरावती मंडळाला सांगितले की जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा महिला रुग्णालय अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न करण्यात आले आहे. तथापि, हे पहिले वर्ष असल्याने, इर्विन आणि डफरिन ताब्यात घेण्यात आले नाहीत. सूत्रांनी सांगितले की ही प्रक्रिया पुढील चार महिन्यांत पूर्ण होईल. कमी-अधिक प्रमाणात नवीन सत्र देखील त्याच वेळी सुरू होईल. इर्विन रुग्णालयात वैद्यकीय महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांचे ३० डॉक्टर सेवा देत आहेत. सूत्रांनी सांगितले की वैद्यकीय महाविद्य

# राज्यातील सर्व शाळांसाठी नवीन वेळापत्रक लागू

**अमरावती /का.प्र.**

राज्यात आता राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली असल्याने शालेय विद्यार्थ्यांसाठी यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून नवीन वेळापत्रक लागू करण्यात आले आहे. यावर्षीपासून या नव्या धोरणाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी होणार असून, त्यानुसार नव्या वेळापत्रकाचीही अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

राज्यातील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सध्याच्या स्थितीनुसार, ५ ऑक्टोबर २०१७च्या शासन परिपत्रकानुसार विषयानुसार तासिकांची विभागणी लागू आहे. मात्र, १६ एप्रिल २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यात नवीन शैक्षणिक धोरणाची (न्यू एज्युकेशन पॉलिसी) अंमलबजावणी केली जाणार आहे. हे नवीन धोरण शालेय विद्यार्थ्यांसाठी यंदाच्या शैक्षणिक वर्षापासूनच लागू होणार असून, त्यानुसार तासिका आणि होणार आहे. त्यानुसार पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी नव्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी देखील यंदाच्या वर्षीपासून केली जाणार आहे. या नव्या धोरणानुसार पहिली आणि दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी सुधारित शालेय वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने सर्व माध्यमांच्या शाळांसाठी इयत्ता पहिली व दुसरीसाठी हे सुधारित वेळापत्रक लागू करण्यात आले आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने १८ जून २०२५ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार, नव्या शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आलेले सुधारित वेळापत्रक लागू



करण्यात आले आहे. या वेळापत्रकात विषयवार तासिकांची स्पष्ट विभागणी करण्यात आली असून, नवीन अभ्यासक्रमाला अनुसरून ते रचण्यात आले आहे. शाळांचा अध्यापन कालावधी सर्व शाळांसाठी एकसमान ठेवण्यात आला असून, परिपाठ, मधली सुट्टी आणि समृद्धीकरण तासिकांमध्ये वेळेच्या उपलब्धतेनुसार थोडाफार फरक असू शकतो, असे शासनाने स्पष्ट केले आहे. या नव्या वेळापत्रकात गणित, पर्यावरण, भाषा, आरोग्य शिक्षण व कलाशिक्षण यांसारख्या विषयांना समप्रमाणात वेळ देण्यात आला आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल. सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये एकसंध अभ्यास आराखडा लागू करण्याचा उद्देश या वेळापत्रकामागे असून, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाचा समतोल राखण्यास मदत होईल. शालेय जीवन अधिक गुणवत्तापूर्ण आणि शिस्तबद्ध व्हावे, या उद्देशानेच हा निर्णय घेण्यात आल्याचे शालेय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.


**२०२५-२६ साठी सुधारणा जाहीर**

अभ्यासक्रमाच्या रचनेत बदल केले जाणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नवीन शैक्षणिक धोरणाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी सुरू करण्यात येणार आहे. यावर्षी केवळ इयत्ता पहिलीसाठी हे नवे धोरण लागू

**राज्य शासनाचा आदेश प्रसिद्ध**

२१० दिवस अध्ययन-अध्यापनासाठी नवीन वेळापत्रकानुसार, संपूर्ण शालेय वर्षात एकूण ३६५ दिवसांपैकी २१० दिवस हे अध्ययन-अध्यापनासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. त्यासाठी ३५ आठवड्यांचा अभ्यासकाल निश्चित करण्यात आला आहे. उर्वरित दिवसांमध्ये परीक्षा, मूल्यांकन आणि सहशालेय उपक्रम राबवले जाणार आहेत. त्यामध्ये परीक्षा व अनुषंगिक कृतीसाठी १४ दिवस, सहशालेय उपक्रमांसाठी १३ दिवस आणि रविवार व इतर सुट्ट्यांसह एकूण १२८ दिवस सुट्टीचे नियोजन करण्यात आले आहे.

# अरण्ययोगी दादा चितमपल्ली



**को**णतीही साहित्यिक विद्या असो, कसल्याही प्रकारचे संशोधन असो, त्याच्या प्रारंभापासूनच एका परंपरेची निर्मिती होत असते. साधारणतः ती परंपरा निर्बंधित, स्वतःच स्वतःला जोपसणारी असते. युगा-युगापासून ज्ञानाच्या परंपरेची ही अतूट श्रृंखला आपापल्या विधेत, समाजहितकारी कार्य करीत असते. फक्त परंपरा जोपासणा त्याचे नाव बदलत असते, जसे आमचे दादा चितमपल्ली!

अरण्यऋषी दादा मारुती चितमपल्ली, वैदिक काळातील वने, वन्य प्राणी व प्राचीन काळात त्यांचे रीतसर वैज्ञानिक अध्ययन करण्याकरिता वनातच राहणारे ऋषी मुनी यांच्या परंपरेचा या आधुनिक युगात प्रतिनिधित्व करीत आहेत. पालकाप्य मुनि शातकर्णी ऋषी, वराहमिहीर, हँसदेव जैन मुनी, डल्हनाचार्य या विभूतीचा वारसा त्यांना लाभला आहे व त्यांच्या संपूर्ण लेखनात, वाणीत, स्वभावात, आहारात, कोणीही भावनाशील व्यक्ती प्राचीन ऋषी मुनींशी त्यांची तुलना आपोआपच करायला लागत असे, हे मी स्वतः कित्येक वेळा पाहिले आहे.

वन्य जीवनाशी समरस होऊन मृदुल भावना जोपासणे व सातत्याने पन्नास वर्ष समाजहिताकरीता निसर्गाशी नवीन पीढी जोडण्याकरीता लेखन करीत राहणे या काळात अश्यक्यच आहे. परंतु दादांच्या तपस्वी व निसर्ग अर्पित स्वभावामुळे दुश्वार कार्य शक्य झाले. दादांचे संपूर्ण साहित्य वन आत्मा व आत्मियतेचे प्रतीक आहे आणि मराठी भाषेला गौरवान्वित करणारी आहे. जंगलाशी त्यांचे नाते, स्नेहबंध अभूतपूर्व स्वरुपात त्यांच्या प्रत्येक कथेत झळकते.

पाच भाषा बोलणाऱ्या दादांचे शहर सोलापूर ही जन्मस्थळी. परंतु वनविभागात नोकरीच्या निमित्ताने ५० वर्षे विदर्भातच त्यांचा निवास राहिला. यात दुमत असायला नकोच की इंग्रजी वन्य साहित्य क्षेत्रात काही उत्कृष्ट वन साहित्य उपलब्धआहे. प्रकृती संवर्धन क्षेत्रात, साहित्य निर्मितीद्वारे आपले योगदान देणारे ते लेखक गण वारंवार अभिनंदनाचे पात्र आहेत.

परंतु दादांसारख्या जीवनातील प्रदीर्घ कालखंड वने, वृक्ष, वन्यजीवन यांच्या सानिध्यात व त्यांच्या वैज्ञानिक विवेचनेत समर्पक भाव ठेवून कार्य करणारे संपूर्ण देशात क्वचितच मिळतील. वनविभागाच्या सेवेत राहून दादांद्वारे भावूक, प्रेमळ व प्रेरणास्पद साहित्याची रचना करणे अद्वितीय कार्याच्या श्रेणीत ठेवण्यात येईल. जन्मापासून व समज आल्यानंतर वनाशी मी स्वतः संबंधित आहे व मला स्वेच्छापूर्वक जाणीव आहे की, साहित्य रचना, कोमल भावनांची जोपासना करण्याकरीता येथे वाट फारच अरुंद आहे. दादा चितमपल्ली यांनी आपल्या साहित्यात, गोंदिया, भंडारा, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर व गडचिरोली भागातील मराठी भाषेतील प्रयुक्त बोलीभाषेतील अभूतपूर्व १,००,०० शब्दांचा प्रयोग केला आहे. त्यांची सर्व पुस्तके मिळून एक अत्यंत उपयोगी मराठी बोलीभाषेचा शब्दकोष उदयास आला आहे. त्यांचे संपूर्ण साहित्याचे पठन केल्यानंतर कोणत्याही रसिक पाठकाच्या या विलक्षण शब्दांचा संसार लक्षात येणारच.

पुणे संस्कृत महाविद्यालय व कवि कालीदास संस्कृत विद्यापीठाचे विद्यार्थी राहिलेले दादा, संस्कृत भाषेचे अध्येता व पाली भाषा, हिंदी, इंग्रजी वन्य साहित्याच्या सर्व पुस्तकाचे अध्ययता होते. अरण्यऋषी यांनी लिहीलेले संपूर्ण साहित्य अरण्य अंतरंगतेचा दीर्घ प्रवास आहे व त्यांचा संत स्वभाव, अपरिग्रह हे जंगलांच देणे त्यांना आहे.

आषाढ सरीचा सागवान वृक्षाच्या मोठ्या सळसळीत पानावर पडणाऱ्या पावसाच्या थेंबाची अभूतपूर्व संगीत रचना मानव विरहीत अरण्यात असणाऱ्या देवालयाची भग्नावस्था, गणित पर्णाचे रुदन व नवपल्लवित पानांची सुकुमार भाषा देवांनीच माणसाला दिलेल्या करुणा व उल्हास व त्यातून अंकुरीत अरण्याचा साक्षात्कार पाहण्याकरीता एक अख्खे जीवन अरण्य अंतरंग राहावे लागते, दादा चितमपल्ली सारखी तपस्या करावी लागते, त्यांच्या तपाचे परिणाम, त्यांच्या संपूर्ण साहित्यात उलगडलेले आहे.

नवेगाव अभयारण्याच्या प्रारंभिक अवस्थेत अभयारण्य विकसित करण्यात दादांचा अमोल वाटा आहे. तसे पाहिले तर तो त्यांच्या मेहनत, कार्यक्षमता, शिस्तबद्ध आकलनाचा परिणाम आहे की, आज हजारोंच्या संख्येत स्थलांतरीत पक्षी तेथे येतात. दादांच्या रानवाटा, पक्षी जाये दिगंतरा, घरट्या पलीकडे, नवेगाव बांधचे दिवस, जंगलाचं देणं या पुस्तकाना उच्चस्तरीय पुरस्कारांद्वारे सन्मानित करण्यात आले. राज्यात दादांचा एक विशिष्ट पाठक वर्ग आहे व नवीन पीढीने, निसर्ग, वन्यजीवन, वन्यप्राणी पक्षी, वने याच्याशी परिचित व्हावे, त्यांचे रक्षण करावे, हाच त्यांचा आग्रह असे.

दादांनी लिहीलेल्या चकवा चांदण आत्मवृत्तांतात, सोलापूर येथे जन्म झाल्यानंतर थेट त्यांचे प्रिय मित्र माधवरावजी पाटील यांच्या पर्यंत दादा चितमपल्ली यांनी भोगलेल्या यथार्थ व सृजनतेचे प्रतीबिंब आहे. शासकीय नोकरीत अत्यंत कर्तव्यदक्षता, श्रमसाध्यता, इमानदारी बाळगून उत्तम कार्य करण्यात कधी-कधी किती नरकीय यातना भोगाव्या लागतात याचे यथार्थ चित्रण या ग्रंथात अदभूत स्वरुपात वर्णन करण्यात आले आहे. याबाबतीत दादा सर्वांचा आदर करतांना लिहितात, सुज्ञ व दुष्ट प्रवृत्तीच्या माणसाचा हा संघर्ष सनातन आहे. चांगल्या माणसाचे अनेक प्रकार असू शकतात, परंतु दुष्ट माणसंही सर्वकाळ सारखीच असतात. स्वप्नसृष्टीचे अतीरंजीत लालित्य या पुस्तकात नाही. अरण्यात दडलेला ईश्वरकृपेचा बोध घेऊन अत्यंत सहजतेने जीवन व जंगल याची मार्मिकता, उल्हास शब्दात उकेरण्यात आला आहे.

चकवा चांदण भिन्न भिन्न स्थितीत परिस्थितकीय मानवीय व्यवहारात उद्भवलेल्या भावनांचे जीवनात समायोजन कशाप्रकारे करता येऊ शकते व मानवीय स्वभावात असलेली सहजतेची दुर्बोधता कशाप्रकारे अंगीकार करावी लागते. या भावाचा अमोल दस्तावेज आहे. दादा पक्षी व पक्षी स्थलांतरणाचे वरिष्ठ ज्ञाता होते. त्यांनी लिहिलेला पक्षी शास्त्र ग्रंथ पक्षी मित्रांकरिता वरदानस्वरुप आहे. तृणमोर पक्षी शोधण्यात त्यांना यश आले होते. रानकुत्र्यांवरील त्यांचे संशोधन, आज या विषयावरील संशोधन कर्त्याकरीता, विद्यार्थ्यां करीता दादांची अप्रतीम देणगी आहे.

डॉ. सलीम अली, प्रसिद्ध चित्रकार आलमनेरकर, प्रसिद्ध लेखक पु.ल. देशपांडे, बाबा आमटे, माडगुळकर दादांचे परम मित्र. या सर्व थोर पुरुषांचा दादांसोबत परमस्नेह होता. दादा जीवनातील दारुण प्रसंगावर मात देत ९३ वर्षांच्या वयात साहित्य सृजनात अविरत साहित्य साधनेत मग्न होते. प्रचार विरहित स्थितप्रज्ञता कशी असते याचा सहज बोध त्याच्यात होतो. दुष्काळ असो किंवा असहनीय उन्हाळा असो, नदीचा प्रवाह ओसरेल, संथ होईल, नजरेस येणार नाही. परंतु शेकडों वर्ष प्रवाहाची अंतीम परिणितीत पाण्याचे मूळतत्व तसेच असते, अदृश्य. प्रत्येक पावसाळा नवीन जलप्रवाह घेऊन येतो, परंतु त्या नवीन प्रवाहाला मूळतत्त्वाशी शाश्वत विलीनीकरण परंपरेचे अनुगमन करावेच लागते. आमचे दादा आरण्य साहित्याचे मूळतत्त्व होते.

साहित्य सृजनाच्या प्रत्येक क्षेत्रात हेच घडत असते. कोणतेही साहित्य असो, विधान असो, त्यात मूळतत्त्व चिरंतन असते, अक्षुण राहते. त्या-त्या विधेतील मूळतत्त्वाचा पारंपारिक आधार घेऊनच साहित्य प्रवाहाचा पुढील प्रवास सुरु असतो. सर्व नदी आणि ओढ्यांची अपार जलराशी समुद्र आणि वृहद नद्या यांना येऊन मिसळते. समुद्र आणि मोठ्या नद्या नम्रनत (खालील भागात) असतात, हेच त्यांच्या श्रेष्ठत्वाचे प्रमाण नाही का?

आम्हा सर्वांकरीता तर अरण्य ऋषी दादा चितमपली, संत ज्ञानदेव महाराजांच्या ओवी स्वरुपच आहेत.

**।अविद्ये काळवंखे । की सुबोध सुदिने फांके ।**
**सितले प्रसादाकें। जया चेनि ।।**

ज्याच्या शीतल प्रकाशामुळे अविद्यासम तिमीर नष्ट पावते आणि आत्मबोधरुपी सुदिवसाचा उदय होऊन संपूर्ण ज्ञानमय प्रकाश सर्वत्र पसरतो.

**कौशल मिश्र,** वर्धा

# 'जी ७' परिषदेचे मर्यादित यश

**'जी** ७' म्हणजे ग्रुप ऑफ सेव्हन. सात प्रमुख औद्योगिक विकसीत राष्ट्रांचा गट. या गटात फ्रान्स, संयुक्त अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, जपान, इटली, व कॅनडा आणि सदस्य नसलेला युरोपियन युनियन (युरोप मधील २७ देशांचा समुह)हे आहेत. या सात राष्ट्रांचा अनौपचारिक रित्या चर्चा करण्याचा हा मंच आहे.

१९७० मध्ये आलेले ऊर्जा संकट, त्यानंतर आलेला विनिमय दरातील चढ उतार, जागतीक मंदी, अविकसित देशांच्या समस्या या सर्व समस्यांवर विचारविनिमय व उपाययोजना म्हणून १९७३ साली फ्रान्स, संयुक्त अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, जपान व इटली या सहा राष्ट्रांच्या गटाची स्थापना करण्यात आली व 'जी ६' या नावाने तो ओळखला जाऊ लागला.



१९७६ मध्ये कॅनडाला सदस्यत्व दिल्याने 'जी ७' झाले. पुढील वर्षी रशियाचा समावेश झाला म्हणून 'जी८' झाले. २०१४ मध्ये क्रिमीयावर केलेल्या आक्रमणामुळे रशियाचे सदस्यत्व स्थगित करण्यात आले व रशिया शिवाय सात राष्ट्रांची बैठक घेण्याचे ठरले. त्यामुळे ग्रुप पुन्हा 'जी ७' झाला. १९९९ मध्ये जी ट्वेंटी या गटाची स्थापना झाली. त्यात विस राष्ट्रांचा समावेश असल्यामुळे 'जी ७' चे महत्व थोडे कमी झाले. त्यामुळे काही संस्था अथवा राष्ट्रांना परिषदेत आमंत्रित करण्याचे ठरले.

**उद्दिष्ट**-सदस्य राष्ट्रांच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक बाबतीत स्थैर्य, तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी उपाययोजना, लोकशाही तत्वाचे पालन व मानवा अधिकाराची जपणूक, जागतीक शांतता, सदस्या राष्ट्रा मधील परस्पर सहकार्य समन्वय वाढवणे, गरीब व विकसनशील राष्ट्रांच्या प्रगतीचा विचार, सदस्य राष्ट्रांच्या विकासासाठी मदत करणे, आरोग्य समस्या, शिक्षण, तंत्रज्ञान, विकास आदी विषयावर चर्चा करून प्रगतीच्या दृष्टिकोनातून उपाययोजना करणे, आदी उद्दिष्टे आहेत.

**कार्यपद्धती**-या परिषदेचे स्वतःचे कायम स्वरूपाचे सचिवालय कोठेही नाही. अध्यक्षपद दरवर्षी फिरते असून त्याचा क्रम फ्रान्स, संयुक्त राष्ट्र, इंग्लंड, जर्मनी, जपान, इटली, कॅनडा असा आहे. ज्याच्याकडे अध्यक्ष पदाची जबाबदारी असते तोच आयोजन करतो. परिषदेचे आयोजन दर वर्षातून एकदा केले जाते. निर्णय एकमताने घेतल्या जातो, बहुमताने नाही. घेतलेले निर्णय कायदेशीररित्या बंधनकारक नसले तरी जगाच्या राजकारणात आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात प्रभाव पाडतात.

### कॅनडातील ५१ वी परिषद

'जी ७' ची २०२५ मधील ५१ वी परिषद कॅनडाच्या अल्बर्टा राज्यातील कनानास्किस मध्ये संपन्न झाली. यासाठी सहभागी राष्ट्रांच्या तसेच आमंत्रित राष्ट्रांच्या प्रमुखासह नाटोचे प्रमुख मार्क रूट्टे उपस्थित होते. यात जागतीक शांतता, जागतिक सुरक्षा, मजबूत अर्थव्यवस्था, डिजिटल पद्धतीतील बदल, आदी वर विषयावर चर्चा झाली. चर्चेत जी सात राष्ट्रा शिवाय, आमंत्रित म्हणून ऑस्ट्रेलिया, मेक्सिको, ब्राझील , दक्षिण आफ्रिका, युक्रेन, भारत, आदींनी भाग घेतला २०१८ पासून भारत सतत या परिषदेत आमंत्रित म्हणून हजर राहत आहे.

### परिषदेतील भारताची स्पष्ट भूमिका

दहशतवाद हा जागतिक धोका असून त्या विरोधात सर्वांनी एकत्र येऊन कारवाई करणे आवश्यक आहे. दहशतवादी कारवाया करणारा देश व त्याला त्याचे समर्थन करणारा देश या दोन्ही देशांना त्याची किंमत मोजावी लागेल. असे मोदीने स्पष्ट सांगितले. तसेच जागतिक शांती व समृद्धीसाठी आपल्या विचार व धोरणात स्पष्टता असावी एका बाजूला दहशतवादाविरुद्ध बंदी घालणे व दुसऱ्या बाजूला दहशतवादाला उघडपणे समर्थन करणे अशी धोरणे बंद व्हायला हवीत. आर्थिक दृष्ट्या अल्प विकसित असलेल्या देशांचा म्हणजे 'ग्लोबल साऊथ' देशांचा ( यात दक्षिण अमेरिका व कॅरेबियन तसेच अनेक आफ्रीकन व आशियाई देशांच्या समावेश आहे)आ वाज जागतिक व्यासपीठावर पोहोचविणे ही भारत आपली जबाबदारी समजतो. तसेच यांच्या चिंता व गरजा यावर लक्ष देण्याचे त्यांनी आवाहन केले. गेल्या काही वर्षापासून बिघडलेले भारत व कॅनडांचे संबंध व व्यापार सुरळीत करण्यावर भर देण्याचे दोघांनीही ठरविले. व नवीन उच्चायुक्तांची नेमणूक करण्यावर दोघांचीही सहमती झाली ही एक भारताच्या दृष्टिकोनातून बरी उपलब्ध म्हणावी लागेल.

### परिषदेतील चर्चीत विषय

परिषदेने काढलेल्या निवेदनात इस्त्राइलला स्वसंरक्षणाचा हक्क असल्याचे मान्य करून त्याला पाठिंबा देण्यात आला. इराणला अण्वस्त्रधारी न होऊ देण्यावर भर देण्यात आला. रशिया युक्रेन वादात सहाही राष्ट्रांनी युक्रेनला पाठिंबा दर्शविला आहे. तसेच युक्रेनला अधिक मदत करण्याचाही निर्णय घेण्यात आला. मिडल ईस्ट मध्ये शांतता ठेवणे, भारत व कॅनडा मधील परस्पर व्यापार संबंध सुरळीत करण्याच्या हेतुने वाटचाल, तसेच दोन्ही राष्ट्रातील उच्चायुक्तांच्या नेमणुकीवर भर देण्यात आला. हवामानातील बदल, जागतीक अर्थव्यवस्था, चीनच्या वाढत्या प्रभावा बाबत सावध चर्चा झाली. हरित ऊर्जा, तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणूक वाढविण्यावर भर देण्यात आला.

इजराइल इराण, युक्रेन रशिया, यांच्या मधील संघर्षावर चर्चा झाली. मात्र गाजा हमास यावर चर्चा झाली नाही. तसेच विकसनशील राष्ट्रासाठी ठोस आर्थिक मदत, हवामान बदला मधील स्पष्ट कृती योजना, जागतिक दारिद्र्य निर्मूलनासाठी उपाययोजना, आरोग्य, मानवाधिकार याबाबतही कोणतेही ठोस निर्णय झाले नाहीत. याशिवाय अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे मधूनच निघून जाणे आणि त्यांनी सुरू केलेले टेरीफ युद्धा चाही प्रभाव 'जी ७' वर पडल्याचे जाणवत होते. त्यामुळे कॅनडात झालेल्या जी सेवन राष्ट्राच्या परिषदेला मर्यादित यश मिळाले असे म्हणावे लागेल.

'जी ७' या परिषदे च्या यशस्वीते बाबत मत भिन्नता असली तरी भारताच्या दृष्टीने भारत व कॅनडाशी बिघडलेले संबंध सुरळीत होण्याच्या दृष्टीने बोलणी झाली आहे ही भारतासाठी एक उपलब्धी म्हणावी लागेल.

**भालचंद्र ठोंबरे**
मो.९८३४३५०८९५

**नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ची अंमलबजावणी करताना महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी अनिवार्य करण्याचा निर्णय तूर्त तरी मागे घेण्यात आला आहे. आता भारतातील सर्व भाषा जोपासल्या, जोडल्या जातील, असे भाषा धोरण आखून ते महाराष्ट्रात अंमलात आणले पाहिजे आणि महाराष्ट्राच्या सुनियोजित भागांमध्ये मराठी-इंग्रजीच्या पाठोपाठ तिसरी भाषा म्हणून कन्नड, तेलगू, उडिया यासारखे विविध पर्याय उपलब्ध करून दिले पाहिजेत. त्यातून संपूर्ण देशाला एकात्म करण्याचे काम तर महाराष्ट्र पुढे नेईलच; शिवाय इतर राज्यांसमोरसुद्धा एका आदर्श धोरणाचा धडा ठेवेल.**

# हिंदी भाषेचे आक्रमण?

**नॅ**शनल एज्युकेशन पॉलिसी (एनईपी २०२०) म्हणजेच नवीन शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीची चर्चा, कार्यवाही सबंध देशभराबरोबर महाराष्ट्रातही चालू आहे. त्यात भाषा धोरणाच्या संदर्भातही महाराष्ट्र-तामिळनाडूसह देशभर चर्चा चालू आहे. 'डीएमके'च्या पद्धतशीरपणे जोपासण्याच्या अलगाववादी धोरणाला अनुसरून, तामिळनाडूमध्ये 'डीएमके'नं भाषा धोरणाला विरोध दर्शवत, हिंदी भाषेच्या तथाकथित शक्तीला विरोध केला आहे.

खरं म्हणजे 'एनईपी'मधील भाषा धोरण पाहिलं तर हिंदी भाषेची कुठंही सक्ती नाही. त्रिभाषा सूत्रानुसार - इंग्रजी, आपापल्या प्रदेशाची भाषा (मी त्यांना 'प्रादेशिक' भाषा म्हणत नाही; कारण हिंदीइतक्याच त्या अखिल भारतीय भाषा आहेत) आणि तिसरी भाषा निवडण्याचं स्वातंत्र्य आहे; पण तामिळनाडूनं 'डीएमके'च्या सूत्रानुसार कांगावा सुरू केला आहे की, त्यांच्यावर हिंदी लादली जात आहे.

असं होत असताना काही काळापूर्वी महाराष्ट्रात अचानक एक निर्णय जाहीर झाला. पहिलीपासून हिंदीची सक्ती. अर्थातच, त्या निर्णयाला विरोध झाला, तो योग्यच होता. काही दिवसांनी मुख्यमंत्र्यांनी आपली नाराजी व्यक्त करत खुलासा केला की, पहिलीपासून हिंदी अनिवार्य करण्याचा निर्णय त्यांना न विचारता घेतला गेला होता. त्यावर संबंधित मंत्री महोदयांनी नोकरशाही शैलीत सांगितलं की, हा निर्णय पूर्वीच्या सरकारचा आहे, त्याचं नोटिफिकेशन आता निघालं. महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी अनिवार्य करण्याचा निर्णय तूर्त तरी मागं घेण्यात आला आहे. यानिमित्तानं भाषा धोरणासंदर्भात काही मुद्दे मांडणे आवश्यक आहे.

पहिलं सूत्र, इयत्ता पहिलीपासून मराठी तर अनिवार्य असलीच पाहिजे. कारण, ज्ञानभाषा होण्याची मराठीची अंगभूत शक्ती आहे. इयत्ता पहिलीपासून मराठी अनिवार्य असण्याच्या सूत्रापासून ते सर्व ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञान, व्यापार, दळणवळण, अभियांत्रिकी, आयुर्विज्ञान हे सर्व विषय उत्तम मराठीतून मांडता येण्याची तयारी व्हायला पाहिजेच. दुसरी भाषा- इंग्रजी. कारण, अजून तरी क्षितिजावर दिसणाऱ्या भविष्यकाळानुसार इंग्रजी जगाची संपर्क-दळणवळणाची भाषा आहे. आजच्या तारखेला इंग्रजी ही ज्ञान-विज्ञानाची भाषा आहे, व्यापारउदिमाची भाषा आहे. मराठी युवकांनाही उज्ज्वल भवितव्यासाठी इंग्रजी उत्तम आलंच पाहिजे.

आता मुद्दा तिसऱ्या भाषेचा. महाराष्ट्राचं कामच संपूर्ण देशाला जोडण्याचं आहे. माझी ही श्रद्धा आणि आकलन आहे की, महाराष्ट्राचं महाराष्ट्रपणच मुळी वैश्विक आणि अखिल भारतीय विचार करण्याचं आहे. मी या सूत्राला माझ्या आकलनानुसार दिलेली संज्ञा आहे की, 'अवघे विश्वची माझे घर' ही संतांची शिकवण, त्या पायावर छत्रपती शिवाजी महाराजांनी उभं केलेलं राज्य, यामधून महाराष्ट्राचा जेनेटिक कोड घडवणारा 'डबल हेलिक्स' तयार होतो. आता हे सूत्र भाषा धोरणाला लावलं, तर समोर चित्र काय येतं?

प्रथम सोप्या शब्दात सांगायचं, तर महाराष्ट्रानं भारतातील सर्व भाषा जोपासल्या, जोडल्या जातील, असं भाषा धोरण आखून ते महाराष्ट्रात अंमलात आणलं पाहिजे. उदाहरणार्थ, महाराष्ट्राचा जो भाग कर्नाटकच्या जवळचा आहे, त्या भागात कन्नड भाषेला तिसरी भाषा म्हणून मान्यता आणि चालना द्यावी. महाराष्ट्राचा असा मराठवाड्यातला जो भाग तेलंगणा किंवा आंध्र प्रदेशशी जोडलेला आहे, त्या भागात तेलगू भाषेला मान्यता आणि चालना द्यावी. मराठी, तेलगू आणि कन्नड या भाषाशास्त्राच्या दृष्टीनं भाषा भगिनी आहेत, हे महान विदुषी दुर्गा भागवत यांनी पूर्वीच सिद्ध करून दाखवलं आहे. त्याचप्रमाणे विश्वनाथ खैरे या ज्येष्ठ भाषातज्ज्ञानं 'संमत' असा आपला भाषाविषयक सिद्धांत मांडून, संस्कृत, मराठी आणि तमिळ या तीन भाषा कशा एकमेकांशी जोडलेल्या आहेत, हे मांडलं आहे. काही भाषातज्ज्ञांनी अर्थातच या 'संमत' सिद्धांतावर आपले काही आक्षेप नोंदवलेले आहेत; पण बौद्धिक चर्चा याच पद्धतीनं




चालते. मला इथं मुद्दा मांडायचा आहे की, त्या 'संमत सिद्धांता'नुसार संस्कृत, मराठी, तमिळसुद्धा जोडलेल्या भाषा आहेत. महाराष्ट्राचा देदीप्यमान अखिल भारतीय इतिहास पाहिला, तर तंजावरकर भोसल्यांनी आपली मराठी न विसरता, तंजावरमध्ये संस्कृत आणि तमिळला चालना दिली होती. इतिहासातून तेच सूत्र पकडून, आताच्या महाराष्ट्रानंसुद्धा एकाच वेळी संस्कृत आणि तमिळच्या अभ्यासाला चालना दिली पाहिजे. नीट धोरण आखता येईल की, महाराष्ट्राचा काही प्रदेश किंवा काही शाळांमध्ये पहिलीपासून तमिळचाही पर्याय दिला जावा. तसाच विचार करून त्यामुळं ज्या तमिळचं मल्याळमशी घनिष्ठ नातं आहे, अशी मल्याळमसुद्धा महाराष्ट्रात पहिलीपासून काही निवडक प्रदेश किंवा शाळांमध्ये शिकण्याची व्यवस्था उपलब्ध करून देणं. शिवाय, संस्कृत तर जगातल्या भाषाशास्त्रज्ञांच्या मतानुसार एक भाषा म्हणून अत्यंत समृद्ध आणि श्रेष्ठ आहे. संस्कृत आणि मराठीचं नातं माय-लेकराचं नातं आहे. उत्तर भारतातल्या हिंदीसह गुजराती, पंजाबी, बंगाली, उडिया या संस्कृतशी याच प्रकारे माय-लेकराचं घनिष्ठ नातं सांगणाऱ्या भाषा आहेत. हिंदीविषयीसुद्धा महाराष्ट्रात असा काही मूलभूत विरोध नाही.

उलट अलीकडच्या संशोधनात दिसून आलं आहे की, त्रिभाषा सूत्रामध्ये हिंदीचा स्वीकार करण्यात महाराष्ट्र देशात क्रमांक एकवर आहे. तिकडं मराठ्यांच्या इतिहासातील नागपूरकर भोसल्यांनी ओडिशा आणि बंगालमधल्या मुघल सत्तेसमोर आव्हान उभं करून वचक निर्माण केला होता. तो वारसा पुन्हा आधुनिक काळातल्या धोरणांत आणायचा तर पूर्व विदर्भाच्या भागांमध्ये उडिया आणि बंगाली भाषेला पहिलीपासून स्वीकारता येईल.

महाराष्ट्रानं जर या प्रकारे भारतातील सर्व भाषांचा स्वीकार करून शैक्षणिक धोरण आखलं आणि महाराष्ट्राच्या सुनियोजित भागांमध्ये मराठी-इंग्रजीच्या पाठोपाठ तिसरी भाषा म्हणून असे विविध पर्याय उपलब्ध करून दिले, तर संपूर्ण देशाला एकात्म करण्याचं काम तर महाराष्ट्र पुढं नेईलच; शिवाय इतर राज्यांसमोरसुद्धा एका आदर्श धोरणाचा धडा ठेवेल. नाशिककडून पुढं जो गुजरातशी जोडलेला भाग आहे तिथं गुजराती भाषेला चालना देता येईल. मराठी कायम ठेवून गुजराती भाषेला आपली म्हणून स्वीकार करण्याचाही आदर्श बडोद्याच्या गायकवाड घराण्यानं दाखवून दिला आहेच.

मला सानेगुरुजींची आंतरभारती ही संकल्पनासुद्धा लक्षात आहे. सानेगुरुजींच्या त्या संकल्पनेत सर्व भारतीय भाषांच्या अभ्यासाला चालना देत, सर्व भारतीय भाषांमधील उत्तमातलं उत्तम साहित्य अन्य भारतीय भाषांमध्ये भाषांतरित होऊन, भारताची भाषिक विविधता आणि एकता जोडली जावी, हे ते सूत्र होतं. काही प्रमाणात हे काम नॅशनल बुक ट्रस्ट (एनबीटी) सहित केंद्रातल्या काही संस्था करताहेत. महाराष्ट्रसुद्धा हे काम करू शकेल.

**अविनाश धर्माधिकारी**

# अकोट शहरात साडेपाच क्विंटल गोवंशाचे मांस जप्त ; तीन आरोपी ताब्यात

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट शहरातील कुरेशीपुरा भागात पोलीस प्रशासनाने मोठी कारवाई करत साडेपाच क्विंटल गोवंशाचे मांस जप्त केले. ऑपरेशन प्रहार मोहिमेअंतर्गत झालेल्या या कारवाईत तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई २२ जून रोजी आठवडी बाजाराच्या दिवशी करण्यात आली. जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या 'ऑपरेशन प्रहार' मोहिमेअंतर्गत पोलीस उपनिरीक्षक वैभव तायडे, अविनाश मोहिते आणि डीबी पथकाने संयुक्तरित्या ही धाड घातली.

शहरातील कुरेशीपुरा परिसरात जुनेद अहमद जहूर अहमद याच्या घरी पाहणी करताना गोवंश जनावरांची कत्तल होत असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी पंचासमक्ष धाड टाकत ५ क्विंटल ५९० किलो गोमांस, लोखंडी सुरा, कु-हाड यांसह अंदाजे १ लाख १० हजार रुपयांचे साहित्य जप्त केले.



या कारवाईत अब्दुल नहीम अब्दुल रहीम (रा. कसाबपुरा), जुनेद अहमद जहूर अहमद (रा. शौकतअली चौक), आणि शेख असलम शेख महबुब (रा. शौकतअली चौक) या तिघांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याविरुद्ध अकोट शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी अनमोल मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि अमोल माळवे यांच्या नेतृत्वात पार पडली. या कारवाईत डीबी स्कॉडमधील पोउपनि वैभव तायडे, पोउपनि अविनाश मोहिते, पोहेकॉ गणेश सोळंके, बजरंग इंगळे, नरेंद्र जाधव, गजानन राठोड, विपुल सोळंके, अश्विन चव्हाण, नितेश सोळंके, शिवशंकर गावंडे, अपेक्षा खारोडे आणि पद्मिनी येरनाळे यांनी सहभाग घेतला.

### गोवंश कत्तलीचे 'हब' बनले अकोट?

अकोट शहरात गोवंश कत्तलीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. पोलिसांच्या वारंवार कारवायांनंतरही या अवैध धंद्यांना आळा बसत नाही. पोलिसांकडून आरोपींना तात्पुरते अटक करण्यात येते; मात्र ते जामीनावर सुटताच पुन्हा याच अवैध धंद्यात सक्रिय होतात. त्यामुळे या गुन्ह्यामागील मुख्य सूत्रधारांना शोधून त्यांच्यावर मोक्का आणि कठोर कायद्यांतर्गत कारवाई करणे आवश्यक असल्याचे जनतेतून मागणी होत आहे.



# रस्त्याची डागडुजी थातुरमातुर: अभियंता फिरकेना!


### खेट्री-चतारी डांबरीकरण रस्त्यावरील प्रताप पुन्हा एकदा उघड

■ प्रतिनिधी | पातूर ■

प्रधानमंत्री ग्रामीण रस्ता योजनेअंतर्गत पातूर तालुक्यातील सुकळी ते चतारी - खेट्री - चांगेफळ - पिंपळखुटा या रस्त्याचे दोन वर्षांपूर्वी डांबरीकरण करण्यात आले होते. मात्र, डांबरीकरणाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्यामुळे अवघ्या दोन वर्षांतच रस्ता खड्यांनी भरून 'चाळणी'सारखा झाला आहे.

नुकतेच या रस्त्याची थातुरमातुर डागडुजी करण्यात आली असून, त्यामुळे पुन्हा एकदा देयक हडपण्याचा प्रकार समोर येत आहे. रस्त्याच्या डांबरीकरणाच्या वेळेसच कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांनी मुरुमाऐवजी पिवळ्या मातीचा वापर केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला होता. या प्रकारामुळे संतप्त ग्रामस्थांनी अनेक वेळा काम बंद पाडले होते, परिणामी रस्त्याचे काम तब्बल दोन वर्षे रखडले होते. नंतर काम पूर्ण करण्यात आले, पण दर्जा टिकवला गेला नाही. आता पुन्हा डागडुजीची वेळ आली असून, तीही उथळ आणि थातुरमातुर करण्यात येत आहे. यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

रस्त्याची डागडुजी योग्य पद्धतीने व दर्जेदार होण्याची ग्रामस्थांची मागणी असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची तात्काळ दखल घ्यावी अशी मागणी करण्यात येत आहे.



### शासनाच्या लाखो रुपयांची उधळपट्टी!

शासनाने या रस्त्याच्या कामासाठी तब्बल ६ कोटी २४ लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता. मात्र त्या निधीचा उपयोग निकृष्ट दर्जाच्या कामासाठी केल्यामुळे सरकारी पैशांची उधळपट्टी झाल्याचे चित्र समोर येत आहे.

### अधिकारी व लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

पातूर तालुक्याच्या सीमावर्ती सुकळी ते पिंपळखुटा परिसरातील या रस्त्याकडे ना अधिकारी फिरकतात ना लोकप्रतिनिधी. त्यामुळे कामाच्या दर्जावर कोणीही लक्ष ठेवत नाही. या संधीचा गैरफायदा घेत कंत्राटदार व अभियंत्यांची मिलीभगत असल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे.

जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९१३/२०२५ — प्रोसेस नं.८६१५/२०२५
चौ.ता. ०५/०७/२०२५ — दिनांक : ०९/०६/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती शांताबाई पुंडलिकराव चक्रनारायण. रा. रविंद्र अंबादास डोंगरे सीबीआय च्या मागे, कोकणवाडी, हातगांव, ता. जि. अकोला. २. शास्त्री पुंडलिक चक्रनारायण रा. बोरकर फर्निचर जवळ, संत नगर, महसुल कॉलनी जवळ, अकोला. ता. जि. अकोला. ३. सुरेश पुंडलिक चक्रनारायण. ४. छत्रपती पुंडलिकराव चक्रनारायण अर्जदार क. ३ व ४ रा. दाळंबी. पो. कळंबी, ता. जि. अकोला. ५. प्रतिभा रविंद्र डोंगरे . रा. टिपटाळा, ता. जि. अकोला. ६. पुष्पाबाई संजय इंगळे. रा. खरब ढोणे, पो. सोनेरी ता. मुर्तिजापूर, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : पुंडलिक गरिबा चक्रनारायण.
**पत्ता :-** रा. दाळंबी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लक्ष्मणराव भिकाजी दोड यांचे दि. ०३/०२/२००४ रोजी रा. दाळंबी. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला भार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९१६/२०२५ — प्रोसेस नं.८६११/२०२५
चौ.ता. ०५/०७/२०२५ — दिनांक : ०९/०६/२०२५

**अर्जदार :** १. लक्ष्मीकांत महादेव वाघमारे. रा. कुरणखेड, ता. जि. अकोला. २. सौ. अस्मिता गजानन नेमोडे. रा. चिंचोली. बु. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती. ३. सौ. सुचिता ओमनाथ नेमाडे. रा. भूलोडा, पो. भामदेवी, ता. कारंजा लाड, जि. वाशिम. ४. सौ. योगिता अवधूत नेमाडे. रा. सातपूते कॉलनी, ता. कारंजा लाड, जि. वाशिम. ५. सौ. सरिता बाळू श्रीनाथ. ६. महादेव तुकाराम वाघमारे. दोघेही रा. कुरणखेड, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुभद्रा महादेव वाघमारे.
**पत्ता :-** रा. कुरणखेड, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुभद्रा महादेव वाघमारे यांचे दि. ११ / १० / २०२४ रोजी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९४३/२०२५ — प्रोसेस नं.८६३८/२०२५
चौ.ता. १०/०७/२०२५ — दिनांक : १०/०६/२०२५

**अर्जदार :** १. शिला पुरूषोत्तम कोकाटे. २. अनुप पुरूषोत्तम कोकाटे. दोघेही रा. नायगाव पो. अराळा, ता. दर्यापूर, जि. अमरावती. सध्याचा पत्ता -भुईभार लेआउट, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. मोहिनी अमोल रोडे रा. बेंबाळा खुर्द, ता. जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : पुरूषोत्तम जानराव कोकाटे.
**पत्ता :-** रा. भुईभार लेआउट, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की. मयत पुरूषोत्तम जानराव कोकाटे यांचे दि.१६/०६/२०२४ रोजी भुईभार लेआउट, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावा. आज दिनांक १०/०६/ २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# फुलांनी साजरा झाला एमजेपी स्कूल ऑफ स्कॉलर्स, पारसचा शैक्षणिक वर्षाचा पहिला दिवस




■ प्रतिनिधी | पारस ■

एमजेपी स्कूल ऑफ स्कॉलर्स, पारस येथे नवीन शैक्षणिक सत्राची सुरुवात अत्यंत उत्साहात आणि अनोख्या पद्धतीने झाली. विद्यार्थ्यांचे स्वागत फुलांनी करण्यात आले, त्यामुळे पहिल्याच दिवशी शाळेचे वातावरण आनंददायी आणि प्रेरणादायी ठरले.

शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारावर प्रत्येक विद्यार्थ्याला एक सुंदर गुलाबाचे फूल देण्यात आले. या सृजनशील स्वागतामुळे विद्यार्थ्यांचे चेहरे फुलासारखे उजळून निघाले. त्यानंतर, मुख्य दरवाजापासून वर्गांपर्यंत फुलांची आकर्षक रांगोळी आणि फुलांचा गालिचा सजवण्यात आला होता. या रंगीबेरंगी मार्गावरून चालत विद्यार्थ्यांनी नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात केली.

या उपक्रमामागील उद्देश विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दलची उत्सुकता वाढवणे आणि शाळेविषयी आत्मीयता निर्माण करणे असा होता. पालकांनी शाळेच्या या अभिनव कल्पनेचे विशेष कौतुक केले. या वेळी शाळेच्या प्राचार्यांनी सांगितले, 'विद्यार्थ्यांचे असे स्वागत केल्याने त्यांना शाळा ही केवळ शिकवणारी जागा नसून आपुलकीची जागा वाटते. त्यांना शिकण्यात अधिक आनंद वाटतो आणि आत्मविश्वासही वाढतो.' एकूणच, स्कूल ऑफ स्कॉलर्सच्या या उपक्रमाने पहिला दिवस अविस्मरणीय ठरला आणि नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली.

# आदिवासी मुला मुलींच्या वसतीगृहांमध्ये प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू

**अकोला :** आदिवासी विकास विभागाच्या आदिवासी मुला-मुलींच्या शासकीय वसतीगृह क्रमांक १ व २ मध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी इयत्ता ११वी, डिप्लोमा, पदवी, व्यावसायिक अभ्यासक्रम व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी गुणवत्तेनुसार रिक्त जागांवर प्रवेश दिला जाणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी swayam. mahaonline. gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरून त्याची प्रिंट, तसेच आवश्यक कागदपत्रांसह संबंधित वसतीगृहात कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावा, असे आवाहन वसतीगृहाचे गृहपाल यांनी केले आहे. अर्जासोबत महाविद्यालयाचा बोनाफाईड, गुणपत्रिका, जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, वैद्यकीय प्रमाणपत्र, आधार व बँक तपशील आदी कागदपत्रे आवश्यक आहेत. अर्जात कुटुंबातील मोबाईल क्रमांक अनिवार्य आहे.

# सी.बी.एस.सी. पॅटर्नमुळे ग्रामीण भागातील गुणवत्तेत होईल वाढ – आ.अमोल मिटकरी

### कुटासा जिल्हा परिषद शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत, शैक्षणिक साहित्याचे वाटप

■ प्रतिनिधी | अकोट ■

राज्य शासनाच्या निर्देशानुसार विदर्भातील शाळांचा नवा शैक्षणिक सत्राचा प्रारंभ सोमवारी, २३ जून रोजी झाला. यानिमित्त अकोट तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कुटासा येथे भव्य शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार अमोल मिटकरी होते. या वेळी विद्यार्थ्यांचे जलपान बाटली, चॉकलेट व पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमास गटशिक्षणाधिकारी मधुकर सूर्यवंशी, गट समन्वयक निशिकांत भुरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रामदुलारी केवट, उपाध्यक्ष शीतल बायस्कर, पोलीस पाटील गजानन उगले, राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष अमोल काळणे, ईश्वरदास झास्कर,



राजू भोरे, श्रीकृष्ण अतकरे, हरिश्चंद्र गायकवाड, सीमा अतकरे व इतर मान्यवर उपस्थित होते.

प्रवेशोत्सवात 'पहिले पाऊल' या उपक्रमांतर्गत इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे पायाचे ठसे घेण्यात आले. यानंतर मोफत पाठ्यपुस्तक, गणवेश, बूट-सॉक्स व शालेय साहित्याचे वाटप आमदार मिटकरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार मिटकरी यांनी शाळेच्या परिसराची पाहणी करत चालू सांस्कृतिक भवनाच्या कामाचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी स्थानिक आमदार निधीतून उर्दू शाळेसमोर २० लाख रुपयांच्या अभ्यासिका इमारतीच्या बांधकामासाठी भूमिपूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षकांनी आठ दिवसांपासून तयारी केली होती. त्यांच्या नियोजनाचे मान्यवरांनी भरभरून कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक मधुकर बल्ले यांनी, संचालन अमर भागवत यांनी तर आभार प्रदर्शन अनिल फलके यांनी केले.

# उद्योजकांनी नव्या उत्पादनाची कास धरावी -अशोक जैन



■ प्रतिनिधी | अकोला ■

मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांशी स्पर्धेच्या माध्यमातून बघत असताना लघु, मध्यम व मोठ्या उद्योजक व व्यापाऱ्यांनी नवनव्या उत्पादन निर्मितीची कास धरावी. येणारा काळ हा आर्टिफिशियल इंटेलिजनचा असून या तांत्रिक प्रगतीचा उपयोग आपल्या उद्योगात करून आपले पारंपारिक व्यापार व उद्योग विकसित व सुसंस्कृत करण्याचे आवाहन जैन इरिगेशन सिस्टीम लिमिटेड चे अध्यक्ष अशोक जैन यांनी केले. शतकोत्तर वर्षाकडे वाटचाल करणाऱ्या विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीची ९१ वी वार्षिक आमसभा रविवारी खंडेलवाल भवन येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी अशोक जैन मार्गदर्शन करीत होते. चेंबरचे अध्यक्ष निकेश गुप्ता यांच्या अध्यक्षतेत संपन्न या वार्षिक आमसभेत प्रमुख पाहुणे म्हणून भाजप व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष वीरेंद्र कुकरेजा, खा अनुप संजय धोत्रे उपस्थित होते. तर मंचावर चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष सिद्धार्थ रुहाटीया, कनिष्ठ उपाध्यक्ष निखिल अग्रवाल, मानद सचिव निरव वोरा, कोषाध्यक्ष किशोर बाछुका, सहसचिव किरीट मंत्री, चेंबरचे माजी अध्यक्ष नितीन खंडेलवाल आदी मान्यवर उपस्थित होते. विदर्भ केसरी स्व ब्रजलाल बियाणी यांच्या प्रतिमा पूजनाने या सोहळ्याचा प्रारंभ झाला. या वार्षिक आमसभेत सकाळी बिजनेस सत्र संपन्न झाले. यात गतवर्षीचा लेखाजोखा व अंदाजपत्रक मंजूर करण्यात येऊन सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येऊन सन २०२५-२६ साठी अंकेक्षक सीए प्रशांत लोहिया यांची नियुक्ती करण्यात आली. या नंतर द्वितीय सत्रास प्रारंभ झाला.

### विदर्भ चेंबरची वार्षिक आमसभा उत्साहात संपन्न

**WANTED**

Run By. Hanuman Gramvikas Pratishthan Hingana Kumbhari Dist Akola

**Bhausaheb Bidkar Adhyapak Vidyalaya, Shivani Tq.Dist Akola**

NCTE CODE: 122120

Attend an interview for below posts on date. 28.06.2025 at 11.30 a.m at Bhausaheb Bidkar Adhyapak Vidyalaya Shivani Tq.Dist Akola with original Document. For more information contact to.

**9766584636, 9421893616**

| Sr. No | Post | No.of Post | Qualification | Subject |
|---|---|---|---|---|
| 1 | Principal | 1 | B.Ed. M.Ed 50% M.A/M.Sc 55% | Science/ Social Science/ Arts/ Humanities |
| 2 | Foundation Of Education | 1 | B.Ed.M.Ed 50% M.A/M.Sc 55% | Science/Social Science/ Arts/Humanities /Math's/Language |
| 3 | Science | 1 | B.Ed.M.Ed 50% M.Sc 55% | Botany Zoology chem., Other |
| 4 | Humanities & Social science | 1 | B.Ed.M.Ed 50% M.A55% | History/Social Science/ Economics/ Political Science |
| 5 | Mathematics | 1 | B.Ed .M.Ed 50% M.Sc.55% | Mathematics |
| 6 | Language | 1 | B.Ed .M.Ed 50% M.A.55% | English/Marathi |
| 7 | Fine Arts/Performing Arts | 1 | M.A 50% Marks | Arts/Music/Dance/Theatre |
| 8 | Health & Physical Education | 1 | Master Degree in Phy.Education (M.P.Ed) with 50% | Physical Education |
| | | Non Teaching | | |
| 1 | UDC/Office Superintendent | 1 | Any Graduation | B.A/B.Com/B.Sc |
| 2 | Computer Oprator-cum Store Keeper | 1 | Any Graduation | I.T/Computer Science /Typing Marathi 30 English 40 |
| 3 | Computer Lab Assistant | 1 | BCA/B.Tech | With Computer Science |
| 4 | Librarian | 1 | B. Lib | |

Preference given to those candidates having pay Scale, Service condition, Medium, Reasons of vacancy, Work Load & etc. for the above post are as per the norms defined in the NCTE Regulation 2014.

Date:

**President**
Hanuman Gramvikas Pratishthan
Hingana Kumbhari Dist Akola

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २०९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# इस्त्रायल आणि इराणच्या युध्दाचा परिणाम ; महागाईचा उडणार भडका !

**वर्धा / जनमाध्यम**

इस्त्रायल आणि इराणच्या युध्दात अमेरिकेने उडी घेतल्याने हे युद्ध आता अधिक गंभीर वळणावर पोहोचले आहे. याचा परिणाम या दोन देशांवर जसा होणार आहे, तसाच तो जगभरातील अर्थव्यवस्थेवरही होणार आहे. क्रूड ऑईलचे उत्पादन करणारा इराण हा सर्वात मोठा देश असल्याने येत्या काही दिवसात ऑईलच्या किमती गगनाला भिडतील, अशी भीती व्यक्त होताना दिसत आहे. पेट्रोल, डिझेल, विमानासाठीचे इंधन याच्या किमती या फुड ऑईलवरच अवलंबून असतात. ऑईल वाढले की दळणवळणाच्या किमती वाढतील आणि याचा परिणाम महागाईचा मोठा भडका उडण्यावर होणार आहे. हे युध्द दोन देशात असले आणि अमेरिकेने त्यात उडी घेतली असली तरी याचा फटका मात्र संपूर्ण जगाला बसणार आहे. भारताचे या दोन्ही देशांशी व्यापारी संबंध आहेत. त्यामुळे त्यांच्यातील संघर्षाचा परिणाम भारतावरही थेट होणार आहे. जगभरातील तेलाच्या किंमती वाढण्याची शक्यता आहे. ऊर्जा क्षेत्राशी संबंधित बाजार उघडतील तेव्हा आशियातील तेलाच्या किमती वाढण्याचा अंदाज वर्तवला आहे. काही तज्ज्ञांच्या मते, अमेरिकेच्या हल्लूयामुळे हा संघर्ष एका मोठ्या पातळीवर पोहोचला आहे, अनेकांना असं वाटतंय की या हल्ल्यामुळे परिस्थिती आणखीन वाईट होऊ शकते.



या हल्ल्यामुळे तयार झालेली भीती तेलाच्या किमती वाढण्यास कारणीभूत ठरेल. आता नेमकी किती भाववाढ होईल हे सांगता येणार नसलं तरी ही भीती जेवढी जास्त असेल तेवढीच तेलाची किंमत देखील वाढले क्रूड ऑईलच्या किमतीमध्ये मागच्या महिन्यात २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. शुक्रवारी कच्याया तेलाच्या एका बॅरलची किंमत ७७.०१ डॉलर एवढी होती. केवळ क्रुड ऑईलचे उत्पादन करणारा देश म्हणूनच इराणचा उल्लेख केला जात नाही तर इतर देशांनी उत्पादित केलेल्या तेलाचे बहुतांशी दळणवळण इराणचा ताबा असलेल्या समुद्र मार्गावरूनच होते. हा मार्ग बंद करण्याची धमकीही इराणने दिली आहे. असे झाले तर इतर देशांमधून जगभरात पाठविण्यात येड्या तेलाचे दळणवळणही बंद होईल. परिणामी सगळीकडेच ऑईलचा तुटवडा होताना दिसेल आणि याचा थेट परिणाम किमतीमध्ये भरमसाठ वाढ होण्यावर होईल.

सौदी अरेबीया, इराक, संयुक्त अरबी अमिराती, कुवेत, इराक, ओमान, कतार, हे सगळे देश तेल उत्पादनावर अवलंबून आहेत. इराणने दळणवळणाचा मार्गच बंद केला तर त्याचा मोठा फटका या देशांना आणि त्यांचे ग्राहक असलेल्या देशांनाही बसणार आहे.

कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या की महागाईचे एक चक्र सुरू होते. कुंड ऑईल महागले की पेट्रोल आणि डिझेल महाग होते. दळणवळण महाग झाल की भाजीपाला, अन्नधान्य याच्या किमती वाढतात, ऑईल आणि गॅसवरती अवलंबून असलेल्या उत्पादनाच्या किमती वाढतात. यामध्ये प्लॅस्टीक, खतं, केमिकल्स यांचा प्रामुख्याने सामावेश असतो. ही सगळी भाववाढ कंपन्या ग्राहकांवर लादतात, तेलाची किंमत जेव्हा बॅरलमागे दहा टक्के वाढते तेव्हा महागाई ही साधारणपणे अर्धा टक्के वाढते, असा आजवरचा अनुभव आहे. बॅरलच्या किमती १०० डॉलरपेक्षाही पुढे जाण्याची शक्यता सध्याच्या परिस्थितीत आहे.

# आता पॅनकार्डसाठी आधारकार्ड अनिवार्य

**वर्धा/ जनमाध्यम**

करदात्यांशी संबंधित नियमावलीत बदल करण्यात येत असून, आता १ जुलैपासून नवीन नियम लागू होणार आहे. आता पॅन कार्डसाठी अर्ज करण्यासाठी आधार कार्ड अनिवार्य असेल. कर प्रणाली अधिक मजबूत करण्यासाठी आणि फसवणूक रोखण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलले असून या नवीन नियमानुसार तुमच्याकडे आधार कार्ड नसेल तर तुम्ही पॅन कार्डसाठी अर्ज करू शकणार नाही. त्यामुळे ज्यांच्याकडे आधारकार्ड नाही, त्यांना तातडीने आधारकार्ड काढावे लागणार आहे. करदात्याच्या दृष्टीने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून, यामुळे करचोरी रोखली जाईल आणि करदात्यांची ओळख अधिक अचूक होईल, असे सरकारचे म्हणणे आहे. म्हणून जर तुम्ही पॅन कार्डसाठी अर्ज करण्याचा विचार करत असाल तर आधी तुमचे आधार कार्ड बनवून घ्या, असे सांगण्यात आले.

१ जुलैपासून हा नियम लागू होणार असल्याने आता ज्यांच्याकडे आधारकार्ड नाही, त्यांना आता आधारकार्ड काढून घ्यावे लागणार आहे. सध्याच्या नियमानुसार, पॅन क्रमांकासाठी अर्ज करताना अर्जदाराला त्याचे नाव आणि जन्म दिनांकाचा पुरावा जोडून किंवा पर्यायी ओळख कागदपत्रे जोडून अर्ज करता येत होता. मात्र, एक जुलैपासून तसे करता येणार नाही. डिजिटलायझेशनची प्रक्रिया सध्या सुरू असल्यामुळे पॅनसाठी आधारवर आधारित पडताळणर्णी प्रणाली राचवण्यात येत असल्याचे संबंधित अधिका-याने सांगितले, एकाच व्यक्तीकडे अनेक पॅनकार्ड असण्याची प्रकरणे उघडकीस

# गांधी विद्यालयात प्रवेशोत्सव; विद्यार्थी आणि पालकांचे गुलाब पाकळ्या उधळून केले स्वागत

**आर्वी/ जनमाध्यम**

स्थानिक नगर परिषद गांधी विद्यालय विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव अतिशय सुंदर रित्या साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व नवीन विद्यार्थी आणि पालकांना प्रवेशद्वारापासून बँड पथकाच्या तालावर तसेच गुलाब



पुष्पांच्या पाकळ्या उधळून त्यांचं हॉलपर्यंत स्वागत करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी दोन्हीबाजूंनी उभे राहून रंगीबेरंगी फुगे हातात घेऊन त्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष ज्योत्स्ना तिवस्कर या होत्या. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून माजी मुख्याध्यापक देविदास कडवे होते तसेच प्राचार्य विश्वेश्वर पायले पर्यवेक्षिका ज्योती अजमिरे, प्राध्यापक नितीन बोडखे तसेच पालक प्रतिनिधींमधून प्रीती अधव आणि अनिल मोहोड उपस्थित होते. सर्व नवीन विद्यार्थ्यांना देविदास कडवे यांच्याकडून प्रत्येक वर्षी सहा नोटबुक असलेला संच वर्ग पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येतो कारण त्यांचा मुलगा अमित कडवे हा शाळेचा माजी विद्यार्थी होता आणि त्याचा हा उपक्रम निरंतर सुरू आहे. या सोबतच १२५ विद्यार्थ्यांना शाळेच्या नवीन बॅग सुद्धा अमित कडवे यांच्यातर्फे देण्यात येतात. याबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला तसेच शासनाच्या वतीने मिळालेले सर्व पुस्तके ,शूज सॉक्स हे सुद्धा विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. तसेच शाळेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना कंपास बॉक्स आणि खाऊ देण्यात आला.

## जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेशोत्सव

**देवळी/ जनमाध्यम**

स्थानिक जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे शाळा सुरु झाली आणि सर्व विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. या प्रसंगी अध्यक्ष स्थानी सेवानिवृत्त शिक्षक भैय्यासाहेब बोडखे तर प्रमुख पाहुणे पालक शिक्षक सभेचे अध्यक्ष गणेश शेंडे, किशोर सुरकार, सचिन वैद्य, प्राचार्य धर्मेश झाडे



उपमुख्याध्यापक उमाटे, पर्यवेक्षक भाऊराव जाधव, उपस्थित होते.

सर्वप्रथम विद्यार्थ्यांचे प्रवेशोत्सव वेळी फटाके फोडून, बँड पथकामध्ये, शिक्षकांनी पुष्प वर्षाव करून सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यानंतर परिपाठ, राष्ट्रगीत झाल्यावर पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करण्यात आले. पाहुण्यांच्या भाषणानंतर सर्व विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकं वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन मयुरी सालंकार तर आभार सचिन सावरकर यांनी मानले. याप्रसंगी सर्व शिक्षक वृंद, सर्व विद्यार्थी, पालक प्रतिनिधी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# 'पहिले पाऊल वृक्ष लावून'

## भारत विद्यालयात आई व मुलीच्या हस्ते वृक्षारोपण

**हिंगणघाट / जनमाध्यम**

शाळेच्या पहिल्या दिवशी राष्ट्रीय हरित सेनेच्या वतीने भारत विद्यालय हिंगणघाट येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून प्रारंभ झालेल्या 'एक पेड मा के नाम' या वृक्षारोपणाच्या चळवळीत भारत विद्यालय या शाळेच्या वतीने शाळेतील पहिले पाऊल वृक्षलावून हा उपक्रम राबवण्यात आला.



इयत्ता पाचवी व सहावी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते शाळेच्या पहिल्या दिवशीच वृक्षारोपण करण्यात आले. यात पालकांनी सक्रिय सहभाग नोंदविला. आज शाळेच्या परिसरात उन्नती कृष्णाजी महाजन या विद्यार्थिनीने आई भाग्यश्री कृष्णाजी महाजन, तसेच आराध्या हेमंत भोयर हिने आई मनीषा हेमंत भोयर, व पूर्वाई निलेश कामडी व आई निकिता निलेश कामडी याच्या हस्ते शालेय परिसरात वृक्षारोपण केले.इको क्लब फॉर मिशन अंतर्गत वृक्षारोपणानंतर लगेच विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मुख्याध्यापक हरीश भट्टड यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०२४- २५ या वर्षीपासून एक विद्यार्थी एक झाड हा उपक्रम सुरु केला आहे. गतवर्षीप्रमाणे याही वर्षी शाळा सुरु झालेच्या पहिल्या दिवशी निवडक विद्यार्थ्यांना देशी वृक्षाची रोप वाटप करण्यात आले व त्याचे संगोपन करण्याबाबतच्या सुचना दिल्या. प्रत्येक विद्यार्थ्याने आईसोबत आपआपल्या परिसरात एक झाड लावण्याचे तसेच विद्यार्थ्यांच्या वाढदिवसाला या झाडाचाही वाढदिवस साजरा व्हावा असे आवाहन राष्ट्रीय हरित सेनेचे दत्ता भांगे यानी केले.

यावेळी शालेय परिसरामध्ये राज्य वृक्ष जारूळ, ताम्हण वृक्षाची लागवड करण्यात आली, या प्रसंगाला शाळेचे मुख्याध्यापक हरीश भट्टड, उप मुख्याध्यापक किशोर चवरे, पर्यवेक्षिका निलाक्षी बुरीले, मनीषा कोंडावार, पालक प्रतिनिधी निलेश माथनकर , सिमा नव्हाते हरित सेनेचे दत्ता भांगे, निखारे ,योगेश तिवारी, अमित महाजन ,सचिन धारकर , विकास नागरकर ,बालाजी आसुटकर मोठ्या संख्येने शिक्षक, विद्यार्थी, पालक वर्ग प्रामुख्याने उपस्थित होते.

# क्रीडा क्षेत्रातील संधीचा लाभ घ्या-डॉ. कवडे

**वर्धा / जनमाध्यम**

क्रीडा क्षेत्राच्या माध्यमातून करिअर घडविताना देशसेवा करण्याची संधी मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील नव्या संधीचा लाभ घेऊन प्रगती करा असे आवाहन वर्धेचे अतिरिक्त पोलीस अधिक्षक डॉ सागर कवडे यांनी व्यक्त केले. २२ जुन रोजी लॉयन्स ट्रेडिशनल शुत्तोकॉन कराटे डो असोशिएशन व्दारा शहीद हुतात्मा स्मारक येथे कराटे खेळाडूंच्या गुणगौरव सोहळ्या प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लायन्स क्लब वर्धेचे अध्यक्ष सुरेन्द्र महाकाळकर, तर प्रमुख अतिथी म्हणून नॅशनल कराटे फेडरेशनचे राष्ट्रीय सल्लागार इमरान राही,आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाचे मुख्य अधिकारी संजय इंगळे तिगांवकर, निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे, तायकांडो असोशिएशनचे मार्गदर्शक प्रविण चौरे, नॅशनल फेडरेशनचे सचिव सिहान उल्हास वाघ, स्पोर्ट कराटे असोशिएशनचे सचिव मंगेश भोंगाडे, इंजी. विजय नाखले, लॉयन्स स्लबचे माजी विजय सत्यम, मोहन मोहीते, डॉ. प्रितम साळुखे (रॉय) आदी अनेक मान्यवर प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते.

इमरान राही म्हणाले की अलीकडच्या काळात लुटमारी, चोरी, छेडखानी आदी घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे प्रत्येक पालक चिंताग्रस्त झाला आहे. भयमुक्त वातावरण निर्माण करणासाठी प्रत्येक व्यक्तीने आपल्या मुलांना कराटे खेळात प्रोत्साहन दिले पाहिजे. पालकांनी आपल्या पाल्यांना विविध विषयांमध्ये आवड निर्माण करणासोबतच क्रीडा कौशल्यातही प्रोत्साहन दिले पाहिजे. वर्धा जिल्हयाचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचेल असा आशावाद संजय इंगळे तिगांवकर, यांनी व्यक्त केला. या प्रसंगी मुरलीधर बेलखोडे, सुरेन्द्र महाकाळकर, प्रविण चोरे यांनी सुध्दा मनोगत व्यक्त केले.

पाहुण्यांच्या हस्ते. नुकतीच श्रीलंका येथे संपन्न होण्याऱ्या कराटे स्पर्धासाठी निवड झालेली पुलगांव येथील मोहिनी चुटे व वर्धा येथील सेन्साई साहील उल्हास वाघ, आर्या सुनिल पाटील, आर्यन विलास वानखेडे यांचा शाल श्रीफळ पुच्छगुच्छ सत्कार करण्यात आला. तसेच उपस्थीतीच्या हस्ते विध्यार्थ्यांना बेल्ट व प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना सिहान उल्हास वाघ, संचालन अमोल भानकर, तर आभार लिला वाघ यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता विक्रात गव्हाने, पुरब शर्मा, मिहीर वाघ, प्रेम कवंर, आर्यन छापेकर, हर्षाली चौधरी, कल्याणी खडसे, क्रांती मोहीते, वैष्णवी पांडे, तनु पांडे, नितिन यादव, लिला ताई वाघ. आदीनी अथक परिश्रम घेतले.

## जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस या नोटिस व्दारे सुचित करण्यात येते कि मौजा पिपरी मेघे, मौजा नं. ८७, प. ह. नं. २१ ता. जि. वर्धा येथील ग्राम पंचायत पिपरी मेघे च्या हद्यीतिल वार्ड नं. ०२ मधिल घर/मालमत्ता कं. १११७/१ शेत सर्वे कं. ५६, २१ मधिल प्लॉट कं. १ ज्याची एकुण आराजी २८२.१५ चौ. मी. याची पूर्व पश्चिमची विभागणी करून दक्षिणेकडील भागाचा प्लॉट ज्याची आराजी १२०.८१ चौ. मी. म्हणजेच १३००.०० चौ. फूट असुन त्याची चतुःर्सिमा पुर्वेसः रोड, पश्चिमेराः प्लॉट नं. २, उत्तरेसः याच प्लॉटचा उर्वरीत भाग, दक्षिणेसः रोड.

सदरहु मालमत्ता श्री. गजानन रघुनाथजी तडस यांच्या मालकी व कब्जातील असुन सदरहु मालमत्ता ते श्रीराम फायनान्स लिमिटेड शाखा वर्धा यांच्याकडे गहाण करीत आहे.

वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**शाखा व्यवस्थापक**
श्रीराम फायनान्स लिमिटेड शाखा वर्धा
पत्ता सुभेदार कॉमप्लेक्स, केळकरवाडी,
आर्वी रोड, वर्धा
मो. नं. ९६२३५६५७६१

## हजरत अबुबकर सिद्दिक र.अ. उर्दू डी.एड.कॉलेज
**डॉ. जाकीर हुसेन कॉलनी, वर्धा**
**एन.सी.टी.ई. मान्यता क्रमांक APW03011/122467 (U)**

| अ.क्रं. | पदनाव | संख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | प्राचार्य | ०१ | एम.ए./एम.एस.सी., एम.एड. किमान ५५ गुणांसह अध्यापक विद्यालयात शिकविण्याचा ५ वर्षे अनुभव |
| २ | अध्यापकाचार्य | ०७ | ०२ पायाभूत-एम.ए./ एम.एस.सी.एम.एड. ५० टक्के<br>०३ पाठ्यचार्य-एम.ए./एम.एस.सी.एम.,एड/ एम.ए. एज्युकेशन<br>०१ आरोग्य / शारीरीक शिक्षक-एम.पी.एड. ५० टक्के<br>०१ कार्यानुभव/संगीत/चित्रकला शिक्षक फाईन आर्ट/संगीतनृत्य एम.ए.५० टक्के |
| ३ | ग्रंथपाल | ०१ | बि.लिब. ५० गुणांसह |
| ४ | वरिष्ठ लिपीक | ०१ | कोणत्याही शाखेचा पदविधर / एम.एस.सी.आय.टी. |
| ५ | संगणक ऑपरेटर तथा भांडारपाल | ०१ | बिसीए / बिटेक संगणक विज्ञानासह |

**टिपः-** इच्छुक अर्हतापात्र उमेदवारांनी प्रत्यक्ष मुलाखतीस दि. २७/०६/२०२५ रोजी सकाळी ११ ते ४ पर्यंत मुळ कागदपत्र व २ पासपोर्ट फोटोसह स्वखर्चाने मुलाखातीस हजर रहावे.

**स्थळः-**
**ह. अबुबकर सिद्दिक र.अ.उर्दु डि.एड. कॉलेज**
**डॉ. जाकीर हुसेन कॉलनी, वर्धा कार्यालय**
**०७१५२, २४१६८७,**

**अध्यक्ष/ सचिव**
**श.ग्रा.वि.ब.शि.संस्था, देवळी**
**मो. ९५७९९९०३३३,**
**९९२२१८२४७४**

## संक्षिप्त

### तिघांना मारहाण, गुन्हा दाखल

**गिरड-** कारण नसताना तिघांना मारहाण केल्याची घटना करुळ (पवनगाव) येथे घडली. याप्रकरणी गिरड पोलिसांनी गुन्हा दाखल केला. समुद्रपूर तालुक्यातील करुळ (पवनगाव) येथील गणेश विश्रामकर, हर्षाली विश्रामकर, स्वप्नील गुलजरवार या तिघांना गजानन विश्रामकर याने मारहाण केली. याप्रकरणी तक्रारीवरून गजानन विश्रामकरविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### पेरणीयंत्राची दुचाकीला धडक; एक ठार, एक जखमी

**गिरड-** ट्रॅक्टरला लागून असलेल्या पेरणीयंत्राच्या धडकेत दुचाकीवरील एकाचा मृत्यू झाला तर एक जण गंभीररीत्या जखमी झाला. ही घटना कोरा ते साखरा मार्गावर घडली.सुभाष सकाराम खुडसंगे रा. साखरा असे मृताचे नाव आहे. जखमीचे नाव मृणाल उर्फ चिकू शरद तामगाडगे रा. साखरा असे जखमीचे नावआहे. सुभाष खुडसंगे आणि मृनाल तामगाडगे हे कोरा येथून साखरा येथे दुचाकीने येत होते. दरम्यान, विरूद्ध दिशेने येणाऱ्या ट्रॅक्टर चालकाने भरधाव वेगात आणि हयगयीने वाहन चालविल्याने ट्रॅक्टरच्या मागे असलेल्या पेरणीयंत्राची दुचाकीला धडक दिली. त्यात गंभीर जखमी सुभाष खुडसंगे यांचा सेवाग्राम रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. या अपघातात मृणाल तामगाडगे जखमी झाला. याप्रकरणी तक्रारीवरून गिरड पोलिसांनी नोंद केली.

### बंद घरातून रोखसह दागिने पळविले

**वर्धा-** कुलूपबंद घरातून चोरट्याने रोखसह दागिने चोरून नेले. ही घटना समतानगर भागातील सावरकर ले-आऊट परिसरात उघडकीस आली. वर्धा शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रजनी अमरजित फुसाटे या कामानिमित्त घराला कुलूप लावून वडनेर येथे माहेरी गेल्या होत्या. दरम्यान त्यांच्या कुलूपबंद घरला चोरट्यांनी लक्ष्य केले. चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश करून घरातील दोन सोन्याच्या अंगठ्या, ३ ग्रॅमचे सोन्याचे कानातले, रोख १० हजार रुपये, टिव्ही असा एकूण ४० हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. रजनी फुसाटे घरी परतल्या तेव्हा चोरी झाल्याचे लक्षात आले. त्यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध शहर पोलिसात गुन्हा दाखल केला.

### घरासमोरून दुचाकी पळविली

**वर्धा-** घरासमोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही घटना सालोड (हिरापूर) येथे घडली. याप्रकरणी सावंगी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. विवेक मुते (२६) रा. सालोड (हिरापूर) यांनी त्यांच्या मालकीची एमएच ३२ एपी १२०७ क्रमांकाची दुचाकी घरासमोर उभी केली होती. परिसरात कुणी नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली. यामुळे मुते यांचे ४० हजारांचे नुकसान झाले आहे.

### गुरुवारी सोमनाथ ज्योतिर्लिंग दर्शन

**हिंगणघाट -** आर्ट ऑफ लिविंग हिंगणघाट शाखेच्या वतीने सोमनाथ ज्योतीर्लिंग यात्रा हिंगणघाट येथे येणार असून, २६ जून रोजी सकाळी ७ ते ९ या काळात माहेश्वरी भवन येथे रुद्रपूजेसह मूळ शिवलिंगाचे दर्शन घेण्याची संधी भाविकांना मिळणार आहे. आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, या यात्रेद्वारे मूळ सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे अवशेष जनतेसमोर आणले जात आहे. सोमनाथ मंदिर हे बारा ज्योतिर्लिंगामधील पहिले असून, १०२६ मध्ये आक्रांतानी शिवलिंग उद्ध्वस्त केले. अग्निहोत्री ब्राह्मण कुळाने हे पवित्र अवशेष दक्षिण भारतात सुरक्षित ठेवले होते. याबाबत आर्ट ऑफ लिविंगचे अजय वानखेडे म्हणाले, ही यात्रा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, भारताच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक पूर्नजागरणाचा भाग आहे. ही फक्त काही शिलाखंडांची यात्रा नाही, तर ही श्रद्धेची, पुनरूत्थानाची आणि भारताच्या आत्म्याशी नाते जोडणारी यात्रा आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### दारूविक्रेता महिलेच्या गुंडगिरीमुळे नागरिक त्रस्त

**पुलगाव-** येथील वॉर्ड क्र. १७ मध्ये एका दारूविक्रेता महिलेच्या गुंडगिरीमुळे परिसरातील नागरिक त्रस्त आहेत. यातच लगतच राहणारा परिहार परिवारसुद्धा दहशतीत असून, दारूविक्रेत्या महिलेवर कारवाई करावी, अशी मागणी समाजसेविका कल्पना अनिल परिहार यांनी केली आहे. पुलगाव येथील वॉर्ड क्र. १७ येथील कल्पना अनिल परिहार या समाजकार्यात अग्रेसर असून, तत्कालिन पोलीस अधीक्षक निर्मलादेवी व पोलीस निरीक्षक मुरलीधर बुरांडे यांनी निर्माण केलेल्या महिला दारूबंदी गटाच्या सदस्य बनल्या. त्या अनुषंगाने महिला दारूबंदी गटात सक्रीय होत्या. दरम्यान महिला दारूबंदी गटाच्या सूचनेनुसार पुलगाव पोलीस दारूविक्रेत्यांवर छापे टाकून कारवाई करीत होते. यावेळी महिला गटाच्या महिलांना साक्षीदार बनवित असे. सदर दारूविक्रेता महिलेच्या दारू व्यवसायावर पुलगाव पोलिसांनी छापा टाकला असता परिहार यांना साक्षीदार केले. तेव्हापासून या दारूविक्रेता महिलेचा आणखीनच त्रास वाढल्याचे परिहार यांचे म्हणणे आहे. शिवाय त्यांच्या घराच्या दक्षीण बाजूला दारूविक्रेता महिलेचे घर असून लगतच असलेल्या १५ फुट रुंद व ४० फुट लांब सार्वजनिक गल्लीवर अतिक्रमण केले. त्यामुळे गल्ली अरुंद झाली आहे. यातच दारूविक्रेता महिलेकडून गल्लीत आकस व सुडबुद्धीने शिळे अन्न, सळका भाजीपाला व झाडलोट केलेली घाण टाकल्या जात असल्याने त्याची दुर्गंधी परिहार यांच्या घरात येते. नगरपरिषदेचे साफसफाई कामगारांनासुद्धा तेथील घाण साफ करू दिल्या जात नाही. परिहार परिवार हा शिक्षित असून दोन मुले, कल्पना परिहार व पतीविरोधात वेळोवेळी पोलिसांत खोट्या तक्रारी केल्या जाते. शिवाय कोर्टात खासगी फौजदारी तक्रार दाखल करते. तसेच वेळोवेळी दारूविक्रेता महिला व तिचा पती अश्लील इशारे करून शिवीगाळ करतात. एकुणच यामुळे परिहार परिवार त्रस्त झाला असून, दारूविक्रेता महिला व तिच्या पतीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १३ **अंक** - २०९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीच्या मुख्य कार्यालयात सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनासकर यांची सदिच्छा भेट



**अमरावती/ प्रतिनिधीः-** विदर्भात अग्रगण्य असलेली शैक्षणिक संस्था विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीच्या मुख्य कार्यालयाला सोमवार दि. २३ जुन २०२५ रोजी दुपारी १ वाजता दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या., मुंबईचे प्रशासक विद्याधर अनासकर , व्यवस्थापकीय संचालक दिलीप दिघे , दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. अमरावती शाखेचे व्यवस्थापक किशोर राऊत तसेच त्यांचे सहकारी राजेंद्र पाथरे यांनी सदिच्छा भेट दिली व संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली.

या प्रसंगी विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्या हस्ते मान्यवर पाहुण्यांचा शाल व श्रीफळ देवुन सत्कार करण्यात आला. सदर प्रसंगी विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीचे उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. (डॉ.) हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे, प्रा. डॉ.पुनम चौधरी, पकंज देशमुख, प्रा. विनय गोहाड आणि प्रा. गजानन काळे उपस्थित होते.

# चांदूर रेल्वे महिला महाविद्यालयात डॉ. तुषार देशमुख प्राचार्य म्हणून रुजू

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावती अंतर्गत महिला कला वाणिज्य महाविद्यालय चांदूर रेल्वे येथे प्राचार्य म्हणून डॉ. तुषार प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे माजी रजिस्ट्रार आहेत. त्यांनी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ.सीमा जगताप



देशमुख यांची निवड झाल्यानंतर त्यांनी आज दि.२३ जून २०२५ रोजी प्राचार्य म्हणून पदभार स्वीकारला. डॉ. तुषार देशमुख हे डॉ.राम मेघे इंजिनियरिंग अँड रिसर्च महाविद्यालय अमरावती येथे यांत्रिकी (मेकॅनिकल) विभागात यांचेकडून पदभार स्वीकारला. यावेळी सिनेट सदस्य डॉ. विजय कापसे, डॉ. प्रदीप दंदे, प्रा. संजीव भुयार, प्रा. अनिता धुर्वे, प्रशांत देशमुख, विजय सदानशिवे , पूजा देशमुख, नितीन अंभोरे उपस्थित होते.

# विद्यापीठातील एम.ए. संस्कृत प्रवेश

**अमरावती/ प्रतिनिधीः-** संस्कृत विभागामध्ये विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनासाठी भाषा व बोधन वर्ग, संस्कृत दिवस, वेदोत्सव, छंद कार्यशाळा, प्राचीन ज्ञानपरंपरेचे संवर्धन, वेद, उपनिषद, धर्मशास्त्र, व्याकरण, काव्य, तर्कशास्त्र यांसारख्या ग्रंथांचा अभ्यास होतो. या ग्रंथांचा अभ्यास करून पारंपरिक ज्ञानसंवर्धनाचा वारसा विभागाकडून अजूनही जपला जात आहे. त्याचबरोबर साहित्य, व्याकरणाचे सखोल शिक्षण, पाणिनीय व्याकरण, काव्यशास्त्र, नाट्यशास्त्र, धर्मशास्त्र, न्याय, वेदांत यांचा अभ्यास करून भाषेची वैज्ञानिक व साहित्यिक उंची विद्यार्थ्यांना समजावून दिली जाते. संशोधन व प्रबंध लेखनास भर देत पीएच.डी. आणि डी.लिट. स्तरावर विद्यार्थी मार्गदर्शन घेतात. संस्कृत संवाद, बोली विकास, संस्कृत प्रशिक्षण वर्ग, संस्कृत संभाषण शिबिरे आणि कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संस्कृत संभाषणात पारंगत केले जाते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्कृत वाचन, निबंध, भाषण, श्लोक पठण, उपनिषद् पारायण इत्यादींचे आयोजन केले जाते.

विभागाची प्रवेश क्षमता ४० आहे. या विभागातील प्रवेशासाठी दरवर्षी पूर्ण क्षमतेपेक्षा जास्त मागणी असते. दिवसेंदिवस संस्कृत विषयाचे महत्व वाढत आहे. त्यामुळे जास्तीतजास्त विद्यार्थ्यांचा प्रवेशासाठी ओढा असतो. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना संपर्क साधता येईल, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. संयोगिता देशमुख यांनी केले आहे.

## नगर परिषद कार्यालय, पांढरकवडा, जि.यवतमाळ
### (शिक्षण विभाग व भांडार विभाग )
### -निविदा सुचना-

**पांढरकवडा नगर परिषदेला खालील प्रमाणे वर्णन केलेल्या कामाकरिता सन २०२५-२६ या व शैक्षणिक वर्षासाठी साहित्य खरेदी करिता निविदा दर मागविण्यात येत आहे. त्याकरिता संबंधित व्यक्तींनी निविदा दर सादर करायचे आहे. त्यासाठी दि.०१/०७/२०२५ रोजी २.०० वाजेपर्यत सादर करावी.**

| अ.क्र. | कामाचे/सेवेचे नाव | शैक्षणिक पात्रता अर्हता | अर्ज फी/निविदा फार्म फी | निविदा अनामत |
|---|---|---|---|---|
| १ | न.प.कॉन्वहेट मधील (नर्सरी ते KG -१/ KG-२) करिता इंग्रजी माध्यमाचे | यादी प्रमाणे दर देणे | ५००/- | २०००/- |
| २ | न.प.कॉन्वहेट मधील (वर्ग १ ते ४) करिता इंग्रजी माध्यमाचे नवीन पुस्तके | यादी प्रमाणे दर देणे | ५००/- | ३५००/- |

**टिप :-**
- **अ.क्र. १ ते ८ च्या कामासंबंधीच्या शर्ती/अटी व तसेच माहिती शिक्षण विभाग येथे पहावयास मिळेल.**
- **कोणतीही एक अथवा सर्व निविदा रदद किंवा नाकारण्याचा अधिकार प्रशासक तथा मुख्याधिकारी, न.प.पांढरकवडा यांनी राखून ठेवला आहे.**

**सही/-**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद पांढरकवडा**

# एकलव्य गुरुकुल स्कूलमध्ये रंगला चिमुकल्यांचा प्रवेशोत्सव

**नांदगाव खंडेश्वर / प्रतिनिधीः-** तब्बल दोन महिन्यांच्या सुटीनंतर सोमवार दि. २३ जुन रोजी नांदगाव खंडेश्वर शहरातील एकलव्य गुरुकुल स्कूलचे आवार चिमुकल्यांच्या लगबगीने गजबजून गेले होते. स्कूलचे आवार चकाचक करून सजावटीसह नव्या-जुन्या विद्यार्थ्यांच्या स्वागताची जय्यत तयारी केली होती. रंगेबेरंगी फुग्यांनी सजलेली शाळा, बोलके फळे, गुलाबपुष्प देत वेलकम म्हणणारे टीचर्स अशा वातावरणात एकीकडे अनेक चिमुकले मोठ्या उत्साहाने शाळाप्रवेश करताना दिसत होते, तर दुसरीकडे ज्या विद्यार्थ्यांमध्ये शाळेमध्ये नव्याने



प्रवेश घेतला अशा विद्यार्थ्यांचे औक्षण व गुलाब पुष्प देऊन भारतीय संस्कृतीच्या पद्धतीने स्वागत करण्यात आले तसेच भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन नवगत विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आले. आणि 'एक पेड मा के नाम' या उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्ष लागून वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांनमध्ये आतिशय नवीन ऊर्जेने व नवचैतन्याचे वातावरण होते. यामुळे या शाळेत सोमवारी मुलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता. नवीन सुरुवात, नवीन स्वप्ने, नवीन संधी, घेऊन येणाऱ्या शाळेचा आजचा पहिला दिवस नवीन मित्र, नवीन गोष्टी शिकण्याची संधी होती. छोटी छोटी मुलं भविष्यातील चांगले नागरिक बनवून देशाचे नाव उज्वल करतील.

यावेळी नवगत विद्यार्थ्यांना एकलव्य गुरुकुल स्कूलचे मुख्य मार्गदर्शक सदानंद जाधव( राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक ) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी कार्यक्रमाला एकलव्य क्रीडा अकादमीचे अध्यक्ष विशाल ढवळे, एकलव्य गुरुकुल स्कूलचे व्यवस्थापक अनुप काकडे, मुख्याध्यापक विलास मारोटकर, प्राध्यापक गजानन काकडे, व पालक प्रतिनिधी पिंटूजी पांडेय महाराज, वैभव लोखंडे शाखा व्यवस्थापक, बुलडाणा बँक, पालक आझाद शिंदे उपस्थित होते. एकलव्य गुरुकुल स्कूलचे शिक्षक व शिक्षिका यांनी यशस्वीतेकरीता परिश्रम घेतले.

# भुगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव
## आ.तायडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक वाटप

**अचलपूर/प्रतिनिधीः-** संपूर्ण महाराष्ट्रात नवीन शैक्षणिक सत्र २०२५-२६ ची आजपासून औपचारिक सुरुवात झाली असून त्या पार्श्वभूमीवर अचलपूर तालुक्यातील भुगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव व पाठ्यपुस्तक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात आमदार प्रवीण तायडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना नवीन पाटी व पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर नव्या शैक्षणिक वर्षाची उमंग व प्रेरणा स्पष्टपणे दिसून आली.



शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाने एक आनंददायी वातावरण निर्माण केले होते. शाळेतील विद्यार्थ्यांचे उत्साहाने स्वागत करण्यात आले व त्यांना शिक्षणात सातत्य राखण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य शिक्षणासाठी सकारात्मक प्रेरणा मिळाली असून, नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंददायी व प्रेरणादायी झाली आहे. याप्रसंगी गटशिक्षणाधिकारी राम चौधरी, विस्तार अधिकारी भिलावेकर शिक्षक, ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामस्थ व पालक प्रामुख्याने उपस्थित होते.

Shri Shivaji Education Society Amravati's
## DR. PANJABRAO DESHMUKH COLLEGE OF LAW, AMRAVATI
MORSHI ROAD(Maharashtra) Pin Code-444602

**WALK IN INTERVIEW**

Following post are to be filled immediately on Clock hour basis & Consolidated pay basis.

| Sr.No | Name of the Post | Subject | No of Post | Qualification |
|---|---|---|---|---|
| 1 | Assistant Professor for Law Three Year Degree Course (UG) On Clock Hour Basis (Granted) | Law | 10 | LL.M.B. + NET/SET/ Ph.D. |
| 2 | Assistant Professor for Law Five Year Degree Course (UG) On Clock Hour Basis & Full Time | Law | Full Time - 05<br>CHB (Will be appointed in case of non-availability of Qualified Candidates) | LL.M.B. + NET/SET/ Ph.D. |
| 3 | Assistant Professor for Pre-Law 1st & 2nd Year of Five-Year Degree Course (UG) on Full Time (Non-Granted) Preferences with LL.B./LL.M. | English | 01 | MA (Eng) + NET/SET/ Ph.D. |
| | | Political Science | 01 | MA (Pol. Sci) + NET/SET/ Ph.D. |
| | | Economics | 01 | MA (Eco) + NET/SET/ Ph.D. |
| | | History | 01 | MA (His.) + NET/SET/ Ph.D. |
| 4 | Assistant Professor for Pre-Law On Five-Year Degree Course (UG) on CHB Basis | Marathi<br>Sociology<br>Env. Studies<br>Computer | 01<br>01<br>01<br>01 | MA (Mar) + NET/SET/ Ph.D.<br>MA (Sociology) + NET/SET/ Ph.D. /MCA/M.Sc. Computer |
| 5 | Full Time Assistant Professor Exclusive for Law Post Graduate (LL.M.) (Non-granted) | Law | 03 | LL.M.B. + NET/SET/ Ph.D. |

**All eligible candidates are required to walk in interview on Sunday 29/06/2025 at 12.30 PM To 3.30 PM**

**Notice :-**
1. Preference will be given NET SET Ph.D. qualified candidates.
2. Candidate must remain present with original document along with two xerox sets on Same day after 1 Hour before the interview.
3. No T.A. & D.A will be paid to candidates who are attending walk in interview.
4. In case of non-availability of the candidates as per UGC, candidates having LL.M..B. may be considered & consolidated salary will be given to LL.M. selected Faculty.

**Dr. Varsha N. Deshmukh**
**Principal**
**Dr. Panjabrao Deshmukh**
**College of Law, Amravati**

**Shri. Harshavardhan P. Deshmukh**
**President**
**Shri. Shivaji Education Society,**
**Amravati**

## दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
### १८ वे सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र. ९६८/२०२५**
**श्री जफर खान मोहम्मद खानर व सात वि निरंक**
**पुढील तारिख २०.०६.२०२५**

### जाहीरनामा/सायटेशन

**बनाम :** सर्वत्र लोकांना
**अर्जदार :**
1) **Jafar Khan Mahamad Khan,** Age 77 yrs., Occu.- Labour R/o. Near Madina Masjid, Tarkheda, Amravati, Tq. & Dist. Amravati
2) **Akhatar Bi Mazhar Khan,** Age 74 yrs., Occu.- Household R/o. Near Madina Masjid, Tarkheda, Amravati, Tq. & Dist. Amravati
3) **Afsar Khan Asad Khan,** Age 59 yrs., Occu.- Labourer R/o. Near Masjid, Taj Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati
4) **Firoz Khan Asad Khan ,** Age 52 yrs., Occu.- Labourer R/o. Near Aisha Masjid, Asma Colony, Amravati, Tq. & Dist. Amravati
5) **Shabana Parveen Mohammad Ashfaque** Age 52 yrs., Occu.- Household R/o. Near Madina Masjid, Tarkheda, Amravati, Tq. & Dist. Amravati
6) **Imran Khan Hamid Khan ,** Age 46 yrs., Occu.- Labourer R/o. Near Madina Masjid, Tarkheda, Amravati, Tq. & Dist. Amravati
7) **Javed Khan Hamid Khan,** Age 44 yrs., Occu.- Labour R/o. Near Madina Masjid, Tarkheda, Amravati, Tq. & Dist. Amravati
8) **Aslam Khan Hamid Khan ,** Age 42 yrs., Occu.- Labour R/o. Near Madina Masjid, Tarkheda, Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** **Nil**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत Nazirabi Mohammad Khan** हया **दि.२७.०९.२०००** रोजी अमरावती येथे मयत झाल्या. **अर्जदार श्री जफर खान मेहमद खान व सात** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा अर्जदार **अर्जदार श्री जफर खान मेहमद खान व सात** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०६.०५.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) अमरावती

## तहसिलदार, मोर्शी यांचे न्यायालय

**रा.मा.क्र./आर.टी.एस.६४/२३८०/ऑनलाईन ७/१२दुरुस्ती/येरला/२०२४-२०२५**

### जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री बळवंत नारायणराव आगरकर, रा.मोर्शी यांनी केलेल्या अर्जानुसार मौजा येरला येथील सर्व्हे नं.१६६/३ प्लॉट नं.९ क्षेत्र १५०.९५ चौ.मी.क्षेत्र हे निर्मला रामरावजी ढोरे यांचे कडून दिनांक २३/०३/२००७ रोजी नोंदणी कृत दस्त क्र.६११ नुसार खरेदी केले असुन सदर खरेदी खत हे माझ्या स्वमालकीचे नावे असून आज रोजी सदर प्लॉटचा गाव नमुना ७/१२ काढला असता सदर गाव नमुना ७/१२ वर चुकीने अभय नरहरीपंत राऊत, विनोद भिमरावजी वानखडे, सुनिल नरहरीपंत राऊत, ही नावे चुकीने येत असून सदर नावे कमी करुन सुधारित गांव नमुना ७/१२ तयार करुन मिळणेबाबत अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे.

त्या अर्थी प्रकरणात सदर नावे कमी करण्याबाबत ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी जाहीरनामा वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्यापासून **३० दिवसाचे आत** आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदती नंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही व प्रकरणात पुढील कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**दिनांक -१६.०६.२०२५**

शिक्का

**सही/-**
**तहसिलदार, मोर्शी**

## सायटेशन/जाहीरनामा
### विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी

आर.एम.जे.सी.क्र.३९२/२५ ने.ता.२८.०७.२०२५

**अर्जदार -** **नवनित देवराव नावंगे,** वय ४४ वर्षे, धंदा - मजुरी
रा.डहरगांव, ता.जि.बैतुल (मध्यप्रदेश)
ह.मु.अयोध्या नगर, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --
**निल (कुणीही नाही)**

वरील अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/s २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांची मावशी नामे विमल मोतीरामजी मगरदे हिचा दि.०३/०२/२०२४ रोजी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मृत्यू झाला. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय तथा निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- २०/०६/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय क.स्तर, मोर्शी

## नगर परिषद कार्यालय, अचलपूर
## जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **सोपान कृष्णराव थेटे,वहीदखॉ करीमखॉ,** पत्ता- सरमसपुरा व पेंशनपुरा परतवाडा, ता.अचलपूर यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड नं.२९ संगणक मालमत्ता क्र.ACHA-०००२५३८८ जुना मालमत्ता क्र.२९०००२८४/२०६ नझूल शिट नं.नझुल जागा,प्लॉट नं.नझुल जागा ही कर आकारणी नोंदवहीनुसार **सईदखा आपताब अहमदखॉ** या नावाने असून वरील अर्जदार **सोपान कृष्णराव थेटे व वहीदखॉ करीमखॉ** नावाने फेरफार घेण्याकरीता इमला विक्री नोटरी या कार्यालयामध्ये दिनांक ३०.०५.२०२५ रोजी अर्ज सादर केलेला आहे. या विषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. अन्यथा या मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा-

| | | |
|---|---|---|
| पुर्व | - | इलियास भाई यांचे घर |
| पश्चिम | - | वजीरशहा यांचे घर |
| उत्तर | - | रस्ता |
| दक्षिण | - | सरकारी रोड |

शिक्का

स्वाक्षरी/-
मुख्याधिकारी
नगर परिषद, अचलपूर

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
### श्री.एस.बी.कळदाते, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज - ११११/२०२५**
**ज्योती व इतर वि.निरंक**
**पुढील तारीख ०५.०८.२०२५**

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :-**
१. **ज्योती अरुण जोशी,** वय ६१ वर्षे, धंदा - निवृत्त
२. **निशांत अरुण जोशी,** वय ३३ वर्षे, धंदा - सेवा
सर्व रा.आर्शिवाद प्रसाद कॉलनी, साईनगर रोड, सातुर्णा अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अरुण नारायणराव जोशी** हया **दि.२७/०३/२०२५** रोजी **रोहनखेडा** येथे मयत झाल्या. **अर्जदार ज्योती अरुण जोशी** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार ज्योती अरुण जोशी** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २०.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
### ४ थे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज - ८४४/२०२५**
**श्री रामकृष्ण देशमुख व एक वि निरंक पुढील तारीख १३.०६.२०२५**

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1) **Ramkrishna Bhimraoji Deshmukh,** Age 72 yrs., Occu.- Agriculturist R/o. Ram Mohan Nagar, Gopi Colony, V.M.V., Amravati
2) **Smt. Kumudini Vinaykrao Deshmukh (Widow of Vinayakrao Bhimraoji Deshmukh),** Age 66 yrs., Occu.- Household R/o. Pansare Line, Gadge Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** **Nil**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत Pisabai alias Sakhubai Bhimrao Deshmukh** हया **दि.२६.०१.२०१५** रोजी अमरावती येथे मयत झाल्या. **अर्जदार श्री रामकृष्ण भिमरावजी देशमुख व एक** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री रामकृष्ण भिमरावजी देशमुख व एक** यांनी रा.वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २९.०४.२०२४** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## सायटेशन/जाहीरनामा
### विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी

आर.एम.जे.सी.क्र.३८०/२५ ने.ता.२४.०७.२०२५

**अर्जदार -** **वसंता नारायण भुजबळ,** वय ५५ वर्षे, धंदा - मजुरी
रा.भाईपुर, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --
**कुणीही नाही**

वरील अर्जदारांने वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदाराची आई मैनाबाई नारायण भुजबळ व वडिल नारायण लक्ष्मण भुजबळ हे अनक्रमे दिनांक ११/१२/२०११ व दिनांक ०१/१०/२००५ रोजी भाईपुर,ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहे.त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हा वरील अर्जदार आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय तथा निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- २३/०६/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक २८९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# शाळा बनली गोकुलधाम, स्वागताला चंपक चाचा, टप्पू सेना

### पळसखेड येथील शाळाप्रवेशोत्सव ; गटसाधन केंद्राचा उपक्रम

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

दरवर्षी शाळा प्रवेशोत्सव हटके करण्यासाठी चर्चेत असलेल्या चांदूर रेल्वे गटसाधन केंद्र यांनी यावर्षी शाळेलाच गोकुलधाम बनविले असून विद्यार्थ्यांच्या स्वागताला चंपक चाचा, जेठालाल, पत्रकार पोपटलाल, दयाबेन, डॉ.हाथी , आत्माराम तुकाराम भिडे, रोशनसिंग सोडी आदी कलाकारांनी हजेरी लावली यावेळी गटसाधन केंद्रातील कर्मचाऱ्यांनी या सर्वच्या वेशभूषा साकारल्या त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकच उत्साह संचारला असून सर्व गावच शाळेच्या प्रवेशोत्सवात रमले.

शासनाच्या निर्देशनाप्रमाणे जिल्ह्यात सर्वत्र दि २३ जून रोजी शाळा शुभारंभ करीत विविध उपक्रम राबविण्याचे आदेश होते त्याचाच एक भाग विद्यार्थ्यांची सध्याची सर्वात आवडती मालिका असलेली



तारक मेहताचा उलटा चष्मा याच मालिकेची थीम घेऊन तालुक्यातील पीएमश्री जिप प्राथमिक शाळा पळसखेड येथे शाळा प्रवेशोत्सव साजरा केला यावेळी या मालिकेतील विविध पात्र गटसाधन केंद्रातील साधन व्यक्ती, विशेष शिक्षक, समावेशित विशेष तज्ञ यांनी रंगविले. त्याच मालिकेतील सोडी यांच्या जीप्शीतून वर्ग पहिलीतील विद्यार्थ्यांना शाळेत आणले यावेळी संपूर्ण गावातून फेरी काढत विद्यार्थ्यांचे स्वागत केले गावतील नागरिक आणि पालकांनी ही या अगळ्यावेगळ्या उपक्रमाचे स्वागत करीत या उपक्रमाचा भाग बनले, चौकाचौकात विद्यार्थी सोबत पालकही थिरकले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेचे मुख्याध्यापक संजय शेलोकार, तुळशीराम चव्हाण, सुशील देशमुख, प्रीती सपकाळ, कुमुदिनी मेश्राम, गटसाधन केंद्राचे साधन व्यक्ती विवेक राऊत, मंगेश उल्हे, निखिलेश दानापूरकर, विजय दवाळे, दिपमाला कुमरे, अनिल गोंडसे, रणजित राजुरकर, श्रीकृष्ण हिवराळे, वर्षा गादे, प्रमोद तागडे यांनी परिश्रम घेतले.

**आमदार प्रताप अडसड यांनी केले स्वागत**

यावेळी शाळेला आमदार प्रताप अडसड यांनी भेट देऊन शालेय पुस्तक, गणवेश वाटप केले.यावेळी आमदार प्रताप अडसड यांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले. यावेळी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे, केंद्रप्रमुख विजय सगळे, शाळा व्यवस्थापन समितीचे विष्णू मते,योगेश मुकुरने सुनील पुणसे विनोद ढगे शेख छोटू यांच्यासह माजी गटशिक्षणाधिकारी मुरलीधर राजणेकर,सरपंच लता महल्ले जया चवाळे, सरिता देशमुख, मोनिका वानखडे,योगिता कडू,दत्ताभाऊ पुणसे, अफजल खा पठाण, गिरीश साखरकर, रूपराव शेलोकार,शरद लादे,छोटू वानखडे, अमोल अडसड, दिपाली मते, संजय पुणसे, प्रमोद अडसड, विद्याधर होले आदी उपस्थित होते.

# नवगतांचे स्वागत... पाठ्यपुस्तक व साहित्याचे वाटप

### उत्तमसरा येथे शाळा प्रवेशोत्सव

**अमरावती/का.प्र.**

जि.प. प्राथमिक शाळा उत्तमसरा पं.स.भातकुली येथे मोठ्या उत्सवात प्रवेशोत्सव कार्यक्रम घेण्यात आला.शाळा प्रवेशोत्सव हा उपक्रम स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांची गुणवत्ता व मुलांची उपस्थिती वाढविण्यासाठी राबविण्यात येते. नविन शैक्षणिक सत्र आज २३जून पासुन सुरु झाले.पहील्या वर्गात शाळेचा उंबरठा पहिल्यांदाच ओलांडणाऱ्या चिमुकल्यांच्या स्वागता करीता शाळेने जय्यत तयारी केली होती. यावेळी नवगतांचे स्वागत, पाठ्यपुस्तके, शालेय गणवेश, बुट, शॉक्स आणि लेखन साहीत्याचे वाटप करण्यात आले.भोजनात मसालेभात व लाडू देण्यात आला.



कार्यक्रमाचे अध्यक्ष उत्तमसरा गावाचे आदर्श सरपंच तथा व्यवस्थापन समितिचे सदस्य धर्मेंद्र मेहरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रत्नादिप सवाई,उपाध्यक्ष प्रिया मानकर,पोलीस पाटील सचिन सवाई, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य वनिता जोगी, अंगणवाडी सेविका अनुराधा भिंगारे,जयश्री पेटेकर,शाळेच्या मुख्याध्यापिका मिनाक्षी इंगळे,स.शि.राजेश सावरकर, गजानन येलोने,प्रमोद कांबळे, श्रध्दा बोबडे उपस्थित होत्या.

शाळेतील सर्व विद्यार्थाना पाठ्यपुस्तके,शालेय गणवेश,बुट,शॉक्स आणि लेखन साहीत्य वाटप करण्यात आले.मान्यवरांनी उपस्थित विद्यार्थांना नविन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी विद्यार्थांच्या चेहऱ्यावर मोठा उत्साह दिसत होता.शालेय पोषण आहारात आज मसालेभात व लाडूचे वाटप करण्यात आले.नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थांचे पालक यावेळी उपस्थित होते.प्रास्ताविक मुख्याध्यापिका मिनाक्षी इंगळे तर संचालन गजानन येलोने आणि आभार प्रदर्शन राजेश सावरकर यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता शाळेचे शिक्षक,पालक दुर्गा आकाश वानखडे,ममता बोरेकर सिमा भडके,रुपाली मालधुरे,अर्पना झाडे,मंदा सवाई यांचे सहकार्य लाभले.सरपंच धमेन्द्र मेहरे यांनी गोरोवोद्गार काढून त्यांचे स्वागत केले.

# स्मार्ट मिटर बसविण्यास नागरिकांचा विरोध

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

तालुक्यात सार्वत्रीक स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम सुरू झाली असून मिटर लावण्याचा विषयाच्या अनुषंगाने सातेगाव येथुन स्मार्ट मिटर बसविण्यास विरोध होत आहे.

वीज महावितरण कंपनीने राज्यातील सर्व ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटर सादर करणार असल्याची घोषणा केली आहे. तसेच ही मीटर्स कंपनीच्या खर्चाने लावनार अशी खोटी व दिशाभूल करणारी जाहिरात करण्यात आली आहे. ग्राहकांना धाकधपट भीती दाखून आपले मीटर फॉल्टी नादुरुस्त आहे व ते बदलवायचे आहे. अशी बतावणी करून स्मार्ट मीटर बसवण्याचे षडयंत्र सुरु आहे. सातेगाव येथे हे स्मार्ट मिटर बसवतांना ग्राहाकांची संमती शिवाय मीटर बसविण्यात येऊ नये. असे आदेश असतांनाही खाजगी कंपनीचे कर्मचारी गोर गरीब झोपडपट्टीतील रहिवाशी, भूमिहीन, वीज ग्राहकांना सक्तीने मीटर बसवत आहेत.या बाबत शिवसेना (उबाठा) गटाचे माजी उपसभापती पं.स. महेश खारोळे यांनी जिल्ह्याचे खासदार,क्षेत्राचे आमदार, तहसीलदार, विज वितरण कंपनीकडे तक्रार दाखल केली असुन ग्रामपंचायत सातेगाव सरपंच,सदस्य, सचिव यांचे कडे स्मार्ट मीटर जबरदस्तीने लावु न देण्याची विनंती व या विरोधात आमसभा बोलावून स्मार्ट मिटर काढुन साधे मिटर व ग्राहकांची फसवणुक थांबविण्याची मागणी केली आहे. त्याबाबत ग्रामस्तरावर मिटर लावू न देण्याची मुनादी देत या संमधात तक्रार अर्ज दाखल करण्याची विनंती करण्यात आल्याने या प्रीपेडा मिटरला सार्वत्रीक स्तरावर विरोध होण्याचे संकेत मिळत आहेत

> **सातेगाव येथे गोरगरीब नागरिकांना धाक दाखवून मीटर बसविण्यात आले आहे. मुख्यमंत्री यांनी सामान्य ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर लागणार नाही असे आदेश दिले होते.सदर स्मार्ट मिटरची किंमत सुद्धा जास्त आहे. ही किंमत वीज बिलात लावून वसूल केली जाणार आहे. त्यामुळे वरील विषयावर ग्रामपंचायतने आमसभा बोलावून लावलेले मीटर त्वरित काढून साधे मीटर लावावे व ग्राहकांची फसवणूक थांबवावी अशी मागणी आमसभेत करणार आहे.**
>
> **महेश खारोळे,**
> माजी.उपसभापती पं.स.सातेगाव

# मणीबाई गुजराती हायस्कूलमध्ये पर्यावरण पूरक प्रवेशोत्सव



**अमरावती/का.प्र.**

दी गुजराती एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित मणीबाई गुजराती हायस्कूल अंबापेठ अमरावती मध्ये वर्ग पाचवीतील नवप्रवेशित विद्यार्थ्यांकरीता पर्यावरण पूरक प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्काराची रुजवणूक व्हावी या उद्देशाने सर्व नवागत विद्यार्थ्यांचे कुमकुम तिलकाने औक्षण करून, पुष्प वर्षावाने व शाळेचा लोगो असलेला पर्यावरण पूरक हात रुमाल व भारतीय प्रजातीचे रोपटे देऊन शाळेच्या मुख्याध्यापिका सन्माननीय अंजली देव व सर्व शिक्षक वृंद यांनी शाळेच्या प्रवेशद्वारावर बँड पथक व बिगुल च्या आवाजात विद्यार्थ्यांचे स्वागत केले. याप्रसंगी आराध्या लांडगे या विद्यार्थिनीने विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी केलेले व्हायोलिन वादन लक्षवेधक ठरले.

शाळेचे प्रवेशद्वार आंब्याच्या पानाचे तोरण, फुलांच्या माळा लावून अतिशय सुंदर सुशोभित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये उत्साह द्विगुणीत व्हावा म्हणून शाळेच्या प्रवेशद्वाराच्या बाजूला सेल्फी पॉइंट सर्व विद्यार्थी व पालकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरले.अतिशय उत्साही वातावरणात विद्यार्थ्यांचा शालेय परिसरात प्रवेश झाल्यानंतर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शुभेच्छा संदेशाचे वाचन श्री. पाटणकर व श्री. मुंजे यांनी केले. विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तकांचे वितरण करण्यात आले तसेच शालेय पोषण आहार व पूरक आहारा अंतर्गत विद्यार्थ्यांना पुलाव, पोहे व केळी असा अल्पोपहार देण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या या प्रवेशोत्सवासाठी गुजराती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. सुरेशभाई राजा यांनी समस्त कार्यकारिणी यांच्यातर्फे शुभेच्छा देण्यात दिल्या. सन्माननीय सौ. नीलिमा टाके (गुल्हाने) (शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती), सन्माननीय सौ. प्रिया देशमुख (शिक्षणाधिकारी, माध्यमिक जि. प.अमरावती), सन्माननीय डॉ. प्रकाश मेश्राम (शिक्षणाधिकारी म.न. पा. अमरावती) यांच्यातर्फे विद्यार्थ्यांना शुभेच्छा प्राप्त झाल्यात.याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अंजली देव, उप मुख्याध्यापक श्री. अनिल पंजाबी, पर्यवेक्षक श्री. प्रवीण सावजी, सौ. सरिता गायकवाड, श्री. प्रफुल्ल मेहता, माजी नगरसेविका सौ. रश्मी नावंदर, पत्रकार श्री. शैलेशजी धुंदी व इतर पत्रकार बंधू , समस्त शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व पालक यांची उपस्थिती होती.

# जि.प.करजगाव शाळेत प्रवेशोत्सव



**तिवसा/वार्ताहर**

आज शाळेच्या पहिल्या दिवशी जिल्हा परिषद शाळा करजगाव येथे शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम गावातून प्रभात फेरी काढून सर्व नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.गावातील दाखल पात्र १००% विद्यार्थ्यांना शाळेत दाखल करण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक अविनाश गंजीवाले यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना दररोज शाळेत उपस्थित राहण्यासाठी पालकांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. शाळेच्या पहिल्या दिवशी सर्व मुलांना मोफत गणवेश व मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला शाळेतील शिक्षिका सविता पारसे , बिआरसी तिवसाचे लांडगे सर,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रकाश गाढवे, उपाध्यक्ष अमोल वाघ, सरपंच आशिष बांबल, उपसरपंच रवींद्र कोंडे, वृषाली बंड ,अंगणवाडी सेविका मोनिका गोपाळे, रूपाली भोयर , इंदिरा कोंडे, आशिष भोकरे, मोहन पुनसे, सारिका बिचके,स्वयंपाकी,मदतनीस व बहुसंख्या पालक उपस्थित होते. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शेवटी मिष्ठान्न चे वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# अरूणोदय इंग्लिश स्कूलमध्ये स्वागतोत्सव

**अमरावती/का.प्र.**



व्ही.एम.व्ही. परिसरातील अरुणोदय इंग्लिश स्कूल व ज्यू. कॉलेज ऑफ सायन्स, हर्षराज कॉलनी, अमरावती येथे अरुणोदय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.वसंत लुंगे यांच्या शुभहस्ते सर्व विद्यार्थ्यांचे वृक्ष आणि पुष्पगुच्छ देउन स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना वृक्षांचे आपल्या जीवनातील महत्व किती आहे याचे मार्गदर्शन करण्यात आले.त्याच प्रमाणे दैनंदिन परिपाठ, श्लोक, पसायदान आणिा तालीयोगा घेण्यात आला. या प्रसंगी अरूणोदय शिक्षणसंस्थेच्या सचिव डॉ.भारती लुंगे , अरूणोदय इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेजच्या प्राचार्या विशाखा नाफडे, उपप्राचार्या सीमा कुथे, अरुणोदय इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका शिल्पा पाजनकर, उपमुख्याध्यापिका निता काळमेघ, सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

# यू.जी.सी. (नेट) परीक्षेमुळे विद्यापीठाच्या उन्हाळी- २०२५परीक्षा पुढे ढकलल्या

### विद्यार्थ्यांनी नोंद घेण्याचे आवाहन

**अमरावती-**यू.जी.सी. (नेट) परीक्षा २५ जून ते २९ जून दरम्यान होणार आहे. त्यामुळे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी - २०२५ पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या असून, सदर परीक्षा दि. ५ जुलै, २०२५ ते ९ जुलै, २०२५ दरम्यान पूर्वीच्याच नियोजित वेळेत व परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार असल्याचे परीक्षा विभागाकडून कळविण्यात आले आहे. सदर परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांनी त्यांना देण्यात आलेले प्रवेशपत्र सोबत आणावे.

ज्या परीक्षा पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत, त्यामध्ये एम.ए. सेमि.-४ (एन.ई.पी.) सर्व विषय, एम.ए. सेमि.-४ (एन.ई.पी.) इंग्रजी, एम.पी.ए.सेमि.-४ (एन.ई.पी.) ड्रामा थिएटर, एम.पी.ए.सेमि.-४ (एन.ई.पी.) डान्स (कथक), एम.कॉम. सेमि.-४ (एन.ई.पी.) आणि एम.एस्सी.सेमि.-४(एन.ई.पी.) एन्व्हायर्मेंट सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर सॉफ्टवेअर, कॉम्प्युटर सायन्स, फॉरेन्सिक सायन्स, एम.एस्सी.(एच./एस्सी.) सेमि.-४ (एन.ई.पी.) ऑल स्पेशीलायझेशन या परीक्षांचा समावेश आहे. यासंदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, केंद्राधिकारी, महाविद्यालये, परीक्षा केंद्रांना कळविण्यात आले असून महाविद्यालयांनी याची तातडीने आपल्या विद्यार्थ्यांना जाणीव करुन द्यावी. तसेच विद्यार्थ्यांनी सुध्दा याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या वेबसाईटवर परीक्षा विभागाच्या अधिका-यांच्या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची प्रवेशबंदी शिथिलबाबत घोषणा



**अमरावती** -संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने २२ एप्रिल, २०२५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत विना शिक्षक / विना प्राचार्य असलेल्या ४९ महाविद्यालयात शैक्षणिक सत्र २०२५-२६ पासून प्रथम वर्ष प्रवेशांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला होता. व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार विना शिक्षक / विना प्राचार्य असलेल्या ४९ महाविद्यालयांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आली होती.

परंतू, व्यवस्थापन परिषदेने गठीत केलेल्या समितीने दिलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने ज्या महाविद्यालयांना एका शैक्षणिक सत्रापूरती प्रवेश बंदी घालण्यात आली होती, त्यामध्ये शिथिलता देण्यात आली आहे.

शिथीलता देण्यात आलेल्या महाविद्यालयां ची यादी विद्यापीठाच्या www. sgbau.ac.inया संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आली असून याबाबत सर्व संबंधित महाविद्यालयांनी व प्रवेशित होवू इच्छिणा-या विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे विद्यापीठा च्यावतीने कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी कळविले आहे.

# ठाणेदार अशोक जाधव यांना धारणीकरांकडून निरोप

**धारणी/वार्ताहर**

मागील दोन वर्षांपासून धारणी पोलीस ठाण्यात ठाणेदार पदावर कार्यरत असलेले अशोक जाधव यांची प्रशासकीय बदल्याने इतरत्र नियुक्ती झाली असून, त्यांना स्थानिक नागरिकांकडून तसेच पोलीस विभागाकडून भावनिक निरोप देण्यात आला. त्यांच्या कार्यकाळात आदिवासी व गैरआदिवासी समाजातील नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. जाधव यांनी सामाजिक बांधिलकी जपत अनेक उपक्रम राबवले. रक्तदान शिबिरांपासून ते जनजागृती मोहिमांपर्यंत अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा पुढाकार राहिला. त्यामुळे त्यांची प्रतिमा सर्वसामान्य नागरिकांमध्ये अत्यंत सकारात्मक निर्माण झाली होती. त्यांच्या काळात गुन्हेगारीवर आळा बसला असून, अनेक नामांकित गुन्हेगारांना हद्दपार करण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला.ठाणेदार जाधव यांचा पोलिस खात्यातील शिस्तशीर कार्यपद्धती व जनतेशी असलेला थेट संपर्क हे त्यांचे खास वैशिष्ट्य ठरले. त्यांच्या निरोप समारंभाचे आयोजन धारणी येथे करण्यात आले होते. या वेळी महसूल विभाग, नगरपंचायत, वकील संघ,पत्रकार बांधव,राजकीय प्रतिनिधी व्यापारी आदी उपस्थित होते. नव्याने ठाणेदारपदाची जबाबदारी अवतारसिंग चव्हाण यांनी स्वीकारली आहे.

# पावसाच्या कवितांनी भरली सोहळ्यात रंगत

### बांधिलकी प्रतिष्ठानतर्फे कविसंमेलन तसेच ऋणनिर्देश सोहळा

**अमरावती/का.प्र.**

बांधिलकी प्रतिष्ठान अमरावती द्वारा आयोजित पहिले राज्यस्तरीय बांधिलकी साहित्य संमेलन अमरावतीच्या भूमीत यशस्वीरित्या पार पडले. राज्यभरातून अनेक नामवंत साहित्यिकांच्या गौरवांकित प्रतिक्रिया आयोजकांना प्राप्त झाल्या होत्या.

हे संमेलन यशस्वी करण्यासाठी राबणाऱ्या आयोजन समितीतील सहयोगी सदस्यांचा सत्कार करून त्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा ॲड.डॉ. नीता प्रफुल्ल




कचवे यांनी बांधिलकी प्रतिष्ठानतर्फे या ऋणनिर्देश तसेच कविसंमेलन सोहळ्याचे आयोजन हॉटेल खाना खजाना वलगाव रोड,अमरावती येथे केले होते. ऋणनिर्देश सोहळा तसेच कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी संवेदना बहुद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व सुप्रसिद्ध वऱ्हाडी कवी गजानन काकडे होते. प्रमुख अतिथी म्हणून उद्योजक हरिदासजी उल्हे,कांचन उल्हे,शीतल महल्ले,माधव रेखे,मनोज भांदर्गे,प्रदीप भांदर्गे, अमोल वारकरी तसेच सुप्रसिद्ध गझलकार तसेच वार्ताहार विशाल कन्हेरकर, संपादक साहित्य प्रवाह आदि मान्यवर उपस्थित होते. स्वागतगीत छाया गजेंद्र पाथरे यांनी आपल्या सुमधुर आवाजात सादर करून सोहळ्याची शानदार सुरुवात केली.त्यानंतर ॲड. डॉ.नीता कचवे यांनी आपल्या प्रस्ताविकातून संमेलनाच्या यशस्वीतेसाठी राबणाऱ्या आयोजन समितीतील सदस्यांचे मनापासून आभार व्यक्त केले. या प्रसंगी बांधिलकी प्रतिष्ठानच्या सदस्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व ग्रंथ देऊन सत्कार देखील करण्यात आला.

यामध्ये वऱ्हाडी कवी गजानन काकडे, खुशाल गुल्हाने, कांचन उल्हे,छाया पाथरे,गजेंद्र पाथरे, सीमा भांदर्गे,वर्षा भांदर्गे, अंजली वारकरी, हेमा राऊत,विशाल मोहोड,विकास राऊत, विशाल कन्हेरकर,अजय अडीकने, अबोली अडीकने, सुयोग राजनेकर,राजेश चौरपगार, नयन पऱ्हाड व जयश्री बोडखे आदि सर्व कविंनी आपल्या पावसावरील बहारदार रचना सादर करून उपस्थितांना चिंब भिजविले. सोहळ्याचे संचालन अंजली वारकरी यांनी तर आभार प्रदर्शन खुशाल गुल्हाने यांनी केले.

# नेपाळमधून अमरावतीत आलेल्या अल्पवयीन मुलीची प्रसूती

## पतीवर बालविवाह व पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** नेपाळहून अमरावतीत आलेल्या एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीने येथील डफरीन म्हणजेच जिल्हा स्त्री रुग्णालयात एका बाळाला जन्म दिला आहे. प्रसूतीच्या वेळी मुलीचे वय लक्षात येताच रुग्णालय प्रशासन आणि महिला आरोग्य कर्मचाऱ्यांची एकच धावपळ उडाली.



वैद्यकीय अहवालानुसार, ती मुलगी अवघ्या १७ वर्षांची आहे. तिचा जन्म २३ एप्रिल २००६ रोजी झाला. तिच्या जबाबात तिने सांगितले की, डिसेंबर २०२३ मध्ये तिचा विवाह नेपाळमधील एका तरुणाशी झाला होता आणि

### राजापेठ पोलिसांची कारवाई

विवाहानंतर नवरा-बायको म्हणून ते दोघे अमरावतीत वास्तव्यास आले. मात्र कायद्यानुसार ती अल्पवयीन असल्याने तिचा विवाह अमान्य असून, तिच्यावर झालेले संबंध हा लैंगिक अत्याचार मानला जातो. त्यामुळे राजापेठ पोलिसांनी संबंधित तरुणावर भारतीय दंड विधान कलमांसह बालविवाह प्रतिबंधक कायदा कलम ९ व पोक्सो कायद्यांतर्गत (कलम ४, ६) गुन्हा दाखल केला आहे. ही घटना उघडकीस येताच राजापेठ पोलीस ठाण्याचे अधिकारी सक्रिय झाले. महिला आरोग्य विभागाच्या सतर्कतेमुळे अल्पवयीन मुलीच्या संरक्षणाची दिशा पकडली गेली. या घटनेने अल्पवयीन विवाह आणि बाललैंगिक अत्याचाराच्या गंभीर प्रश्नांकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले आहे. दरम्यान आता राजापेठ पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

# तलवार घेऊन फिरणारा 'मजनू' अखेर गजाआड!

## तडीपार असूनही दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील फ्रेजरपुरा परिसरात तलवार घेवून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या एक तडीपार गुन्हेगाराला पोलिसांनी अखेर गजाआड केले. यश उर्फ मजनू प्रवीण गडलिंग (वय २२, रा. संजय गांधी नगर क्र. २, अमरावती) असे अटकेत आलेल्या या आरोपीचे नाव आहे.

गुप्त माहितीनुसार, स्मशानभूमी परिसरात तलवार चमकावत यश उर्फ 'मजनू' हा नागरिकांमध्ये थरकाप उडवत असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. लगेचच पथकाने सापळा रचत, झाडाझुडपांमध्ये लपून बसलेल्या या आरोपीला अटक




केली. त्याच्याकडून एक धारदार लोखंडी तलवार (अंदाजे किंमत रु. १०००) जप्त करण्यात आली. विशेष म्हणजे, यश गडलिंग याच्यावर यापूर्वीच तडीपारीची कारवाई झाली असूनही तो अमरावती शहरात मुक्तपणे फिरत होता. त्यामुळे त्याच्याविरोधात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ व शस्त्र अधिनियम ४, २५ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ही धडक कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या तडीपार गुन्हेगारांविरोधातील विशेष मोहिमेअंतर्गत करण्यात आली. यामध्ये पोलीस उपायुक्त सागर पाटील, सहायक आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रोशन शिरसाट, निरीक्षक निलेश गावंडे (गुन्हे), पीएसआय राहुल महाजन व त्यांच्या डीबी पथकाने सहभाग घेतला. या मोहिमेत पोलिस हवालदार सुभाष पाटील, सचिन बोरकर, शशिकांत गवई, सागर चव्हाण, जावेद पटेल यांनी देखील महत्त्वाची भूमिका बजावली.

# एसटी बसला आग, ७० प्रवासी थोडक्यात बचावले

## चालक-वाहकाची सतर्कता

### रंगोली लॉन समोरील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** चांदूरबाजार वरून अमरावती डेपो मध्ये येणाऱ्या एसटी





महामंडळाच्या बस मध्ये अचानक आग लागली. ही घटना आज सोमवारी २३ जून रोजी दुपारी १.५० वाजता कठोरा मार्गावरील रंगोली लॉन समोर घडली. बस चालक आणि वाहकाने दाखवलेल्या सतर्कतेमुळे बस मध्ये बसलेले ७० प्रवासी ☞(पान २ वर)

# जिल्हाधिकाऱ्यांच्या नावे बनावट फेसबुक खाते

## प्रतिसाद न देण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या नावे बनावट फेसबुक खाते तयार करण्यात आले आहे. यावरून विविध प्रकारच्या विनंत्या पाठविण्यात येत आहे. यास कोणीही प्रतिसाद देऊ नये, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.



अमरावतीचे जिल्हाधिकारी येरेकर यांच्या नावे बनावट खाते करून फ्रेन्ड रिक्वेस्ट पाठविण्यात येत आहे. तसेच सैन्य दलातील मित्राचे फर्निचर विकायचे असल्याची पोस्ट करण्यात आली आहे. हा फसवणुकीचा प्रकार असल्याने त्यास प्रतिसाद देऊ नये. अशा प्रकारची कोणतीही पोस्ट किंवा खाते तयार ☞(पान २ वर)

# मोझरी पॉइंटवर झाडाला लटकलेला आढळला मृतदेह

## -आत्महत्या की घातपात? -१० दिवसांपासून झाडावर होता मृतदेह

**अमरावती/प्रतिनिधीः-** चिखलदरा येथील मोझरी पॉइंट परिसरात एका अज्ञात युवकाने झाडाला गळफास लावून आत्महत्या केल्याचे प्राथमिकदृष्ट्या स्पष्ट झाले आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

झाडाला लटकलेल्या अवस्थेत सडलेला मृतदेह दिसून येताच नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली. चिखलदरा पोलीस



ठाण्याचे ठाणेदार प्रशांत मसराम यांच्यासह पोलीस पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांच्या प्राथमिक अंदाजानुसार मृतदेह अंदाजे १० ते १२ दिवसांपूर्वीचा असावा. मृत व्यक्तीने काळी पॅन्ट व क्रिम रंगाचा शर्ट परिधान केला होता. मात्र मृतदेहाची अवस्था इतकी सडलेली होती की, ओळख ☞(पान २ वर)

# नांदगावचे ग्रामीण रुग्णालय सलाईनवर

## रुग्णवाहीका नादुरुस्त, इमारत ठरली शोभेची वास्तू

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** येथील ग्रामीण रुग्णालयाला विविध समस्येने ग्रासले असून सगळीकडे अस्वच्छता परिपूर्ण सोई व सुविधा नसल्याने रुग्णालयाची इमारत शोभेची वस्तू ठरली आहे. रुग्णवाहीका सतत नादुरुस्त असल्याने रुग्णांची हेळसांड होत असल्याचा आरोप करीत शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी तात्काळ उपाय योजना कराव्या अन्यथा आंदोलन छेडू,असा ईशारा जिल्हा शल्य चिकित्सकांना निवेदन सादर करून दिला.

नांदगाव खंडेश्वर हे तालुक्याचे मुख्यालय असून येथील ग्रामीण रुग्णालयात असलेली रुग्णवाहिका नेहमी नादुरुस्त असल्याने जिल्हा



> अनेक महिन्यापासून ग्रामीण रुग्णालयातील रुग्णवाहिका नादुरुस्त आहे. रुग्णांना जिल्हास्तरीय उपचारासाठी सुविधा उपलब्ध होत नाही. असलेल्या रुग्णवाहिकेत रुग्णांना सेवा मिळत नाही. तात्काळ नवीन रुग्णवाहिका आरोग्य विभागाने उपलब्ध करून द्याव्या अन्यथा आंदोलनाचा पवित्रा घ्यावे लागेल.
>
> - **प्रकाश मारोटकर,** विधानसभा समन्वयक, शिवसेना ठाकरे गट

पातळीवर उपचाराकरिता रुग्णांना घेऊन जाताना रस्त्यातच बंद पडते. त्यामुळे नातेवाईक रुग्णांना ☞(पान २ वर)

# लोतवाडा येथील सरपंच व उपसरपंचासह दोन सदस्यांचे शासकीय जागेवर अतिक्रमण

## सचिवाच्या अहवालानंतरही चार सदस्यांना पात्र ठरविलेच कसे?

**खल्लार/प्रतिनिधीः-** लोतवाडा येथील ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व अन्य दोन सदस्यांनी शासकीय जागेवर अतिक्रमण केले व तसा अहवाल ग्रामपंचायत सचिव यांनी वरीष्ठाकडे पाठविला असतांनाही अप्पर जिल्हाधिकारी यांनी लोतवाडा येथिल चार जणांना पात्र ठरविले.

लोतवाडा येथील सरपंच

> मला कोणतीही नोटीस न देता मनमानीपणे माझ्या घराचे मोजमाप करण्यात आले. माझे कुठलेही अतिक्रमण नाही. चौकशीला सामोरे जात असून अप्पर अधिकारी जो निर्णय देतील तो मान्य राहील.
>
> **-दुर्गा सुधीर गावंडे, सरपंच, लोतवाडा**

दुर्गा सुधीर गावंडे (११२ फूट), उपसरपंच ओंकार बबन कात्रे (३२ फूट), ग्रामपंचायत सदस्य सुनिल मधुकर डोंगरदिवे (४ फूट रुंदी व १० फूट लांबीच्या पायऱ्या), शुभांगी अतुल भदे (१६६ फूट) या चारही जणांनी शासकीय जागेत नमुना ८(अ) च्या व्यतिरिक्त अतिक्रमण केले आहे. या चारही जणांनी शासकीय जागेत अतिक्रमण केले असल्याचा अहवाल ग्रामपंचायत सचिव मंगेश देशमुख यांनी अप्पर जिल्हाधिकारी अमरावती व गटाविकास अधिकारी दर्यापूर यांना दिला.मात्र अहवाल दिल्यावरही अप्पर जिल्हाधिकारी गोविंदा पाणेज यांनी चारही सदस्यांना ☞(पान २ वर)

# अमरावतीत २६ जून रोजी उद्योजक मेळावा

**अमरावती/प्रतिनिधीः-** व्यवसाय मार्गदर्शन आणि प्रशिक्षणाच्या उद्देशाने, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि 'दे आसरा फाऊंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजक मेळाव्याचे आयोजन गुरुवार, दि. २६ जून २०२५ रोजी करण्यात आले आहे. हा मेळावा सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील ए. वि. थिएटर (सभागृह), मराठी विभागात होणार आहे.

या मेळाव्यात पुणे येथील मॅनेजमेंट थियाट्रिक्स, स्टिम्युलेटर, कॉर्पोरेट ट्रेनर आणि कन्सल्टंट डॉ. रवींद्र आहेर मार्गदर्शन करणार आहेत. अमरावतीचे युवा उद्योजक आणि ईसीई इंडिया एनर्जीज प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक अमित आरोकर यांची विशेष मुलाखत घेण्यात येणार आहे, ज्यातून त्यांच्या यशस्वी उद्योजकतेचा प्रवास उलगडेल.

या उद्योजक मेळाव्यात सहभागी होणाऱ्या प्रत्येक उद्योजकाला मोफत उद्यम प्रमाणपत्र काढून मिळणार आहे, जो त्यांच्या ☞(पान २ वर)

# शाळेच्या पहिल्या दिवशी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वागत

## जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा परिषदेच्या शाळांच्या शैक्षणिक सत्राला आज दि.२३ जून पासून प्रारंभ झाला. विकसित भारत घडविण्यासाठी विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असून शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी



निर्माण व्हावी, यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत करून मार्गदर्शन केले.

वलगाव येथील पीएमश्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक उर्दू शाळेला जिल्हाधिकारी येरेकर यांनी आज सकाळी भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी सरपंच सुधीर उगले, उपसरपंच दशरथ मानकर, तहसिलदार विजय लोखंडे, पोलीस निरीक्षक वैभव पानसरे, मुख्याध्यापक ☞(पान २ वर)

# भारताचे माजी सरन्यायाधीश एन. व्ही. रमना उपस्थित राहणार

## -सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांचा भव्य सत्कार सोहळा



**अमरावती** : अमरावती जिल्हा वकील संघातर्फे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांचा भव्य सत्कार सोहळा दि. २५ जून २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता स्वामी विवेकानंद सभागृह पी. आर. पोटे इंजीनीयरींग कॉलेज येथे संपन्न होत आहे. या सत्कार सोहळ्याकरीता अमरावती वकील संघाच्या निमंत्रणावरुन भारताचे माजी सरन्यायाधीश एन. व्ही. रमना उपस्थित राहणार असल्याबाबत त्यांनी वकील संघाला कळविलेले आहे.

अमरावती वकील संघातर्फे सत्कार सोहळ्याच्या सर्व तयारी करण्यात आलेली असुन न्या. भूषण रा. गवई ☞(पान २ वर)

# सामान्य रुग्णांची ओपीडीच्या नावावर आर्थिक लुट

## आ.प्रवीण तायडे आक्रमक, उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना धरले धारेवर

**अचलपूर/प्रतिनिधीः-** आज अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी अचलपूर उपजिल्हा रुग्णालयाला भेट दिली. उपजिल्हा रुग्णालयात ओपीडी साठी रुग्णांच्या होणा-या आर्थिक लुटीच्या अनेक तक्रारी आ.प्रवीण तायडे यांच्या कडे आल्याने त्यांनी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना धारेवर धरले.ओपीडीच्या नावावर सामान्य रुग्णाची आर्थिक लूट करू नये अशी ताकीद सुद्धा त्यांनी यावेळी कर्मचाऱ्यांना दिली.

अचलपूर ☞(पान २ वर)



# अवैध व्यवसायांवर तत्काळ अंकुश लावा

## राष्ट्रीय श्रीराम सेनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**अमरावती/प्रतिनिधीः-** राष्ट्रीय श्रीराम सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना आज सोमवार (दि.२३ ) निवेदन देऊन अवैध व्यवसायावर तात्काळ अंकुश लावण्याची मागणी करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, अमरावती जिल्ह्यात व शहरात अवैधरित्या ऑनलाईन लॉटरी जसे की भवरा, चक्री सारखे अनेक ☞(पान २ वर)

# अचलपूर शहरातील बस स्थानकाच्या पुनर्बांधणीसाठी मुहूर्त मिळेना

## निधी मंजूर, बसस्थानकाच्या कायापालटाची नागरिकांना प्रतीक्षा

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर शहरातील बंद बस स्थानकाच्या पुनर्बांधणीसाठी साडे चार कोटीचा निधी मंजूर होऊनही महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या उदासीन धोरणामुळे थंड बस्त्यात असलेल्या त्या बस स्थानकाच्या कायापालटाची प्रतिक्षा अद्यापही कायम आहे. त्यामुळे अचलपूर वासियाच्या आशेवर पाणी फिरणार का ? हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



अचलपूर शहरातील बंद बसस्थानकातून बोटावर मोजण्याइतके बस फेऱ्या सुरू आहे .अचलपूर - परतवाडा जुळवा शहर म्हणून प्रसिद्ध असल्याने ☞(पान २ वर)